इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - २५२ ▸बुधवार,ता.१४ जानेवारी २०२६ ▸ पाने १२ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

CGTMSE कर्ज योजना
२५ लाख ते १० कोटीपर्यंत
विनातारण व्यवसाय कर्ज
फक्त चालू व्यवसायासाठी
कागदपत्रे - GST-ITR-3B
सिबिल - ७१०+
9130690010
9595919625

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

BUY 2 GET 2 FREE
PETER ENGLAND
Raymond
Levi's
USPA SINCE 1890
Pepe Jeans LONDON
VYANKATRAO HIGH SCHOOL ROAD,
ICHALKARANJI
9762951313, 9762778687

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

संपादकीय...

## लोकशाहीचा उत्सव साजरा करूया, आपला मतदानाचा हक्क बजावूया

**इचलकरंजी महानगरपालिका निवडणूक हा केवळ प्रशासकीय बदलाचा टप्पा नसून, शहराच्या लोकशाही परिपक्वतेची आणि नागरी जाणिवेची परीक्षा आहे. या निवडणुकीकडे पाहताना राजकीय गदारोळ, प्रचार, घोषणा यापलीकडे जाऊन एक मूलभूत बाब लक्षात घेणे आवश्यक आहे लोकशाहीत खरा केंद्रबिंदू मतदार असतो. त्यामुळेच ही निवडणूक इचलकरंजीच्या प्रत्येक नागरिकांसाठी विचार करण्याची, निर्णय घेण्याची आणि सहभाग नोंदवण्याची संधी आहे.**

इचलकरंजी हे कष्टकरी श्रमिकांचे, उद्योजकांचे आणि नव्या पिढीच्या आकांक्षांचे शहर आहे. वस्त्रोद्योगाच्या बळावर शहराने आर्थिक प्रगती साधली; मात्र त्याचवेळी नागरी सुविधांवरील ताण वाढत गेला. वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या, पाण्याची गरज, कचरा व्यवस्थापन, आरोग्य व शिक्षण सुविधा या सर्व बाबी थेट महानगरपालिकेच्या कार्यक्षमतेशी जोडलेल्या आहेत. म्हणूनच, महानगरपालिका निवडणूक ही शहराच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेली प्रक्रिया आहे.

मतदानाचा अधिकार हा संविधानाने दिलेला अमूल्य हक्क आहे. मात्र तो हक्क वापरणे ही केवळ वैयक्तिक कृती नसून, सामुहिक जबाबदारी आहे. प्रत्येक मत हे शहराच्या कारभारात दिलेले मतप्रदर्शन असते. **मतदानाच्या माध्यमातून नागरिक केवळ प्रतिनिधी निवडत नाहीत, तर आपल्या अपेक्षा, गरजा आणि भविष्याची दिशा ठरवतात.** त्यामुळे मतदानाकडे उदासीनतेने पाहणे म्हणजे आपल्या शहराच्या निर्णय प्रक्रियेतून स्वतःला दूर ठेवण्यासारखे आहे.

आजचा मतदार अधिक जागरूक आहे. माहितीचे अनेक स्रोत, सामाजिक माध्यमे, स्थानिक चर्चासत्रे आणि नागरी गट यामुळे मतदार अधिक विचारपूर्वक निर्णय घेऊ लागला आहे. हा बदल लोकशाहीसाठी सकारात्मक आहे. मात्र जागरूकता मतदानात परिवर्तित होणे तितकेच महत्त्वाचे आहे. चर्चेत भाग घेणे, मत मांडणे जितके आवश्यक आहे, तितकेच मतदान केंद्रावर जाऊन मत नोंदवणे गरजेचे आहे.

**महानगरपालिका म्हणजे केवळ रस्ते, गटारे आणि कर वसुली नव्हे; ती शहराच्या सामाजिक आरोग्याची, नियोजनबद्ध विकासाची आणि भविष्यातील संधींची चौकट असते.** शहरी नियोजन, पर्यावरण संतुलन, सार्वजनिक जागांचे जतन, महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा, युवकांसाठी संधी या सर्व बाबींचा विचार करून शहर चालवले जाते. त्यामुळे मतदान करताना हा व्यापक दृष्टिकोन मनात ठेवणे आवश्यक आहे.

इचलकरंजी शहरवासीयांनो लोकशाहीचा उत्सव साजरा करूया चला, आपला मतदानाचा हक्क बजावूया.

लोकशाही हा केवळ शासनाचा प्रकार नाही, तर नागरिकांचा सहभाग असलेली जीवनपद्धती आहे. निवडणूक हा त्या जीवनपद्धतीचा उत्सव आहे. ज्या उत्सवात प्रत्येक नागरिकांचा सहभाग अपेक्षित असतो. मतदान केंद्रावर उमटलेले प्रत्येक मत म्हणजे लोकशाहीच्या पायात रचलेली एक वीट आहे.

मतदान न करणे म्हणजे निर्णय इतरांवर सोपवणे होय. लोकशाहीत मौनही एक भूमिका असते; मात्र ती भूमिका अनेकदा आपल्या भवितव्याविषयी निर्णय घेण्याची संधी गमावते. म्हणूनच, प्रत्येक पात्र मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावणे हे केवळ कर्तव्य नव्हे, तर शहरावरील आपले प्रेम व्यक्त करण्याचा मार्ग आहे.

मतदानाचा वाढता टक्का हा शहरासाठी सकारात्मक संकेत असतो. तो प्रशासनाला, लोकप्रतिनिधींना आणि संपूर्ण व्यवस्थेला सांगतो की नागरिक जागरूक आहेत, सहभागी आहेत आणि जबाबदार आहेत. आज दिलेले मत उद्याच्या शहररचनेवर, सेवांवर आणि संधींवर परिणाम घडवते. ही जाणीव प्रत्येक मतदाराने मनात ठेवणे आवश्यक आहे.

**निवडणूक म्हणजे केवळ एका दिवसाची प्रक्रिया नाही. ती पुढील अनेक वर्षांची दिशा ठरवते. त्यामुळे मतदानाच्या दिवशी वेळ काढून, कोणत्याही दबावाशिवाय, शांतपणे आणि विवेकबुद्धीने मतदान करणे हेच लोकशाहीचे खरे सौंदर्य आहे.** आपल्या एका मतामुळे शहर अधिक सक्षम, नियोजनबद्ध आणि नागरिकाभिमुख होऊ शकते, ही भावना महत्त्वाची आहे.

अखेर, इचलकरंजी महानगरपालिका निवडणूक ही शहराच्या लोकशाही प्रवासातील महत्त्वाची पायरी आहे. या पायरीवर पाऊल टाकताना प्रत्येक नागरिकाने सहभागी होणे आवश्यक आहे. लोकशाहीचा उत्सव सर्वांचा असतो आणि त्या उत्सवात सहभागी होण्याचे सर्वोत्तम साधन म्हणजे मतदान.

चला तर मग, मतभेद बाजूला ठेवून, निष्पक्षपणे आणि अभिमानाने आपला मतदानाचा हक्क बजावूया. कारण मजबूत लोकशाहीच सक्षम शहर घडवते, आणि सक्षम शहरच उज्ज्वल भविष्यास आकार देते.

# प्रचार तोफा थंडावल्या ; उद्या मतदान

■ मुंबई,ता.१३-

**महाराष्ट्रातील २९ महापालिकांमध्ये १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. या निवडणूक प्रचाराचा मंगळवारी अखेरचा दिवस होता. त्यामुळे राज्यात संध्याकाळी ५.३० वाजता प्रचार थांबला. परंतु, उमेदवारांना घरोघरी जाऊन मतदारांशी संपर्क साधता येणार असल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.**

प्रचाराच्या अखेरच्या दिवशी मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये मोठा रोड शो केला. बुलेट मोटारसायकलवरून त्यांनी रॅलीत सहभाग घेतला आणि निवडणुकीनंतर मुंबईत महायुतीचा महापौर होईल, असा दावा केला. त्यांनी बीएमसीची सूत्रे मराठी हातात राहतील असे स्पष्ट केले.राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांची रणधुमाळी मंगळवारी संध्याकाळी ५.३० वाजता आटोपली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या प्रचारसभा, रॅली इत्यादी बंद झाले. आता गुरुवारी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. मात्र मतदानाच्या तोंडावर निवडणूक आयोगाने प्रचार कालावधी संपल्यावरही उमेदवारांना घरोघरी जाऊन मतदारांशी संपर्क करण्याची परवानगी दिली आहे. निवडणूक आयोगाच्या ताज्या निर्णयानुसार प्रचार कालावधी संपल्यानंतरही उमेदवार मतदारांना भेटू शकणार आहेत, मात्र त्यांना

## घरोघरी संपर्क सुरूच रहाणार

पक्षाची पत्रके वाटता येणार नाहीत. निवडणुकीच्या तोंडावर सर्व उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींची बैठक झाली होती.



त्यात सायंकाळी ५.३० वाजता प्रचाराच्या तोफा थंडावल्यानंतरही उमेदवारांना घरोघरी जाऊन प्रचार करता येणार आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी कृष्णा जाधव यांनी महापालिकेच्या ए, बी आणि ई विभागातील सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवारांची नुकतीच एक बैठक घेतली होती. त्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये हा निर्णय नमूद आहे. मात्र विरोधी पक्ष काँग्रेस तसेच अन्य लोकांनीही यावर आक्षेप घेतला. याआधी अशा प्रकारे निवडणूक आयोगाने कधी निर्णय घेतला नव्हता. त्यामुळे आता असा अजब निर्णय का घेतला, असा सवाल उपस्थित केला जात आहे. तर राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केले की, निवडणूक आयोगाने हा आदेश आता काढला नसून २०१२ पासून अमलात आहे. उमेदवार जमावबंदीच्या आदेशाचे पालन करून घरोघरी जाऊन मतदारांना भेटू शकतात व त्यांच्याशी चर्चा करू शकतात.

राज्यात निवडणूक प्रचारादरम्यान मराठी अस्मिता, आघाडीची ताकद आणि मुंबई महापालिकेवरील (पान २ वर)

# जिल्हा परिषद, पंचायत समितीचा बिगुल वाजला ; ५ फेब्रुवारीला मतदान

■ मुंबई,ता.१३-

**राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. या निवडणुकांसाठी ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार असून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी पार पडणार आहे. या निवडणुकांसह आजपासून संबंधित क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे.**

### ७ फेब्रुवारीला मतमोजणी ; आचारसंहिता लागू

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदांमधील



एकूण ७३१ जागांसाठी तसेच संबंधित १२५ पंचायत समित्यांमधील १,४६२ जागांसाठी निवडणुका होणार आहेत. मतदान ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल.

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित जिल्हा परिषदा आणि पंचायत (पान २ वर)

# इचलकरंजीत प्रचाराची सांगता

■ इचलकरंजी,ता.१३-

**इचलकरंजी महानगरपालिका निवडणूक रणधुमाळीच्या प्रचार तोफा मंगळवारी शांत झाल्या. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी प्रत्येक प्रभागात कॉर्नर सभा, पदयात्रा काढण्यात आल्या. प्रचाराच्या तोफा थंडावल्या असल्या तरी खऱ्या अर्थाने दोन दिवसात प्रचाराची रंगत वाढणार असल्याने 'रात्रीस खेळ चाले' पध्दतीचा छुपा प्रचाराची चर्चा सुरु आहे.**

छुपा प्रचार सुरू

दरम्यान, गुरुवार ता.१५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. त्यानुसार प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. बुधवारी सकाळपासून राजीव गांधी भवन येथे मतदान केंद्रांवरील साहित्याचे वितरण केले जाणार आहे. इचलकरंजी महानगरपालिकेच्या स्थापनेपासुन चार वर्षानंतर पहिलीच निवडणूक होत आहे. १६ प्रभागातील ६५ जागासाठी भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गट तसेच शिव शाहू विकास आघाडी आणि अपक्ष मिळून २३० उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. महिनाभर प्रचाराच्या निमित्ताने पदयात्रा काढत घर टू घर भेट देऊन भाग पिंजून काढला आहे. अखेर मंगळवारी प्रचाराची सांगता झाल्याने होणारी दमछाक थांबली असली तरी मंगळवार आणि बुधवार दोन दिवस छुप्या प्रचाराला गती येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. महायुतीच्यावतीने (पान २ वर)

## 'ऑपरेशन सिंदूर' सुरूच, पाकने आगळीक करू नये - द्विवेदी

■ नवी दिल्ली,ता.१३-

**पाकिस्तानात अजूनही ७ ते ८ दहशतवादी तळ सक्रिय आहेत. यासंदर्भात भारताला पूर्ण माहिती असून आम्ही त्यावर लक्ष ठेऊन आहोत. 'ऑपरेशन सिंदूर' अजूनही सुरू असून पाकिस्तानने आगळीक केल्यास**



**सडेतोड प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशारा सैन्यप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी दिला. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.**


याप्रसंगी जनरल द्विवेदी म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरने दहशतवादी रचनेला पूर्णपणे नष्ट केले आणि पाकिस्तानच्या परमाणू (पान २ वर)

# राजापुर बंधाऱ्याला बरगे घातल्याने कृष्णेची पाणी पातळी वाढली

■ बुबनाळ,ता.१३(वार्ताहर)-

**शिरोळ तालुक्यात गेल्या आठवड्यात कृष्णा नदीची पाणी पातळी खुपच खालावली होती. यामुळे पाटबंधारे विभागातर्फे राजापुर बंधाऱ्याला बरगे घालून पाणी अडविण्यात आले आहे. परिणामी मंगळवार पासुन कृष्णा नदीची पाणी पातळी संथगतीने वाढू लागली आहे.**

गौरवाडसह औरवाड, आलास, बुबनाळ, कवठेगुलंद, शेडशाळ, गणेशवाडी, नृसिंहवाडी, मजरेवाडी, बस्तवाड, अकिवाट, राजापुर (पान २ वर)



**शिरोळ तालुक्यातील राजापुर बंधाऱ्याला अकरा फुटापर्यंत बरगे घालण्यात आल्याने कृष्णेच्या पाणीसाठ्यात संथगतीने वाढ होऊ लागली आहे.** (छाया-अनिल जासुद)

## कुत्रे चावल्यास राज्य सरकार मोबदला देईल- सुप्रीम कोर्ट

■ नवी दिल्ली,ता.१३-

**कुत्र्यांनी घेतलेला चावा किंवा हल्ल्यामुळे जर कुणी जखमी झाले किंवा कुणाचा मृत्यू झाल्यास मोबदला देण्याची जबाबदारी राज्य सरकारची असेल असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.**



दिल्ली एनसीआरसह देशातील अनेक शहरांमध्ये मोकाट कुत्र्यांचे संकट दिवसेंदिवस वाढत आहे. याप्रकरणी मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात महत्वाची सुनावणी झाली. (पान २ वर)

## लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी सांगलीच्या युवकास सक्तमजुरी

■ सांगली,ता.१३(प्रतिनिधीं)-

**लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी विशेष जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी विजय उर्फ यशवंत भुपाल सोनावले (वय १९, रा. हनुमाननगर, सांगली) याला २० वर्षांची सक्तमजुरी आणि १४ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. सरकार पक्षातर्फे अ‍ॅड. आरती देशपांडे - साटविलकर यांनी काम पाहिले.**

खटल्याच्या हकीकतीनुसार, फेब्रुवारी २०१९ रोजी आरोपी विजय सोनावले याने पिडीत अल्पवयीन मुलीच्या मैत्रिणीसमवेत ओळख केली. त्यानंतर मैत्रिणीव्दारे पिडीतेस स्वत:बरोबर ओळख करण्यास भाग पाडले. काही दिवसांनी विजय सोनावले याने पिडीतेस लग्नाचे अमिष दाखवून तीला दुचाकीवरुन फिरायला नेले. शहर परिसरातील एका उद्यानात तिच्याशी शारिरीक संबंध ठेवले. तसेच हा प्रकार कोणाला सांगू नकोस असे सांगितले. (पान २ वर)

पोलिसांच्या तत्परतेमुळे वाचले दोन जीव

## मूकबधिर मुलासह युवकाचा न्यायालयाबाहेर आत्मदहनाचा प्रयत्न

■ कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)-

**व्याधीग्रस्त चार वर्षाच्या मुलाला सोडून, घटस्फोट घेत पत्नीने सोडून दिल्यानंतर हाताला काम न मिळाल्याने आणि कोणाचाच आधार नसल्याने मुलाचा सांभाळ कसा करायचा, या विवंचनेतून हतबल झालेल्या एका युवकाने जिल्हा न्यायालयाबाहेर आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास घडली. मात्र, शाहूपुरी पोलिसांनी प्रसंगावधान राखत वेळीच हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला.**

मिथुन शामराव कुंभार (वय ३०, रा.माणगाव,ता.हातकणंगले) असे या युवकाचे नाव आहे. मंगळवारी दुपारी सव्वाबाराच्या सुमारास मिथुन हा त्याच्या चार वर्षीय व्याधीग्रस्त मुलाला सोबत घेऊन जिल्हा न्यायालय परिसरात आला होता. काही वेळ तो न्यायालयाच्या प्रवेशद्वाराजवळ घुटमळत होता. त्यानंतर अचानक त्याने अंगावर रॉकेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

हा प्रकार लक्षात येताच समोर थांबलेल्या रिक्षाचालकांनी आरडाओरड सुरू केली. त्याचवेळी कामानिमित्त जिल्हा न्यायालयात येत असलेले शाहूपुरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संतोष डोके यांनी शासकीय वाहन तातडीने थांबवले. हवालदार नितीन सावंत (पान २ वर)

## अंकलीत विवाहितेची पुलावरून नदीत उडी

■ सांगली,ता.१३(प्रतिनिधी)-

**मिरज तालुक्यातील अंकली येथील कृष्णा नदीवरील पुलावरून प्राजक्ता योगेश देसाई (वय २४, रा.गावभाग, सांगली) या विवाहितेने मंगळवारी दुपारी नदीत उडी घेतल्याचा प्रकार घडला. सांगली ग्रामीण पोलिसांना माहिती मिळताच स्पेशल रेस्क्यू फोर्सच्या मदतीने नदीपात्रात तिचा शोध घेतला. परंतू सायंकाळी उशिरापर्यंत प्राजक्ता सापडली नाही.**

कृष्णा नदीपात्रात अंकली पुलावरून विवाहित महिलेने थेट पाण्यात उडी (पान २ वर)

(पान १ वरून)

## प्रचार तोफा थंडावल्या

सत्ता यावरून सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले आहेत. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात दिग्गज नेते मैदानात उतरल्याने राजकीय वातावरण आणखी तापले होते. या महापालिका निवडणुका फक्त स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी नव्हेतर, तर महाराष्ट्राच्या राजकारणातील सत्तेची खरी कसोटी मानल्या जात आहेत. महापालिका निवडणुकीसाठी राज्य सरकारने गुरुवारी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली असून मतदान सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत होणार आहे. निकाल १६ जानेवारीला जाहीर होईल.

## प्रचाराची सांगता

खास. धैर्यशिल माने, आम. राहुल आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर आदिंनी विविध ठिकाणी प्रचार सभा घेत प्रचाराचा धुरळा उडविला होता. तर शिव शाहु विकास आघाडीच्या वतीने शशांक बावचकर, मदन कारंडे, सागर चाळके, राहुल खंजिरे, संजय कांबळे आदींसह नेतेमंडळींकडून भागाभागात पदयात्रा आणि रॅली काढून मतदारांना आवाहन करण्यात येत आले. जाहीर प्रचाराची सांगता मंगळवारी सायंकाळी झाली असली तरी येणाऱ्या दोन दिवसात अंतर्गत हालचालींना वेग येणार आहे. त्यामुळे अनेक उमेदवार आपल्या विरोधकांवर डोळा ठेऊन असल्याचे बोलले जात आहे.

## जि.प., पं.स.चा बिगुल वाजला

समित्यांच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. संबंधित क्षेत्रात ही आचारसंहिता लागू झाली असली तरी अन्य ठिकाणी देखील संबंधित जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या मतदारांवर प्रभाव पाडणारी घोषणा किंवा कृती करता येणार नाही; परंतु नैसर्गिक आपत्तीबाबत करावयाच्या उपाययोजना किंवा मदतीसंदर्भात आचारसंहितेची आडकाठी असणार नाही. राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक असेल. जिल्हाधिकारी १६ जानेवारी २०२६ रोजी निवडणुकीच्या सूचनेची प्रसिद्धी करतील. नामनिर्देशनपत्रे १६ ते २१ जानेवारीदरम्यान स्वीकारली जातील, तर छाननी २२ जानेवारीला होईल. उमेदवारी माघारीची अंतिम मुदत २७ जानेवारी असून त्यादिवशीच चिन्हवाटप व अंतिम उमेदवार यादी जाहीर केली जाईल.

या निवडणुकांसाठी सुमारे २५ हजार ४८२ मतदान केंद्रांची व्यवस्था केली असून ईव्हीएम यंत्रांची पुरेशी उपलब्धता करण्यात आली आहे. मतदारांना जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अशा दोन वेगवेगळ्या पातळ्यांवर मतदान करावे लागणार आहे. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व गरोदर महिलांसाठी विशेष सुविधा आणि प्राधान्य मतदानाची व्यवस्था करण्यात येणार आहे. 'मताधिकार' मोबाईल ॲप आणि विशेष संकेतस्थळाद्वारे मतदार यादीत नाव व मतदान केंद्राची माहिती मिळू शकते.

प्रचाराची समाप्ती ३ फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्रीपासून लागू होणार असून त्यानंतर कोणत्याही माध्यमातून प्रचारजाहिरातींना बंदी असेल. निवडणूक खर्चाची मर्यादा जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांसाठी वेगवेगळी निश्चित करण्यात आली आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शक होण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ, सुरक्षा आणि माध्यम संनियंत्रण यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली.

## 'ऑपरेशन सिंदूर' सुरूच, पाकने आगळीक करू नये – द्विवेदी

धमकीचा प्रभाव कमी केला. त्यांनी सांगितले की ऑपरेशन तीनही सेनांच्या सैन्य, वायूसेना आणि नौदल यांच्या उत्कृष्ट समन्वयाचे उदाहरण आहे. ऑपरेशन सिंदूर अत्यंत सूक्ष्म नियोजन आणि अचूकतेने पार पडले. सुरुवातीपासून शेवटपर्यंत या ऑपरेशनमध्ये एकूण ८८ तास लागले, ज्यात पहिल्या २२ मिनिटांतच मुख्य हल्ले सुरू झाले. या ऑपरेशनमध्ये एकूण ९ टार्गेट्सपैकी ७ पूर्णपणे नष्ट करण्यात आले. त्यांनी विशेष सांगितले की भारताने फक्त दहशतवादी ठिकाणांना लक्ष्य केले; सामान्य नागरिक किंवा सैन्य ठिकाणांना हानी पोहोचवली गेली नाही.

जनरल द्विवेदींनी पाकिस्तानला स्पष्ट इशारा देत म्हटले की, तुमच्याकडे अजूनही ८ दहशतवादी तळ सक्रिय असून त्याची यादी आणि माहिती आमच्याकडे आहे. भविष्यात पाकिस्तानातून कोणतीही चुकीची हालचाल केल्यास कठोर उत्तर दिले जाईल 'ऑपरेशन सिंदूर' अजून संपलेले नाही असा सुस्पष्ट इशारा सैन्यप्रमुखांनी दिला.

## राजापुर बंधाऱ्याला बरगे घातल्याने कृष्णेची पाणी पातळी वाढली

आदी गावांचा पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटला आहे.६ जानेवारी २०२६ रोजी हिप्परगी धरणाचे दोन दरवाजे तांत्रिक कारणामुळे तुटल्याने धरणातील पाणी मोठ्या प्रमाणात वाहुन गेले होते. परिणामी राजापुर बंधाऱ्याजवळ पाणी पातळी सहा फुटापर्यंत खाली आली होती. पाटबंधारे विभागाने याची दखल घेऊन राजापुर बंधाऱ्याला बरगे घालण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेतले होते. तत्पुर्वी पुरामुळे राजापुर बंधाऱ्याला मोठ्या प्रमाणात विविध झाडे झुडपे, कचरा येऊन साठला होता. जेसीबीच्या सहाय्याने बंधाऱ्याला येऊन लागलेली झाडे-झुडपे यांची स्वच्छता करण्यात आली. यानतर मंगळवारी अकरा फुटापर्यंत बंधाऱ्याला बरगे घालण्यात आली आहेत. यामुळे राजापुर बंधाऱ्यात पाणीसाठ्यात वाढ होऊ लागली आहे. रविवारी सकाळी आठ वाजता ६ फुट ६ इंच असलेली पाणी पातळी मंगळवारी सांयकाळी ९ फुटापर्यंत वाढली आहे. बंधाऱ्याला बरगे घातल्याने बॅक वॉटरमुळे कृष्णा नदीच्या पाणी पातळीत गणेशवाडीपर्यंत संथगतीने वाढ होऊ लागली आहे. आज बुधवारी कृष्णा नदीच्या पाणी पातळीत बऱ्यापैकी वाढ होण्याची शक्यता पाटबंधारे विभागाने वर्तविली आहे.

दरम्यान गौरवाडसह औरवाड, आलास, बुबनाळ, कवठेगुलंद, शेडशाळ, गणेशवाडी, बस्तवाड, अकिवाट, मजरेवाडी गावांच्या पाणवठ्याजवळ पाणी पातळीत वाढ होऊ लागल्याने येथील शेतकरीवर्ग व ग्रामस्थामधून समाधान व्यक्त होत आहे.

# सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेच्या जाहीर प्रचाराची सांगता

## मतदान प्रक्रियेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

■ सांगली,ता.१३(प्रतिनिधी)–

**सांगली–मिरज–कुपवाड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या जाहीर प्रचाराची सांगता झालेली असून या महापालिकेसाठी गुरुवारी दि.१५ जानेवारी रोजी मतदान होत आहे. मतदान प्रक्रियेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा हक्क बजावने अनिर्वाय असून जास्तीत जास्त मतदारांनी या प्रक्रियेत सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी सत्यम गांधी यांनी मंगळवारी पत्रकारांशी बोलताना केले.**

आयुक्त म्हणाले, सांगली–मिरज–कुपवाड महापालिकेसाठी सार्वत्रिक निवडणुकीच्या माध्यमातून २० प्रभागातून एकूण ७८ सदस्य निवडण्यात येणार आहेत. यामध्ये १८ प्रभागातून प्रत्येकी चार तर २ प्रभागातून प्रत्येकी तीन सदस्य निवडण्यात येतील. यासाठी एकूण ३८१ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातून ११ सदस्य निवडण्यात येतील त्यामध्ये सहा महिलांचा समावेश असेल. अनुसूचित जमाती प्रवर्गातून एक. ओबीसी मधून निवडण्यात येणाऱ्या २१ पैकी ११ महिला सदस्य असणार आहेत तर सर्वसाधारण प्रवर्गातील ४५ जागांपैकी २२ महिलांसाठी राखीव आहेत. हे सदस्य निवडण्यासाठी एकूण ४ लाख ५४ हजार २३० मतदार आपला हक्क बजावणार आहेत. यामध्ये २ लाख २४ हजार ६४४ पुरुष तर २ लाख २९हजार ८६५ महिला आणि ८२ इतर मतदारांचा समावेश आहे. या सर्व मतदारांसाठी एकूण ५२७ मतदान केंद्रे सज्ज असून त्या ठिकाणी चोख व्यवस्था करण्यात आली आहे. यापैकी कायदा आणि सुव्यवस्थेच्या पातळीवर विशेष लक्ष ठेवावे लागणाऱ्या केंद्रांची संख्या ९१ आहे. यामध्ये सांगली शहरातील १५, विश्रामबाग परिसरातील १८, संजय नगर भागातील २१ आणि मिरज येथील महात्मा गांधी चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील १४ आणि कुपवाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ४ मतदान केंद्राचा समावेश आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी एकूण २ हजार ९०० अधिकारी, कर्मचारी तैनात आहेत. या प्रक्रियेसाठी एकूण ११४३ वोटिंग मशीन चा वापर करण्यात येणार असून मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक साहित्याचे वाटप बुधवारी केंद्रीय वखार महामंडळाच्या गोडाऊन परिसरात करण्यात येणार आहे.

गुरुवारी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पाडण्यात येणार असून त्यानंतर सिलबंद सर्व वोटिंग मशीन पुन्हा केंद्रीय वखार महामंडळाच्या गोडाऊनमध्ये तयार करण्यात आलेल्या स्ट्राँगरूम मध्ये बंदिस्त करण्यात येणार आहेत. त्या ठिकाणी आतल्या बाजूला दहा आणि बाहेरच्या बाजूला ५० सीसीटीव्हीची नजर आणि पोलीस बंदोबस्त कायम तैनात असणार आहे.

दि. १६ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होईल. सहा निवडणूक निर्णय अधिकारी असून प्रत्येकाच्या ठिकाणी एकावेळी एकाच प्रभागाची मतमोजणी करण्यात येणार आहे. मतमोजणी केंद्रात उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी म्हणून प्रवेश देण्यात येणाऱ्या कोणालाही मोबाईल सोबत आणता येणार नाही. बाहेरच्या बाजूलाही मोबाईल जमा करण्याची व्यवस्था आम्ही केलेली नाही, त्यामुळे प्रत्येकाने आपले मोबाईल घरीच ठेवून यावे, तसेच आपली वाहने ज्या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था आहे, त्याच ठिकाणी लावावीत. एका प्रभागाची मतमोजणी झाल्यानंतरच दुसऱ्या प्रभागाच्या उमेदवारांना आणि त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीना आत सोडण्यात येईल, असेही आयुक्त श्री गांधी यांनी यावेळी स्पष्ट केले.

## लष्कर-ए-तोयबामध्ये फूट, भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'चा मोठा परिणाम

■ नवी दिल्ली,ता.१३–

**भारतीय गुप्तचर संस्थांना पाकिस्तानमधून एक मोठी माहिती मिळाली आहे. पाकिस्तानमध्ये कार्यरत असलेल्या दहशतवादी संघटना लष्कर–ए–तोयबामध्ये फूट पडल्याचे समोर आले आहे. यामागे कुठेतरी भारताच्या ऑपरेशन सिंदूरचा मोठा वाटा असल्याचे सांगितले जात आहे.**

गुप्तचर विभागातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, लष्कर–ए–तोयबामध्ये अंतर्गत समस्या सुरू झाल्या असून, गेल्या काही महिन्यांत संघटनेसंदर्भात घेतलेल्या काही निर्णयांशी संघटनेतील काही वरिष्ठ नेते सहमत नाहीत. अधिकाऱ्याने पुढे सांगितले की, ऑपरेशन सिंदूर हा निर्णायक टप्पा ठरला, ज्यादरम्यान या संघटनेने आपली मोठ्या प्रमाणावर पायाभूत रचना (इन्फ्रास्ट्रक्चर) गमावली. ऑपरेशन सिंदूरनंतर लष्कर–ए–तोयबाला पुन्हा संघटना मजबूत करणे कठीण जात आहे.

संघटनेशी संबंधित अनेक लोकांचा आता आयएसआय आणि पाकिस्तानी सैन्यावरचा विश्वास उडाला आहे, कारण त्यांच्या मते, हे यंत्रणा आता त्यांचे संरक्षण करू शकणार नाहीत.गुप्तचर विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मते, लष्कर–ए–तोयबाशी संबंधित लोकांना असे वाटते की पाकिस्तान सरकार चीन आणि अमेरिका यांच्या मागण्या अति प्रमाणात पूर्ण करत आहे. चीन आणि अमेरिका या दोन्ही देशांचे लक्ष बलुचिस्तानमधील खनिज संसाधनांकडे आहे.दरम्यान, तहरीक–ए–तालिबान पाकिस्तान (टीटीपी) आणि बलुचिस्तान मुक्ती सेना (बीएलए) हे दोन्ही संघटन बलुचिस्तान आणि खैबर पख्तूनख्वा (केपी) प्रांतात पाकिस्तानी सैन्याविरोधात लढा देत आहेत.

या संघटनांचा स्पर्धा करण्यात पाकिस्तानी सैन्य अपयशी ठरत असल्याने, टीटीपी आणि बीएलएशी लढण्यासाठी इस्लामिक स्टेट खोरासान प्रांत या संघटनेला सहभागी करून घेण्याचा आणि तिला लष्कर–ए–तोयबासोबत जोडण्याचा निर्णय पाकिस्तानी सैन्याने घेतला आहे.

# ट्रम्पच्या धोरणांची चीनकडून थट्टा

■ बीजिंग,ता.१३ –

**अमेरिकेने व्हेनेझुएलावर हल्ला करून राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना अटक केली होती. यावरून चीनने अमेरिकेवर टीका केली होती. आता अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पच्या धोरणांवर चीनने एक एआय व्हिडिओ शेअर करत थट्टा उडवली आहे.**

व्हेनेझुएलावर हल्ल्यानंतर डोनाल्ड ट्रम्पने अनेक देशांना त्यांच्या मागण्यांचे पालन करण्यासाठी सांगितले. ट्रम्पने व्हेनेझुएलाच्या तेलावर कब्जा गाजवला. यानंतर आता ग्रीनलंडवरही अमेरिकी राष्ट्राध्यक्षाची नजर आहे. तसेच अमेरिका ईराणमध्ये सुरू असलेल्या निदर्शनांवरही लक्ष ठेवले आहे आणि इराणी सरकारवर हल्ल्याची धमकीही दिली आहे. अमेरिकेच्या अशा वर्तनाकडे पाहून चीनच्या सरकारी माध्यमांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर एक एआय व्हिडिओ शेअर केला आहे, ज्याला थेट डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या धोरणांशी जोडले जात आहे.चीनच्या सरकारी माध्यमांनी शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये एक पात्र अमेरिकेच्या ध्वजाची टोपी घातलेले दाखवले गेले आहे.

या व्हिडिओमध्ये कॅप्शनसह दाखवले आहे की हे पात्र लोकांना म्हणत आहे, 'तुमच तेल, तुमची जमीन, हे सर्व माझे लक्ष्य आहे.' व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये असेही म्हटले आहे, 'मादुरोला हटवणे हा फक्त एक छोटा खेळ आहे. आंतरराष्ट्रीय नियम माझ्यासाठी काही महत्त्वाचे नाहीत.

मला कोणाची परवानगी घेण्याची गरज नाही आणि मला कोणतीही काळजी नाही. माझ्याकडे मोठी सैन्य आहे.' या व्हिडिओमध्ये पात्र पुढे म्हणते, 'मी जे हवं ते करू शकतो. मला जे काही हवे आहे, ते मी घेऊ शकतो.' चीनच्या सरकारी माध्यमांनी शेअर केलेल्या या व्हिडिओमधील पात्राचे डोनाल्ड ट्रम्पच्या धोरणांशी थेट संबंधित असल्याचे सांगितले गेले आहे.

## दोन्ही राष्ट्रवादींचे विलिनीकरण नाही

पुणे,ता.१३–

**गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादींच्या विलिनीकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यानंतर त्यांचे विलिनीकरण होणार असल्याचे संकेत अनेकांनी दिले होते. आता त्यावर अजित पवारांनी भाष्य केले आहे. दोन्ही राष्ट्रवादींचे विलिनीकरण होणार नाही आणि सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होणार नाहीत असे अजित पवारांनी स्पष्ट केले ते पुण्यामध्ये बोलत होते.**

सुप्रिया सुळेंचा राष्ट्रवादी पक्ष हा इंडिया आघाडीचा भाग आहे, त्यामुळे त्या केंद्रात मंत्री होणार नाहीत असे अजित पवार म्हणाले. तसेच दोन्ही राष्ट्रवादींचे विलिनीकरण होणार नाही असेही त्यांनी स्पष्ट केले. निवडणुकीनंतर वेळ पडली तर पुण्यात भाजपसोबत जाणार का हा प्रश्न अनेकदा विचारुन देखील अजित पवारांनी त्यावर स्पष्ट उत्तर दिले नाही.

## शेअर बाजार उद्या बंद राहणार

मुंबई,ता.१३–

**महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर १५ जानेवारी २०२६ रोजी देशातील शेअर बाजार बंद राहणार आहेत. आणि दोन्हीने याबाबत अधिकृत घोषणा करत कॅपिटल मार्केट सेगमेंटमध्ये पूर्ण ट्रेडिंग हॉलिडे जाहीर केला आहे. राज्य सरकारने २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी सार्वजनिक सुट्टी घोषित केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला असून यात बृहन्मुंबई महानगरपालिका यांचाही समावेश आहे.**

सुरुवातीला १५ जानेवारी हा केवळ सेटलमेंट हॉलिडे राहील, अशी माहिती देण्यात आली होती. मात्र नंतर सुधारित परिपत्रक जारी करून ते कॅपिटल मार्केटमधील सर्व व्यवहार त्या दिवशी बंद राहतील, असे स्पष्ट केले. त्यामुळे इक्विटी, इक्विटी डेरिव्हेटिव्हज, सिक्युरिटीज लेंडिंग अँड बॉरोइंग, करन्सी आणि इंटरेस्ट रेट डेरिव्हेटिव्हजमध्ये व्यवहार होणार नाहीत. कमोडिटी डेरिव्हेटिव्हजमध्ये सकाळची सत्रे बंद राहतील. सरकारी अधिसूचनेनुसार मुंबई शहर आणि उपनगरांतील सरकारी कार्यालये, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, बँका आणि इतर संस्था देखील बंद राहतील. बाजार बंद राहिल्यामुळे ट्रेडर्सना आपली पोझिशन्स आणि सेटलमेंटचे नियोजन करावे लागणार आहे. १४ व १५ जानेवारीला झालेले व्यवहार १६ जानेवारी रोजी सेटल होतील, तसेच किंवा पोझिशन्समध्ये १५ तारखेला विक्री करता येणार नाही. इक्विटीसह डेट आणि करन्सी सेगमेंटमध्येही ट्रेडिंग हॉलिडे राहणार असल्याने गुंतवणूकदारांसाठी हा दिवस महत्त्वाचा ठरणार आहे.

## अंकलीत विवाहितेची पुलावरून नदीत उडी

(पान १ वरून)

मारल्याची घटना दुपारी साडे बाराच्या सुमारास घडली. काहीजणांनी हा प्रकार पाहिला. त्यामुळे पुलावर गर्दी जमली. सांगली ग्रामीण पोलिसांना हा प्रकार कळवला. ग्रामीण पोलिसांनी स्पेशल रेस्क्यू फोर्स या आपत्कालीन पथकास कळवले. त्यानुसार पथकाने नदीपात्रात उतरून शोध कार्य सुरू केले. पोलिसांच्या चौकशीत नदीत उडी टाकणाऱ्या महिलेचे नाव प्राजक्ता देसाई असे असल्याचे समजले. विवाहितेने ज्या ठिकाणी उडी मारली, त्याठिकाणी नदीत पाण्याच्या प्रवाहाला वेग असल्यामुळे शोधकार्यात अडथळे निर्माण होत आहेत. तरीही रेस्क्यू फोर्सने सायंकाळी उशिरापर्यंत शोधकार्य सुरू ठेवले होते.

## उत्तराखंडच्या बागेश्वरमध्ये भूकंप

■ देहरादून,ता.१३–

**उत्तराखंडच्या बागेश्वरमध्ये मंगळवारी सकाळी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ३.५ इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाच्या धक्क्यांमुळे भीतीच्या वातावरणात नागरिक घराबाहेर पडले.**

माहितीनुसार, या भूकंपाचे केंद्र बागेश्वर परिसरात असल्याचे सांगण्यात आले असून, त्याची खोली सुमारे १० किलोमीटर होती. धक्के जाणवल्यानंतर काही काळ नागरिक सतर्क झाले होते, मात्र कोणत्याही प्रकारची गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली नाही. तहसील स्तरावरून मिळालेल्या माहितीनुसार, यामध्ये कुठल्याही प्रकारच्या जीवित किंवा मालमत्तेच्या नुकसानीची माहिती नाही. प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शिखा सुयाल यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रशासनाला कळवण्याचे सांगितले आहे. उल्लेखनीय म्हणजे, १० डिसेंबर रोजी उत्तराखंडच्या पिथौरागढ जिल्ह्यातही भूकंपाचे धक्के जाणवले होते. चीन सीमेला लागून असलेल्या धारचुला तहसीलमधील उच्च हिमालयीन व्यास खोऱ्यात सकाळी ९ वाजून १० मिनिटांनी भूकंपाचा धक्का जाणवला होता.

## मूकबधिर मुलासह युवकाचा न्यायालयाबाहेर आत्मदहनाचा प्रयत्न

(पान १ वरून)

व कॉन्स्टेबल सूरज आबिटकर यांनी तत्काळ धाव घेऊन त्या युवकाला पकडले. त्याच्याकडील रॉकेलचा कॅन आणि काडीपेटी ताब्यात घेण्यात आली.

यानंतर पोलिसांनी त्याला तात्काळ पोलिस ठाण्यात नेले. घटनेमुळे काही काळ रस्त्यावर गर्दी होऊन वाहतूक कोंडी झाली होती. मात्र, पोलिसांच्या समयसूचकतेमुळे मोठी दुर्घटना टळली. कुंभार याचे समुपदेशन करण्यात आले असून, त्याच्या मुलाच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती पोलिस निरीक्षक संतोष डोके यांनी दिली.

पोलिस ठाण्यात आणल्यानंतर मिथुन कुंभार याला अंगावरील रॉकेलने भिजलेली कपडे बदलायला लावण्यात आली. त्याला आणि त्याच्या चार वर्षीय मुलाला नाष्टा देऊन काही वेळ शांत बसवण्यात आले. त्यानंतर त्याने आपली करुण कहाणी पोलिसांसमोर मांडली. स्वतः अनाथाश्रमात वाढलेल्या मिथुनचे लग्न झाले होते. मात्र, सहा महिन्यांपूर्वी पत्नीने घटस्फोट घेऊन त्याला सोडले.व्याधीग्रस्त मुलाचा सांभाळ करत तो मिळेल ते काम करण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, लहान मुलगा सोबत असल्याने कुणीही काम देत नव्हते. एकल पालकत्वामुळे बालकल्याण संकुलातही मुलाला प्रवेश मिळाला नाही. परिणामी, कडाक्याच्या थंडीत तो मुलाला घेऊन मध्यवर्ती बसस्थानकात आठवडाभर रात्र काढत होता. हाताला काम नाही, खिशात पैसे नाहीत आणि मुलाच्या भवितव्याची चिंता या सगळ्या अडचणींमुळे सर्व उपाय थकल्याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. ही कहाणी ऐकून पोलिसही भावूक झाले. पोलिसांच्या तत्परतेमुळे एका हतबल पित्याचा जीव वाचला असून, त्याच्या मुलाच्या पुनर्वसनासाठी पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

## लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी सांगलीच्या युवकास सक्तमजुरी

(पान १ वरून)

त्यामुळे पिडीतेचे घडलेल्या प्रकाराची कोणतीही माहिती घरी सांगितली नाही.


काही महिन्यांनी पीडितेची मासिक पाळी न आल्याने आईला शंका आली. दि. १८ मे २०१९ रोजी सांगली येथील शासकीय रुग्णालयात पिडीतेची तपासणी केली असता पीडिता तीन महिन्यांची गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले. याबाबत पिडीतेकडे चौकशी केली असता तिने घडला प्रकार आईला सांगितला. त्यानंतर पीडितेच्या आईने विश्रामबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणात पोलीस उपनिरिक्षक जी. जी. माने आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक विरकर यांनी तपास केला. सदर खटला न्यायालयात सुनावणीस आला असता सरकारपक्षातर्फे १३ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये पिडीता आणि तीची आई याची साक्ष महत्वपूर्ण ठरली. न्यायवैद्यकीय पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालात पिडीता आणि आरोपी हेच पिडीतेच्या अर्भकाचे कायदेशीर पालक असल्याचे सिध्द झाले. याकामी न्यायवैज्ञानिक नयना चौधरी यांची साक्ष महत्वपूर्ण ठरली. न्यायालयापुढे आलेल्या साक्षी आणि पुराव्याच्या आधारे विशेष जिल्हा व सत्र न्यायाधिश जे. ए. मोहंती यांनी आरोपी विजय उर्फ यशवंत भुपाल सोनावले यास दोषी ठरवून २० वर्षे सक्तमजुरी आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. पिडीतेवर झालेल्या अत्याचार प्रकरणी शासनाकडून पिडीतेस नुकसान भरपाई मिळण्याकामी आवश्यक ते निर्देश यावेळी देण्यात आले. याकामी पोलीस उपनिरिक्षक अशोक तुराई, पोलीस अंमलदार इमरान महालकरी, कविता निर्मळे, रेखा खोत, सुनीता आवळे, वंदना मिसाळ, सुप्रिया भोसले आदींचे सहकार्य लाभले.

## कुत्रे चावल्यास राज्य सरकार मोबदला देईल– सुप्रीम कोर्ट

(पान १ वरून)

यावेळी सर्वोच्च न्यायालयाने म्हंटले की, कुत्र्यांच्या चाव्यामुळे कोणतीही व्यक्ती जखमी झाली किंवा मृत्यू झाली, तर राज्य सरकारला मोबदला द्यावा लागेल. न्या. विक्रम नाथ यांनी श्वान प्रेमींना जबाबदार मानले आहे. तसेच कोर्टाने असा सल्ला दिला की, भटके कुत्रे भुंकून, चावा घेऊन दहशत पसरवतात. त्यामुळे ज्यांना श्वानांचे खूप प्रेम वाटते त्यांनी भटक्या कुत्र्यांना आपल्या घरी न्यावे असे न्यायालयाने म्हंटले आहे. यावेळी ॲड. मेनका गुरुस्वामी यांनी यावेळी युक्तिवाद केला की, मोकाट कुत्र्यांचा प्रश्न हा संवेदनशील विषय आहे. मात्र सर्वोच्च न्यायालय म्हणाले की, ही संवेदनशीलता फक्त कुत्र्यांसाठी दाखवली जाते. त्यावर आपल्याला लोकांचीही तितकीच काळजी असल्याचे गुरूस्वामी यांनी सांगितले. भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, सुप्रीम कोर्टाने ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सर्व शैक्षणिक संस्था, रुग्णालये, बस स्टँड, क्रीडा संकुल आणि रेल्वे स्थानकांवरून आवारा कुत्र्यांना हटवण्याचा आदेश दिला होता. तसेच, सरकारी आणि सार्वजनिक स्थळांवर कुत्र्यांना प्रवेश न देण्याचा सुद्धा निर्देश दिला होता. त्यांनंतर आज न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय देत मोकाट श्वानांच्या हल्ल्यात जखमी होणारे आणि मृत्यूमुखी पडणारे यांच्या मोबदल्याची जबाबदारी राज्य सरकारकडे वर्ग केली आहे.

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||



**श्री. केशव तुकाराम पाटील**

आमचे मित्र श्री. किरण केशव पाटील यांचे वडिल श्री. केशव तुकाराम पाटील यांचे रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

**राजू कुंभार, राजू घट्टे
रविंद्र कोटगी, राजू आरगे
मित्र परिवार, इचलकरंजी.**

रक्षाविसर्जन : गुरुवार,दि.१५/१/२०२६ रोजी सकाळी ९ वा. पंचगंगातिरी,इचलकरंजी.

# कोल्हापुरात १८४ उपद्रवी मतदान केंद्रांवर बंदोबस्त

कोल्हापूर, ता. १३ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर महानगरपालिकेसाठी १५ जानेवारी रोजी मतदान, तर १६ रोजी मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. शहरातील एकूण ५९४ मतदान केंद्रांपैकी १८४ केंद्रे 'उपद्रवी' म्हणून घोषित करण्यात आली असून, या ठिकाणी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. विशेष पथकांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.**

राजारामपुरी, राजेंद्रनगर, जवाहरनगर, यादव नगर, लक्षतीर्थ वसाहत आदी भागांतील मतदान केंद्रांवर यापूर्वी वादावादी अथवा तणावाचे प्रकार घडल्याचा अनुभव लक्षात घेऊन ही केंद्रे उपद्रवी यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत. मतदानाच्या दिवशी १५रोजी या ठिकाणी कोणताही गैरप्रकार घडू नये, यासाठी पोलिसांचे विशेष लक्ष राहणार आहे.

पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. धीरजकुमार, शहर पोलीस उपअधीक्षक प्रिया पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील चारही पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व कर्मचारी आपापल्या हद्दीत सतर्क आहेत. दोन किंवा त्यापेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेल्या सराईत गुन्हेगारांकडून चांगल्या वर्तणुकीचे बॉन्ड लिहून घेण्यात आले असून, काहींना प्रतिबंधात्मक कारवाईअंतर्गत हद्दपारही करण्यात आले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर व इचलकरंजी हद्दीत 'ड्राय डे' जाहीर करण्यात आला आहे. या काळात चोरट्या मार्गाने दारूची वाहतूक अथवा विक्री होऊ नये, यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने करडी नजर ठेवली आहे.

**असा असेल बंदोबस्त :** पोलीस अधीक्षक १, अप्पर पोलीस अधीक्षक २, पोलीस उपअधीक्षक ६, पोलीस निरीक्षक १४, पोलीस अंमलदार ८५०, वाहतूक पोलीस १२०, राज्य राखीव दल २ तुकड्या, होमगार्ड जवान १२००.




भावपूर्ण श्रद्धांजली!

आमच्या संस्थेचे मा.चेअरमन श्री. महादेव गणपती पाटील यांचे सोमवार,दि.५/१/२०२६ रोजी वयाच्या ७० व्या वर्षी दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

श्री. महादेव गणपती पाटील

भगवान पाटील – चेअरमन
पंडित सुतार – व्हा. चेअरमन
शिवाजी पाटील – सचिव
शामराव ऱ्हाटवड – क्लार्क
सर्व संचालक व सभासद वर्ग.

श्री केदारलिंग विकास सेवा संस्था
पिसात्री, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

उत्तरकार्य – शुक्रवार, दि. १६/१/२०२६ रोजी आहे.




इचलकरंजी महानगरपालिका निवडणुकीचा जाहीर प्रचार मंगळवारी समाप्त झाला. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी महायुतीतर्फे पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची कॉर्नर सभा झाली. तर शिव–शाहू विकास आघाडीकडून पदयात्रेद्वारे शक्तिप्रदर्शन करण्यात आले. (छाया :अनंतसिंग)

# महायुती,शिव-शाहू आघाडीकडून शेवटच्या दिवशी शक्तिप्रदर्शन

## पदयात्रा, कॉर्नर सभेने रणधुमाळी समाप्त

इचलकरंजी,ता.१३–

**महिन्याभरापासून सुरु असलेल्या इचलकरंजी महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीच्या प्रचार तोफा मंगळवारी शांत झाल्या. महायुतीच्या वतीने राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या सभेसह प्रत्येक प्रभागात कॉर्नर सभा घेत तसेच पदयात्रा काढण्यात आल्या. तर शिव –शाहू विकास आघाडीच्या वतीने फुलांची उधळण करत पदयात्रा काढण्यासह कॉर्नर सभा घेण्यात आल्या. प्रचाराच्या तोफा थंडावल्या असल्या तरी खऱ्या अर्थाने दोन दिवसात प्रचाराची रंगत वाढणार असल्याने 'रात्रीस खेळ चाले' पध्दतीच्या प्रचाराची चर्चा सुरु आहे.**

दरम्यान, गुरुवारी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून प्रशासनाच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. बुधवारी सकाळपासून राजीव गांधी भवन येथे मतदान केंद्रांवरील साहित्याचे वितरण केले जाणार आहे.

स्थापनेपासून चार वर्षानंतर इचलकरंजी महानगरपालिकेची पहिलीच निवडणूक होत आहे. १६ प्रभागातील ६५ जागांसाठी भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गट तसेच शिव - शाहू विकास आघाडी आणि अपक्ष मिळून २३० उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. महिनाभर प्रचाराच्या निमित्ताने पदयात्रा काढत घर टू घर भेट देऊन भाग पिंजून काढला आहे. पायाला भिंगरी लावून पळावे लागल्याने सर्वजण मेटाकुटीला आले आहेत. अखेर मंगळवारी प्रचाराची सांगता झाल्याने होणारी दमछाक थांबली असली तरी मंगळवार आणि बुधवार दोन दिवस जुळवाजुळवी अन् रात्रीस खेळ चाले या प्रचाराला गती येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

महायुतीच्या वतीने गावभागातील राणाप्रताप चौक याठिकाणी राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची जाहीर सभा झाली. तर प्रत्येक प्रभागातील महायुतीच्या उमेदवारांनी आपापल्या भागात कॉर्नर सभा घेत प्रचाराची सांगता केली. याठिकाणी आमदार राहुल आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर यांनी उपस्थिती लावली होती. तर खासदार धैर्यशील माने यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रभाग ८ मधील महायुतीचे उमेदवार रवींद्र माने, राहुल घाट, सौ. रुपा बुगड आणि सौ. श्वेता मालवणकर यांची प्रभागातून भव्य अशी रॅली काढण्यात आली. यामध्ये मोठ्या संख्येने महिलांसह नागरिक सहभागी झाले होते. रॅली दरम्यान जागोजागी पिण्यासाठी पाणी देण्यात येत होते. या रॅलीमध्ये पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे याही काहीक्षण सहभागी झाल्या होता.

तर शिव –शाहू विकास आघाडीच्या वतीनेसुध्दा प्रचाराची दमदार सांगता करण्यात आली. भागाभागात पदयात्रा आणि रॅली काढून मतदारांना आवाहन करण्यात येत होते. प्रभाग १५ मधील उमेदवारांनी काढलेल्या रॅलीवर जागोजागी फुलांचा वर्षाव आणि फटाक्यांची आतषबाजी करण्यात येत होता. तर चिन्हाची रांगोळी रस्त्यावर रेखाटण्यात आली होती.

त्याचबरोबर प्रत्येक प्रभागात कॉर्नर सभा घेत प्रचाराची सांगता करण्यात आली. यावेळी शशांक बावचकर, मदन कारंडे, सागर चाळके, राहुल खंजिरे, संजय कांबळे आदींसह नेतेमंडळींची उपस्थिती होती.

# दत्तवाडमध्ये दोन गटांत हाणामारी ; बाराजण जखमी

कुरुंदवाड,ता.१३ (प्रतिनिधी)–

**दत्तवाड (ता. शिरोळ) येथे बाबू विष्णू कांबळे आणि अश्विनी उत्तम कांबळे या दोन गटामध्ये जमिनीचा वाद सुरू आहे. मंगळवारी दोन्ही गटात हाणामारी होऊन लाथाबुक्क्यानी व काठी , खुरप्याने मारहाण करून दोन्ही कडील बारा जणांना जखमी केल्याची घटना दत्तवाड येथे घडली.जखमींवर सरकारी रुग्णालयात उपचार सुरू असून दोन्ही कडून परस्परविरोधी फिर्यादी कुरुंदवाड पोलीस ठाण्यात दाखल झाल्या आहेत.**

बाबू विष्णू कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये संजय मायाप्पा कांबळे, अमर मारुती कांबळे, वैशाली संजय कांबळे, सौ. सुशीला मारुती कांबळे, आदित्य उत्तम कांबळे, (सर्व रा. दत्तवाड)अशी आरोपींची नावे आहेत. अश्विनी उत्तम कांबळे (वय३८ ,रा.नवे दानवाड) यांनी दिलेल्या फिर्यादीत आरोपी किरण बाबू कांबळे (वय ३५), पूजा किरण कांबळे (वय ३०), मंगल बाबू कांबळे, उज्वला शेखर कांबळे, (वय ४५), रवींद्र आप्पासो कांबळे (वय ४० ),अभिजीत शेखर कांबळे (वय ३५), कबीर उर्फ प्रदीप भोपाल कांबळे (वय४५, रा.हरोली) अशी आरोपींची नावे आहेत. मंगळवारी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास आणि सायंकाळी सात वाजता ग्रामीण रुग्णालय येथील गेट समोर या दोन गटात जमिनीच्या वाटणीवरून वाद झाला होता. या वादाचे पर्यावसन हाणामारीत होऊन दोन्ही गटाकडून एकमेकांना लाथाबुक्क्यांनी व काठी,खुरप्याने मारून जखमी करण्यात आले. याप्रकरणी पो.हे कॉं. सानप आणि कराडे हे अधिक तपास करत आहेत.


**नावात बदल**

माझे जुने नाव राकेश शिवाजी मोहिते असे होते ते बदलून नविन नाव अजित शिवाजी मोहिते असे झाले आहे याची नोंद घ्यावी.



महानगरपालिका निवडणूक - २०२५ - २६

आपलं एक मत ठरविणार




मतदान दि १५ जानेवारी २०२६
वेळ - सकाळी ७:३० ते सायं ५. ३०




राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र
MaharashtraSEC

■ संपादकीय ■

## वास्तवावर घणाघात

राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या प्रचारतोफा अखेर काल थंडावल्या. त्यापूर्वी दोन्ही ठाकरे एकत्र आल्यानंतर मुंबईत शिवसेनेची आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची जी एकत्र सभा झाली त्या सभेचा एकूण रागरंग बघितल्यानंतर, राज्यातील महापालिकांच्या निवडणुका आणि राज्याचे आगामी राजकारण याच्यातील रंगत आणखीच वाढणार असल्याची चिन्हे आहेत. या सभेत केवळ राज ठाकरे यांचेच नव्हे, तर शिवसेनेचे युवानेते आदित्य ठाकरे यांचेही जोरदार भाषण झाले. त्यातून भारतीय जनता पक्षाच्याविरोधात महाराष्ट्रात अजूनही ठिणगी ज्वलंत आहे, याचा दाखला मिळाला आहे. मुंबईच्या आधी नाशिकला दोन्ही ठाकरेबंधूंची अशीच जोरदार सभा झाली होती; पण मुंबईत झालेल्या सभेत राज ठाकरे यांनी देशावर एकाच विशेष मर्जी असलेल्या अदानी या उद्योजकाचे किती भयंकर अरिष्ट निर्माण झाले आहे. याचे व्हिडीओ सादरीकरण केले. हे सादरीकरण उपस्थितांसाठी धक्कादायक तर होतेच, पण टीव्हीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ज्या नागरिकांनी हे सादरीकरण पाहिले त्यांच्यावरही अवाक् होण्याची वेळ आली. मोदी सत्तेवर येण्यापूर्वी म्हणजे सन २०१४ पर्यंत अदानी यांचे संपूर्ण देशात नेमके किती प्रकल्प होते आणि आज २०२५ पर्यंत अदानी उद्योगसमूह देशात कसा अक्राळविक्राळ स्वरूपात पसरला आहे, याचे सादरीकरण त्यांनी केले. महाराष्ट्रावरही अदानी उद्योगसमूहाचे झालेले आक्रमण त्यांनी उपस्थितांना समजावून सांगितले. एखादा उद्योगपती स्वतःच्या जीवावर उत्तुंग भरारी मारत असेल तर त्यात आक्षेप घेण्यासारखे काहीही नसते, पण येथे अदानींच्याबाबतीत वस्तुस्थिती उलट आहे. केवळ त्यांच्यावर सरकारचा विशेष लोभ आहे, म्हणून देशातला प्रत्येक महत्त्वाचा उद्योग प्रकल्प अदानींच्या घशात घातला जात असेल आणि ही हाव जर विकृत राक्षसी स्वरूपात असेल तर त्याचे देशाच्या भविष्यातील अर्थकारणावर भयंकर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीत. देशातील सगळी महत्त्वाची विमानतळे, सगळी महत्त्वाची बंदरे आणि एक वीज प्रकल्प, अनेक सरकारी कंपन्या, अनेक सिमेंट कंपन्या एकट्या अदानींना दिल्या गेल्या आहेत. हे प्रकल्प अदानींला देताना प्रत्येक ठिकाणी मोठे आर्थिक घोटाळे झाल्याचे आरोप आहेत. त्यासंदर्भातील अनेक बातम्या अनेक वेळा येऊन गेल्या, पण देशपातळीवर त्याची कधीच फारशी गांभीर्याने दखल घेतली गेली नाही. संसदेतसुद्धा अदानी या विषयावर बोलायला कायमच अलिखित सेन्सॉरशीप आहे. किंबहुना अदानी किंवा अंबानी यांचे नाव संसदेच्या कुठल्याही सभागृहात उच्चारता येत नाही. अशी चौफेर कोंडीची व्यवस्था करून अदानींना सरकारी आशीर्वादाने मोकाट सोडले गेले असल्याचे जे आरोप आहेत ते खोटे असल्याचे म्हणता येणार नाही. अदानींच्या संपूर्ण महाराष्ट्रव्यापी उद्योगांचा तपशील राज ठाकरे यांनी सादर केला. वास्तविक राज ठाकरे यांनी सादर केलेल्या तपशिलात काही नवा गौप्यस्फोट होता असे नाही. पण त्यांनी एकत्रितपणे केलेले हे सादरीकरण लोकांच्या डोळ्यात अंजन घालणारे ठरले. ज्या विषयावर कोणी आजवर इतक्या प्रभावीपणे बोलले नाही, तो विषय राज ठाकरे यांनी अत्यंत परिणामकारकपणे या सभेत लोकांपुढे सादर केला, त्याचे पडसाद या पुढील काळात सातत्याने उमटत राहतील. आदित्य ठाकरे यांचे भाषणही परिणामकारक होते. मुंबईच्याबाबतीत भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी जे जे दावे केले त्या दाव्यांची आदित्य ठाकरे यांनी उत्तम पोलखोल केली. मुंबईचा कोस्टल रोड आम्हीच केला, असा एक दावा भाजपचे लोक अलीकडच्या काळात सातत्याने करीत आहेत, पण हा दावा कसा खोटा आहे, याची माहिती फोटोंच्या पुराव्यासह आदित्य यांनी सभेत सादर केली. मुंबईत शिवसेनेची २५ वर्षे सत्ता आहे. या पंचवीस वर्षांच्या काळात शिवसेनेने मुंबईकरांसाठी काय केले, असाही प्रश्न भाजपचे लोक अगदी सहजपणे विचारत असतात. त्याअनुषंगानेही आदित्य ठाकरे यांनी थेट नेमकी माहिती सादर करीत उपस्थितांवर चांगलीच छाप पाडली. निवडणुकीचे राजकारण हे एकतर्फी थापा मारणे आणि खोट्या माहितीचा डंका वाजवणे या शैलीचे असते आणि ही शैली सत्ताधाऱ्यांना खूप चांगली अवगत झाली आहे. या शैलीपुढे अनेक प्रबळ राजकीय विरोधक ठिकठिकाणी गारद होताना दिसत आहेत. निवडणुकीत वातावरणनिर्मितीसाठी जे फंडे वापरावे लागतात त्याबाबतीतही भाजप माहीर आहे. ऐन निवडणूककाळात विरोधी पक्षांच्या मातब्बर सरदारांना फोडणे आणि त्यांना आपल्यात सामील करून घेणे हे तंत्रही त्यांना चांगले अवगत झालेले आहे. या सगळ्या निवडणूक तंत्राचा वापर करून भारतीय जनता पक्षाने ठाकरेबंधूंना मुंबईत चांगलेच कोंडीत पकडलेले दिसले. त्यामुळे ठाकरेबंधूंसाठी ही शेवटची अस्तित्वाची लढाई आहे. या लढाईत ते टिकाव धरू शकतील की नाही, हे पहायचे.

# मकर संक्रांतीचा संदेश

**मकर संक्रांत हा भारतीय संस्कृतीतील एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि पवित्र सण मानला जातो. खगोलशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर या दिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. याला 'मकर संक्रमण' असे संबोधले जाते. भारतीय परंपरा आणि रितीरिवाजांनुसार हा काळ अत्यंत शुभ फलदायी मानला जातो. संपूर्ण भारतात हा सण विविध नावांनी आणि आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला जात असला तरी त्याचा थेट संबंध कृषीजीवनाशी, ग्रामीण लोकसंस्कृतीशी आणि सुगीच्या हंगामाशी आहे. या सणामागचा मुख्य उद्देश समृद्धी, सकारात्मकता आणि आनंदाचा प्रसार करणे हाच असतो.**

हा सण प्रामुख्याने भारतीय बळीराजाचा असला, तरी समाजातील प्रत्येक घटक यात उत्साहाने सहभागी होतो. मकर संक्रांतीच्या निमित्ताने सूर्याचे होणारे राशी परिवर्तन विश्वाला सकारात्मक ऊर्जा प्रदान करते अशी जनमानसात धारणा आहे. या सणाला सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि पौराणिक अशा त्रिविध पैलूंची जोड लाभलेली आहे. आध्यात्मिक स्तरावर, सूर्याचे हे संक्रमण प्रार्थना, धार्मिक विधी आणि साधना करण्यासाठी अत्यंत फलदायी मानले जाते. सांस्कृतिक दृष्ट्या हा निसर्गाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा सोहळा आहे. ऐतिहासिक संदर्भांनुसार, हा उत्सव वैदिक काळापासून साजरा केला जात आहे. प्राचीन काळी राजे-महाराजे या दिवशी गोरगरिबांना दानधर्म करत आणि मोठ्या मेजवान्यांचे आयोजन करत असत. पौराणिक कथांनुसार, महाभारतातील भीष्म पितामहांनी आपला देह त्यागण्यासाठी याच शुभ काळाची निवड केली होती. मकर संक्रांतीमागे एक ठोस खगोलशास्त्रीय कारण दडलेले आहे. या दिवशी 'विंटर सॉल्स्टिस' म्हणजेच हिवाळ्यातील सर्वात लहान दिवसाचा काळ संपून सूर्य उत्तरायणाकडे झुकू लागतो. याचाच अर्थ पृथ्वी सूर्याच्या जवळ येऊ लागते आणि दिवसाचा कालावधी रात्रीपेक्षा मोठा होऊ लागतो. विज्ञानाच्या दृष्टीने हे उन्हाळ्याच्या आगमनाचे प्रतीक आहे. सूर्याच्या या उत्तर दिशेकडील प्रवासाचा पृथ्वीवरील ऋतूचक्र आणि हवामानावर मोठा परिणाम होतो. वाढलेली उष्णता आणि सूर्यप्रकाश पिकांच्या वाढीसाठी अत्यंत पोषक असतो, म्हणूनच शेतकऱ्यांसाठी हा सुगीचा काळ ठरतो. निसर्गातील या बदलामुळे शिशिरातील पानगळ थांबून झाडांना नवी पालवी फुटू लागते, फुले फुलतात आणि संपूर्ण परिसंस्था पुन्हा चैतन्यमय होते.प्राचीन काळापासून संक्रांतीच्या दिवशी पहाटे लवकर उठून पवित्र नद्यांमध्ये स्नान करण्याची आणि सूर्याला अर्घ्य देण्याची परंपरा आहे. हा दिवस केवळ स्वतःचा आनंद साजरा करण्याचा नसून समाजातील गरजू घटकांना



मदत करण्याचा देखील आहे. अनेक सेवाभावी संस्था आणि नागरिक या दिवशी अन्नदान व वस्त्रदान करून सामाजिक बांधिलकी जपतात. घराघरात तीळ आणि गुळाचे गोड पदार्थ बनवले जातात आणि ते एकमेकांना 'तिळगुळ घ्या गोड बोला' असे म्हणत दिले जातात. यामुळे आपापसातील नातेसंबंध अधिक दृढ होतात.

दैनंदिनी

गुजरातमध्ये या दिवशी पतंग उडवण्याची विशेष परंपरा आहे, जी मानवी स्वातंत्र्याचे आणि यशाची उंच शिखरे गाठण्याच्या जिद्दीचे प्रतीक मानली जाते. पतंग उडवताना तासन्तास सूर्यप्रकाशात राहिल्यामुळे शरीराला 'ड' जीवनसत्त्व मिळत असल्याने याला आरोग्यशास्त्राच्या दृष्टीनेही महत्त्व आहे.भारताच्या भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधतेनुसार मकर संक्रांतीच्या परंपरांचे स्वरूप बदलत जात असले तरी या सर्वांचा मूळ गाभा निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हाच आहे. महाराष्ट्रात हा सण अतिशय आपुलकीने साजरा केला जातो. या दिवशी काळे वस्त्र परिधान करण्याची परंपरा आहे. सुवासिनी स्त्रिया या काळात सुगड पूजनासह हळदी-कुंकवाचे वाण लुटतात, तर लहान मुलांच्या कल्याणासाठी 'बोरन्हाण' सारखे संस्कार केले जातात. शेजारच्या गुजरात राज्यामध्ये या सणाचे रूपांतर 'उत्तरायण' नावाच्या भव्य महोत्सवात होते. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वजण रंगीबेरंगी पतंग उडवतात. थंडीत ऊन कमी असल्यामुळे आपसुकच स्थूलपणा जाणवतो. त्यामुळेच शरीराची हालचाल व्हावी आणि सूर्याची किरणं अंगावर पडावीत यासाठी पतंग उडवला जातो, असं म्हणतात. पंजाब आणि हरियाणा प्रांतात संक्रांतीच्या पूर्वसंध्येला 'लोहरी' साजरी करण्याची परंपरा असून तिथे रात्रीच्या वेळी शेकोटी पेटवून त्याभोवती लोक भांगडा आणि गिद्धा नृत्य करतात. तसेच अग्नी देवतेला नवीन पिकातील तीळ आणि मका अर्पण केला जातो.

दक्षिण भारतात तामिळनाडूमध्ये 'पोंगल' हा उत्सव सलग चार दिवस चालतो. तिथे मातीच्या नवीन भांड्यात तांदूळ आणि गुळाचा भात शिजवून तो सूर्यदेवांना अर्पण केला जातो आणि 'पोन्गालो पोंगल' अशा घोषणा दिल्या जातात. कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात देखील हा सण पिकांच्या कापणीचा आनंद म्हणून साजरा होतो. उत्तर भारतात विशेषतः उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये या सणाला 'खिचडी' म्हटले जाते, जिथे पवित्र नद्यांमध्ये स्नान करून तांदूळ आणि डाळीचे दान करण्याला अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते. प्रयागराजच्या संगमावर या काळात कुंभमेळ्याचे किंवा माघ मेळ्याचे आयोजन केले जाते, जिथे लाखो भाविक श्रद्धेने स्नान करतात. पूर्वेकडील पश्चिम बंगालमध्ये हा सण 'पौष संक्रांती' म्हणून साजरा होतो, जिथे गंगासागर येथे मोठी जत्रा भरते आणि लोक समुद्रात पवित्र स्नान करतात. आसाममध्ये याच काळात 'माघ बिहू' किंवा 'भोगाली बिहू'चा उत्साह असतो, जिथे बांबूच्या 'मेजी' रचून त्या जाळल्या जातात आणि लोक सामूहिक भोजनाचा आनंद घेतात. राजस्थानमध्ये विवाहित स्त्रिया आपल्या सासूला वाण देऊन त्यांचा आशीर्वाद घेतात, तर केरळमध्ये शबरीमला मंदिरात 'मकरविलक्कु' या दैवी ज्योतीचे दर्शन घेण्यासाठी देशभरातून भाविक जमतात. अशा प्रकारे हिमाचलच्या पहाडांपासून ते कन्याकुमारीच्या किनारपट्टीपर्यंत मकर संक्रांत ही विविध रूपांतून भारतीय संस्कृतीतील समृद्धता आणि निसर्गाशी असलेले मानवाचे अतूट नाते अधोरेखित करते.

**लोकशाही पद्धतीमध्ये निवडणूक प्रक्रियेला अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे ही प्रक्रिया एखाद्या उत्सवाप्रमाणे पार पडते. राजकीय पक्षाचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते या उत्सवात हिरीरीने सहभागी होत असले, तरी या उत्सवाचा उत्सवमूर्ती असतो तो मतदारराजा. त्याच्या उपस्थितीशिवाय या उत्सवाला अर्थ नसतो. त्याला या सर्व प्रक्रियेत केवळ एकदा सहभागी व्हायचे असते. स्वतःच्या, आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या, भवितव्याचा निर्णय त्याला या एका दिवसात घ्यायचा असतो त्यामुळे तो योग्यही असायला हवा हे पाहण्याचे दायित्वही त्याचेच असते.**



# बजावू मतदानाचे कर्तव्य

मतदानाचे महत्व किती आहे हे जुन्या जाणत्या मतदारांना ठाऊक नाही असे नाही तरीही निवडणुका जवळ आल्या की प्रशासन मतदारांमध्ये जागृती करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असते. विविध प्रसिद्धी माध्यमांसह सामाजिक माध्यमांवर मतदान करण्याबाबत जागृती करण्यासाठी जाहिराती दिल्या जातात. गर्दीची ठिकाणे, प्रवासी वाहने यांतूनही मतदारांचे प्रबोधन केले जाते. केवळ मतदारांना जागृत करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. एव्हढे सर्व करूनही मतदानाचा टक्का जेमतेम पन्नाशी पार करतो. ज्या व्यवस्थेत देशातील केवळ पन्नास टक्के जनताच ती घडवण्यात सहभाग घेते ती व्यवस्था सक्षम आहे असे कसे म्हणता येईल. चार चौघांत या लोकशाही व्यवस्थेचे वाभाडे काढणारी, राज्यकर्त्यांना शिव्या देणारी, राज्याच्या आणि देशाच्या बिघडलेल्या स्थितीवर तोंडसुख घेणारी जनता जेव्हा या सर्वांमध्ये बदल घडवण्याची संधी आपल्या हाती मिळते तेव्हाच पळ का काढते ?

माझा समाज, जिल्हा सक्षम व्हायला हवा, येथील जनता सुखाने नांदायला हवे, येथील नागरिकांना सर्व सोयी-सुविधा आणि संरक्षण मिळायला हवे त्यामुळे यापुढे असे करून चालणार नाही. लोकशाही सक्षम करायची असेल तर सर्वप्रथम मतदान करण्यासाठी घराबाहेर पडायला हवे. त्याहीपुढे जाऊन आपल्या घरातील आणि आपल्या परिसरातील कोणी मतदाता मतदानापासून वंचित राहू पाहत असेल तर त्याचेही प्रबोधन करून त्याला मतदान करण्यास प्रवृत्त करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्यच आहे. लोकप्रतिनिधींच्या कामाबद्दल आपला रोष आपण वर्षभर प्रकट करतच असतो मात्र त्यांना अद्दल घडवण्याची आणि योग्य लोकप्रतिनिधी निवडण्याची संधी आपल्याला पाच वर्षांतून एकदा मिळते ती दवडता कामा नये. यंदा तर ही संधी तब्बल आठ वर्षानंतर मिळते आहे.

२००४ च्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीत उमेदवार ए. आर. कृष्णमूर्ती यांना ४०७५१ मते पडली, तर त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराला ४०७५२ मते पडली, परिणामी ए. आर. कृष्णमूर्ती यांचा केवळ एका मताने पराभव झाला. २००९ च्या राजस्थान राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री पदाचे दावेदार असलेले सी.पी. जोशी यांना ६२२१५ मते पडली, तर त्यांच्या विरोधात उभे राहिलेल्या कल्याण सिंह चौहान यांना ६२२१६ मते पडली. अटीतटीच्या या लढतीमुळे सी.पी. जोशी यांना आमदारकीसह मुख्यमंत्री पदावरही पाणी सोडावे लागले. १९९९ साली अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना विरोधी पक्षांनी विद्यमान सरकारविरोधात अविश्वास ठराव आणला. वाजपेयी या ठरावाला हिंमतीने सामोरे गेले. या ठरावावर झालेल्या मतदानात अटल बिहारी वाजपेयी यांच्या बाजूने २६९ मते पडली, तर विरोधात २७० मते पडली. केवळ एका मताच्या फरकामुळे वाजपेयी सरकार १३ दिवसांतच कोसळले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मतदारांची संख्याही अल्प असल्याने याठिकाणीही अशाप्रकारची चुरस असते. अनेकदा उमेदवार हाताच्या बोटावर मोजता येईल इतक्या फरकाने निवडून येतात. एका मताचे महत्व सांगणारी अशी अनेक उदाहरणे जगाच्या राजकारणात होऊन गेली आहेत त्यामुळे एक मताने काय फरक पडणार आहे असे म्हणणेच मुळात चुकीचे आहे. लोकांच्या मनात लोकशाही किती रुजली आहे हे निवडणुकांतील मतदानाच्या टक्केवारीवरून दिसून येते. विश्वातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून बिरुद मिरवणाऱ्या भारतातील मतदारांची मतदानाविषयीची नाराजी निंदनीय आहे, ही टक्केवारी वाढवण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक आहे.

■ जगन घाणेकर

# वसा पालकत्वाचा

अपत्य जन्मानंतर नवरा बायको हे आई वडील म्हणजेच पालक बनतात. पालकत्व ही फार मोठी जबाबदारी आहे. पालकांना एक जीव घडवायचा असतो. गर्भात असल्यापासून जन्म झाल्यानंतर काही वर्षे त्या मुलाचा मेंदू फक्त ग्रहण करत असतो. ग्रहण केल्यानंतर त्याचे विश्लेषण करण्याची क्षमता जेव्हा त्याच्यात येते तेव्हा तो सज्ञान होतो. सज्ञान होण्यापूर्वीची ही काही वर्षे खूप महत्त्वाची असतात. याचवेळी त्याच्यावर जे संस्कार होतात त्याप्रमाणे तो पुढे जाऊन चांगला किंवा वाईट व्यकती होतो. हेच सत्य ओळखून हिंदू धर्मात गर्भसंस्काराचे महत्त्व आहे. आधुनिक वैद्यक शास्त्रानुसार देखील गर्भधारणा झाल्यावर पती-पत्नीने सिगरेट, दारू पिऊ नये, आपसात भांडण करू नये, रात्री उशिरा झोपणे, मोबाईल, टीव्हीचा जास्त प्रमाणात वापर टाळण्याचा सल्ला दिला जातो. चांगले वाचणे, चांगले ऐकणे, सात्विक शुद्ध आहार घेणे, व्यायाम करणे हे बाळाच्या वाढीसाठी महत्त्वपूर्ण ठरते. डॉक्टरांनी सांगितले की सर्वजण ते करतात पण आपल्या धर्मात सांगितलेल्या गोष्टींचा उपहास केला जातो.

आहार, आचार आणि विचार ही जीवनाची त्रिसूत्री आहे. हे जर चांगले असेल तर जन्माला येणारी पिढी ही सुसंस्कृतच असते. मुलांनी जे मागितले,जेव्हा मागितले, ते क्षणाचाही विचार न करता आणून दिले जाते. मुलांना त्याची सवय होते. नाही, नकार ऐकण्याची सवय नसते. ही सवय भविष्यात घातक ठरू शकते. आचरणाच्या बाबतीत म्हणायचे झाले तर जसा पेहराव आई वडील करतात अगदी तसाच पेहराव मुले वापरतात याची जाणीव ठेवणे गरजेचे आहे.हिंदू वैचारिक आतंकवादाचे बळी ठरले आहे त्यामुळे ते आपल्या संस्कृतीपासून विन्मुख झाले आहे. पाश्चात्य विकृती आपण अंगीकारली आहे. त्यामुळे आपले विचार स्वार्थी बनत चालले. विचारनुसारच आपली कृती होत असते.आपल्या मुलांना आपल्याच सहभागाची सगळ्यात अधिक आवश्यकता आहे. जन्म दिल्याने पालक होता येत नाही आणि शाळा, उपक्रम, मैदान,शिबिरे यांचे शुल्क भरल्याने संगोपन होत नाही. आपल्या मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचे शिल्प अधिक देखणे करायचे असेल तर टाकीचे घाव सोसल्याविना मुलांना उत्तमपण येणार नाही आणि हे घाव योग्य वेळी पालकांनीच घातले पाहिजे. हे घालत असताना पालकांनी प्रथम स्वतःमध्ये चांगले आचार, चांगले विचार आणि आहार घेणे आणि सुसंस्कार घडवून आणणे गरजेचे आहे. मुलं ही अनुकरणप्रिय असतात त्यामुळे आपले पाहून ते तसे वागतात. आपल्यातील बदल हाच मुलांमध्ये बदल घडवू शकतो.

■ लीना गाडगीळ

## वाचकांचा पत्रव्यवहार

### भूगोलाचे महत्व अनन्यसाधारण

आज १४ जानेवारी, आजचा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो हे खूपच कमी लोकांना माहित आहे. भूगोल हा विषय आपण लहान वयापासूनच शिकत आलो असूनही भूगोलाचे परिपूर्ण ज्ञान आपल्याला अजूनही मिळवता आले नाही. डॉ. सी. डी. देशमुख हे भूगोल विषयातील अत्यंत जाणकार व्यक्ती मानले जातात. त्यांचे भूगोलातील ज्ञान अफलातून होते म्हणूनच त्यांना भूगोल महर्षी असे म्हटले जाते. भूगोल महर्षी सी.डी. देशमुख यांचा १४ जानेवारी हा जन्मदिवस. भूगोल विषयात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असे आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो. भूगोलाची तीन गटात विभागणी केली आहे.-प्राकृतिक भूगोल,मानवी भूगोल, प्रादेशिक भूगोल.



प्राकृतिक भूगोलात भूरूप शास्त्र, हवामान शास्त्र, जैविक शास्त्र यांचा समावेश होतो. यासोबत किनारी प्रदेश, खनिज शास्त्र आणि नैसर्गिक आपत्ती यांचाही समावेश होतो.

मानवी भूगोलात ऐतिहासिक भूगोल, सांस्कृतिक व सामाजिक भूगोल, लोकसंख्या, आर्थिक व राजकीय भूगोलाचा समावेश होतो. प्रादेशिक भूगोलात पर्यावरणाचे व्यवस्थापन आणि विविध संसाधन स्त्रोतांचे जनन व संवर्धन यांचा समावेश होतो. भूगोलाच्या सखोल आणि सविस्तर अभ्यासात विविध पद्धतीचा समावेश केला जातो. प्रत्यक्ष क्षेत्र, निरीक्षण, नकाशे यांना भूगोलात महत्वाचे स्थान आहेच पण आजकाल दुरसंवेदी कृत्रिम उपग्रह, ड्रोण, कॅमेरे, हवाई चित्रीकरण यांनी भूगोलाच्या निरीक्षण क्षमतेत भर घातली आहे. मानवी जीवनात भूगोलाचे महत्व अनन्यसाधारण आहे. आपण जगतो ते जग, त्याचे स्वरूप विविध प्रदेश, देश, तेथील लोकजीवन यांचे ज्ञान आपल्याला भूगोलामुळेच होते.

■ श्याम ठाणेदार

## जय पराजय मोठ्या मनाने स्वीकारा

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शहरी भागात होणाऱ्या महानगरपालिका निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जातात. मागील चार वर्षांमध्ये महानगरपालिकेचे सभागृह अस्तित्वात नसल्यामुळे या भागातील कारभाराचे सर्वाधिकार प्रशासक म्हणून आयुक्ताकडेच गेले होते. त्यामुळे लोकप्रतिनिधी विना प्रशासनाची कामे होत होती. दरम्यानच्या काळात अनेक वळणे घेत अखेरीस निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर रोजी राज्यातील २९ महानगरपालिकांचा निवडणुका कार्यक्रम जाहीर केला.

१५ जानेवारी रोजी मतदानाची प्रक्रिया पार पडणार असून दुसऱ्या दिवशी म्हणजे १६ जानेवारी रोजी लगेच मतमोजणी केली जाणार आहे. प्रदीर्घ काळानंतर या सर्व महानगरपालिकामध्ये प्रशासकाची राजवट जाऊन लोकप्रतिनिधींचे राज्य येणार आहे. पहिल्यांदाच २९ महानगरपालिकामध्ये नव्याने निवडणुका होत आहेत त्यामुळे या निवडणुकांकडे संपूर्ण राज्यासह देशाचे लक्ष लागून राहिले आहे. सहा-सात वर्षांपूर्वी जेव्हा महापालिका निवडणुका झाल्या तेव्हाची परिस्थिती आणि वर्तमानातील स्थिती यामध्ये फरक पडला आहे. स्थानिक पातळीवरील अनेक नेत्यांची बेडूक उड्या मारत पक्षांतरी केली आहेत. त्यांच्या मागे अनेक कार्यकर्ते झेंडे घेऊन गेले आहेत. काही कार्यकर्त्यांनी पक्षनिष्ठा जपली असली तरी निवडणुका पार पडे पर्यंत ते एकनिष्ठ राहतील का याची हमी देता येत नाही. असे राज्यातील चित्र दिसत आहे.राज्यातील अनेक ठिकाणी प्रचारात साम,दाम,दंड,भेद याचा वापर मोठ्या प्रमाणात दिसून आला. तसेच गालबोट लागल्याचे काही ठिकाणी दिसून आले. पण असे होत असताना संविधानाला जागून शांततेत प्रशासनाला मदत करून निवडणूक प्रक्रिया पार पडणे आवश्यक आहे. निवडणूक म्हटले की एकाची जीत होणार आणि एकाची हार होणार निकालानंतर उमेदवार त्यांच्या उत्साही कार्यकर्त्यांनी संयम ठेवून निवडणुकीतील आलेला जय पराजय मोठ्या मनाने स्वीकारला पाहिजे.

■ दीपक पंडित,इचलकरंजी

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**बुधवार,ता.१४.१.२०२६,** विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५२, शालिवाहन शके १९४७, विश्वावसुनाम संवत्सरे उत्तरायणे, हेमंत ऋतो, पौष मासे,कृष्ण पक्षे,एकादशी तिथी १७.५३ नंतर द्वादशी तिथी,अनुराधा नक्षत्र,२७.०४ नंतर ज्येष्ठा नक्षत्र, वृश्चिक रास, गंड योग १९.५६ नंतर वृद्धी योग,बालव करण १७.५३ नंतर, कौलव करण ३१.०७ पर्यंत,दिनमान ११.०६,सुर्योदय ७.०९,सुर्यास्त १८.१५(कोल्हापूरचे) राहू काळ दुपारी १२ ते १.३०, षटतिला एकादशी,मकर संक्रांत,तिळगूळ वाटणे,रवि मकरेत १५.८ वाजता, संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ यात्रा प्रयाग स्नानारंभ,संक्रांती पुण्यकाळ दुपारी ३.०८ ते सुर्यास्तापर्यंत,अमृत २७.०४ पर्यंत, सौर शिशिर ऋतो.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## * राशीभविष्य

**मेष**-पैसे मिळविण्याच्या नव्या संधी लाभदायक असतील. रिकाम्या वेळेचा आज तुम्ही सदुपयोग कराल.तिऱ्हाईत व्यक्ती तुमच्या जोडीदारामध्ये भांडण लावून द्यायचा प्रयत्न करेल.

**वृषभ**-तुमच्या वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल.धाडसाने उचलेली पावले आणि घेतलेले निर्णय लाभदायक ठरतील. अत्यंत काळजीपूर्वक वागण्याचा दिवस आहे.

**मिथून**-तुम्ही खूपच तणावाखाली असाल तर, आपल्या मुलांबरोबर अधिक वेळ व्यतीत करा. पैशाची उधळपट्टी करु नका. कामानिमित्त प्रवासाचा योग.

**कर्क**-ज्या लोकांनी कुणाकडून उधार घेतलेले आहे त्यांना उधार चुकवावे लागू शकते ज्यामुळे आर्थिक स्थिती कमजोर होईल. कामात यश मिळेल.मनासारख्या घटना घडणार नाहीत.

**सिंह**-दीर्घकालीन फायद्यासाठी शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूक फायदेशीर ठरेल. आश्चर्यकारक घटना घडतील. मुलांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष यामुळे तुम्ही निराश व्हाल.

**कन्या**-मित्रांचे कामात सहकार्य लाभेल. अनेक माध्यमातून आर्थिक लाभ होतील. तुम्ही इतरांच्या चुका विनाकारण दाखविल्यामुळे नातेवाईक तुमच्यावर टीका करतील.

**तुळ**-आशावादी रहा आणि चांगल्या उजळ बाजूकडे लक्ष द्या. आपल्या आत्मविश्वासाला अपेक्षांची जोड मिळाल्यामुळे आपल्या आशा आकांक्षा आणि स्वप्ने प्रत्यक्षात येतील.

**वृश्चिक**-आरोग्य चांगले असेल. नोकरी पेशाने जोडलेल्या लोकांना आज धनाची खूप आवश्यकता असेल.आर्थिक अडचणींवर मात करणे शक्य होईल.

**धनु**-अतिशय प्रभावी व्यक्तींच्या पाठिंब्यामुळे तुमचे मनोधैर्य उंचावेल.भुतकाळात केलेल्या गुंतवणुकीचा आज चांगला फायदा मिळेल. वादविवाद टाळा.

**मकर**-कामाच्या जागी आपण स्वतःला खूपच खेचल्यामुळे कौटुंबिक गरजा आणि आवश्यकता, अपेक्षांकडे दुर्लक्ष होऊ शकते. मेहनतीमुळे उद्दीष्टपूर्ती होईल.

**कुंभ**-ज्या लोकांनी लोन घेतले होते त्यांना त्या कर्जाच्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. घरगुती कामं कंटाळवाणी होतील तुम्ही कठोर बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मीन**-कठोर परिश्रम आणि योग्य प्रयत्नांमुळे चांगले फळ आणि पारितोषिक मिळू शकते.आगाऊ ठरविलेली प्रवासाची योजना कुटुंबातील आजारपणामुळे पुढे ढकलावी लागेल.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# मतदारसंघात ८५०० महिलांना उज्ज्वला गॅस योजनेचा लाभ

## आम.शशिकला जोल्ले

निपाणी,ता.१३(वार्ताहर)-

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियान राबवून घरोघरी शौचालयाची निर्मिती करून महिलांचा सन्मान केला. त्यानंतर २०२५ पर्यंत प्रत्येक घरात गॅस देऊन महिलांचा सन्मान करण्याचे अभिवचन दिले होते. ते आज देशात पूर्ण होत आले आहे. उज्ज्वला गॅस योजनेअंतर्गत घरोघरी मोफत गॅस योजना दिली जात आहे. आपणही आमदार झाल्यानंतर २०१४ पासून आजपर्यंत निपाणी मतदारसंघात ८५०० महिलांना उज्ज्वला योजनेचे मोफत गॅस वितरण केले असल्याचे प्रतिपादन आमदार शशिकला जोल्ले यांनी केले.**



निपाणी: येथे असंघटीत कामगारांना आलेल्या विविध योजनेच्या साहित्याचे वितरण करताना आम.शशिकला जोल्ले, कामगार अधिकारी संजीव भोसले, दर्शन उपाध्ये व इतर.

येथील राजा शिवछत्रपती सांस्कृतिक भवनात उज्ज्वला गॅस योजनेच्या लाभार्थ्यांना गॅस वितरण, कामगारांना कामगार विभागाकडून आलेले विविध साहित्य व पोस्ट खात्यातर्फे विश्वकर्मा योजनेतून विविध उद्योग व्यवसायिकांना आलेल्या साहित्याचे वितरण करताना आमदार जोल्ले बोलत होत्या. पुढे बोलताना आम.जोल्ले म्हणाल्या, निपाणी मतदारसंघाचे नेतृत्व करताना केंद्र व राज्य शासनाकडून येणारी प्रत्येक योजना मतदारसंघातील तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे प्रामाणिक काम केले आहे. असंघटित कामगार, लहान मोठे व्यवसाय करणारे कारागीर आणि महिलांना व्यवसाय उद्योगासाठी नेहमीच केंद्र व राज्य शासनाच्या योजना उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळेच यावर्षी १५१२ महिलांना उज्ज्वला गॅस योजना देण्यात आली आहे. देशात ११ कोटी महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.तर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २०१९ पासून सुरू केलेली विश्वकर्मा योजना ही अत्यंत महत्त्वाची योजना आहे. कारण या समाजाचे देशाच्या विकासात मोठे योगदान आहे. त्यामुळे त्यांना शासकीय स्तरावर मदत मिळावी यासाठी ही योजना सुरू आहे. निपाणी मतदारसंघातील २०० जणांना या योजनेचा लाभ झाला आहे. तर बांधकाम क्षेत्रातील कामगारांना अनेक शासकीय योजनाचा लाभ मिळवून दिला आहे. कोरोना काळात पाच ते सहा हजार लोकांना धान्याचे किट वितरण करण्यात आले आहे. त्याचबरोबर त्यांना अपघात विमा पेन्शन मुलांना शिष्यवृत्ती आणि मुलांच्या लग्नासाठी ५० हजाराची मदत मिळवून देण्यात आली आहे. त्यामुळे येथून पुढेही निपाणीच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या सर्व योजना प्रामाणिकपणे राबविणार असल्याचे सांगितले.

यावेळी कामगार विभागाचे अधिकारी संजीव भोसले, पोस्ट मास्तर दर्शन उपाध्ये यांनी कामगारांसाठी आणि विश्वकर्मा योजनेतून येणाऱ्या योजनेची सविस्तर माहिती देऊन लाभ घेण्याचे आवाहन केले. यावेळी भाजपा शहर अध्यक्ष राजू गुंदेशा, माजी नगराध्यक्ष जयवंत भाटले यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास माजी उपनगराध्यक्ष सुनील पाटील, संतोष सांगावकर, रवी कदम, विजय टवळे, बंडा घोरपडे, योगिता घोरपडे, जिजाबाई राऊत, प्रणव मानवी यांच्यासह कार्यकर्ते व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार संपतराव कुरणे यांनी मांनले.

## निपाणीत १६ रोजी स्वामी समर्थ पालखी परिक्रमा

निपाणी,ता.१३(प्रतिनिधी)-

**अक्कलकोट येथील स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या मार्गदर्शनाखाली राजमणी ग्रुप, निपाणी फुटबॉल अकॅडमी, निपाणी भाग श्रीस्वामी समर्थ सेवा समितीतर्फे अक्कलकोट श्रीस्वामी समर्थ पादुका पालखी परिक्रमेचे शुक्रवारी ता.१६ रोजी निपाणीत आगमन होणार आहे.**

शुक्रवारी सकाळी ९ वाजता अशोकनगरात पालखी व पादुका आगमन,त्यानंतर आंदोलन नगरातील श्रीस्वामी समर्थ मंदिरात पादुका दर्शन होणार आहे. दुपारी १२ वाजता स्वराज्य नगरातील दुसऱ्या गल्लीतील वटवृक्ष श्रीस्वामी समर्थ मंदिर पादुका दर्शन, दुपारी १ वाजता स्वामी भक्तांना पालखी व पादुका दर्शन होणार आहे. दुपारी ३ वाजता पालखी मिरवणूक, सायंकाळी ६ नंतर गांधी चौकातील व्यंकटेश मंदिरात पालखी व पादुका दर्शनासाठी ठेवल्या जाणार आहेत.

## भंते नागरत्नजी राज्यस्तरीय पुरस्कार महेश धम्मरक्षित यांना जाहीर

यमगर्णी,ता.१३(वार्ताहर)-

**येथील आयु महेश महादेव धम्मरक्षित यांना युवा बौद्ध धम्म परिषदतर्फे दिला जाणारा भंते नागरत्नजी राज्यस्तरीय पुरस्कार २०२६ प्राप्त झाला आहे.**



महेश धम्मरक्षित यांच्याकडून अविरतपणे होत असलेल्या धम्मकार्याचा आढावा घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण ता.१८ जानेवारी रोजी हुपरी येथे होणाऱ्या दहावी युवा बौद्ध धम्म परिषदमध्ये प्रा.डॉ.किरण सदानंद भोसले, प्रा.डॉ.संतोष भोसले, सतीश भारतवासी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या निवडीबद्दल महेश धम्म यांचे परिसरातील कौतुक होत आहे.

## व्यंकटराव हायस्कूलच्या विद्यार्थांची राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड

आजरा,ता.१३(प्रतिनिधी)-

**येथील व्यंकटराव हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज आजरा या प्रशालेतील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात 'पिझो इलेक्ट्रिसिटीचा वापर करून चालणे / दाब देऊन वीज निर्मिती' हे उपकरण मांडले होते.**



या उपकरणाला 'द्वितीय क्रमांक' मिळाला. आस्था सचिन गुरव व हाजिक मोहम्मद इरफान सय्यद या दोन विद्यार्थ्यांनी हे उपकरण बनवून सादर केले. या पारितोषिक प्राप्त उपकरणाची नागपूर येथे संपन्न होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल माध्यमिक शिक्षणाधिकारी सुवर्णा सावंत, दादासाहेब लाड, शिक्षण विस्तार अधिकारी पी.सी.कुंभार या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या यशस्वी विद्यार्थ्यांना व मार्गदर्शक शिक्षिका सौ.आशा सचिन गुरव यांना प्रशस्तीपत्र,शिल्ड देऊन गौरविण्यात आले.

# समन्वयातून प्रजासत्ताक दिन पार पाडा

## तहसिलदार सुरेश मुंजे

निपाणी,ता.१३(प्रतिनिधी)-

**देशाभिमान जागृत रहावा यासाठी राष्ट्रीय सण साजरे केले जातात. त्यामुळे हे कार्यक्रम करताना अधिकारी वर्गाने हयगय करू नये. प्रजासत्ताक दिन उत्साहात आणि तितक्याच श्रद्धेने साजरा व्हावा यासाठी तालुक्यातील सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय राखावा, अशा सूचना तहसिलदार सुरेश मुंजे यांनी दिल्या.**



निपाणी : बैठकीत बोलताना तहसिलदार सुरेश मुंजे, शेजारी आयुक्त गणपती पाटील, पोलीस उपनिरीक्षक शिवानंद कार्जोळ व इतर.

निपाणीतील शासकीय विश्रामगृहात तालुका प्रशासनाची बैठक पार पडली. याप्रसंगी ते बोलत होते. स्वागत उपतहसीलदार मृत्युंजय डंगी यांनी केले. यावेळी तहसिलदार मुंजे यांनी अधिकाऱ्यांना कार्यक्रमस्थळी स्वच्छता, पाणी, पुरेशी वीज व्यवस्था करावी तसेच अन्य सूचनांचे पालन करत कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन केले. यावेळी नगरपालिका आयुक्त गणपती पाटील, तालुका पंचायतीचे कार्यकारी अधिकारी प्रवीण कट्टी, शहर पोलिस उपनिरीक्षक शिवानंद कार्जोळ, ग्रामीण पोलिस उपनिरीक्षक शिवराज नाईकवडी, सीडीपीओ सुप्रिया जडगे यांच्यासह विविध खात्यांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान बैठकीत अनेक अधिकाऱ्यांनी स्वतः हजर न राहता प्रतिनिधी म्हणून कर्मचाऱ्यांना पाठवले होते. त्यामुळे संतापलेल्या तहसिलदारांनी संबंधित कर्मचाऱ्यांची हजेरी घेऊन अधिकाऱ्यांना बोलावून घेण्यास सांगितले. त्यानुसार तात्काळ अधिकारी हजर झाले. बैठकीचे गांभीर्य नसल्यावरून तहसिलदारांनी अधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली.

# मद्यपान करुन अपघात केल्यास खूनाचा गुन्हा दाखल करणार

## पोलीस अधीक्षकांचा इशारा

बेळगाव,ता.१३(प्रतिनिधी)-

**मद्यपान करुन वाहन चालवत अपघात करुन इतरांच्या मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्याविरोधात यापुढे कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशा प्रकरणात थेट खुनाचा गुन्हा दाखल केला जाईल, असा कडक इशारा पोलीस अधीक्षक के. रामराजन यांनी दिला आहे.**



जिल्ह्यात दरवर्षी रस्ते अपघातात ८०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू होत आहे. अपघातांचे वाढते प्रमाण गंभीर बाब असून,नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर निर्णय घेतले आहेत. दारुच्या नशेत वाहन चालवताना अपघात होऊन एखाद्याचा मृत्यू झाल्यास आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात येईल. गंभीर जखमी झाल्यास खुनाचा प्रयत्न असा गुन्हा नोंद होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.उसाने भरलेल्या ट्रॅक्टर वाहनांमुळे होणाऱ्या अपघातांकडेही लक्ष वेधले.

ते म्हणाले, ऊस तोडणीच्या पाच महिन्यात अपघातांची आणि मृत्यूंची संख्या लक्षणीय वाढते. विशेषतःरात्री उसांनी भरलेली वाहने रस्त्यावर उभी राहिल्याने किंवा संथ गतीने जात असल्याने मागून येणाऱ्या वाहनांना अंदाज येत नाही आणि भीषण अपघात घडतात. हे अपघात टाळण्यासाठी ऊस भरलेल्या प्रत्येक वाहनाच्या मागील बाजूस रिफ्लेक्टर पट्टी लावणे सक्तीचे केले आहे.रस्त्याच्या कडेला ऊस भरलेली वाहने उभी करतानाही रिफ्लेक्टर व इशारा दर्शविणारी साधने वापरणे बंधनकारक राहणार आहे.या संदर्भात जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार आहे.दारु पिऊन वाहन चालवणे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे आणि इतरांच्या जीवाशी खेळणे सहन केले जाणार नाही, असेही पोलीस अधीक्षक रामराजन यांनी स्पष्ट केले आहे.

## बेडकिहाळ येथे वॉटर बेडचे वितरण

बेडकिहाळ,ता.१३(वार्ताहर)-

**येथील निपाणी-२ योजना कचेरी बेडकिहाळ कार्यक्षेत्रातील बेडकिहाळ या गावातील अमर नंदकुमार घोडके यांना मंजूर झालेल्या वॉटर बेडचे वितरण करण्यात आले.**

याप्रसंगी स्वाभिमानी शेतकरी संघटना चिकोडी जिल्हाध्यक्ष तात्यासाहेब केस्ते, निपाणी-२ योजना कचेरी शौर्य घटक कॅप्टन चिकोडी जिल्हा जनजागृती मंचाचे सदस्य बाळासाहेब शिंदे, कार्यक्षेत्र संघटना अध्यक्षा अबेदा मुल्ला,सिद्धना कट्टीकर, श्रीदेवी चौगुले,सोनम भाट, आशा कार्यकर्ते मनिषा पवार व घोडके परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## मांगूर येथे लाभार्थ्यांना रेशनकार्ड-गृहलक्ष्मी मंजुरी पत्राचे वितरण

बारवाड,ता.१३(वार्ताहर)-

**कर्नाटक सरकारच्या पंचहमी योजनेचे निपाणी तालुका अध्यक्ष मांगुर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रमेश जाधव यांनी आपल्या विशेष प्रयत्नाने ५१ गरजू लाभार्थ्यांना रेशनकार्ड व गृहलक्ष्मी योजनेच्या मंजुरी पत्राचे वितरण साईनाथ दूध संघाचे चेअरमन आप्पासो पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.**

प्रारंभी सुनील जळणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.त्यानंतर या लाभार्थ्यांना या मंजुरी पत्रांचे व रेशनकार्डचे वितरण करण्यात आले.यावेळी रमेश जाधव,मांगुर काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष अनिल आडके, शंकर कुंभार, विजय भोरे व काही लाभार्थी महिलांनी मनोगते व्यक्त केली.यावेळी युथ काँग्रेस कमिटी अध्यक्ष नागेश बन्ने, संदीप जाधव, वासिम नदाफ, विनोद जाधव, मारुती मधाळे, अख्तर मुल्ला, दीपक कुराडे, रमजान नदाफ, राहुल जाधव, कलंदर मुल्ला यांच्यासह काँग्रेस कमिटी कार्यकर्ते व लाभार्थी, महिला उपस्थित होत्या.

## कोगनोळीत आज एकदिवसीय किर्तन सोहळा

कोगनोळी,ता.१३(प्रतिनिधी)-

**येथील श्री अंबिका देवी देवस्थान समिती व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामदैवत श्री अंबाबाई देवीच्या वज्रलेप वाढदिवसानिमित्त बुधवार ता.१४ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता वैकुंठवासी गुरुवर्य पांडुरंग काजवे महाराज यांच्या कृपाशीर्वादाने माळेगाव-नसरापूर (ता.भोर, जि.पुणे) येथील ह.भ.प.नवनाथ लिमन महाराज यांच्या एकदिवसीय किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

कोगनोळी हायस्कूलच्या पटांगणावर होणाऱ्या या किर्तन सोहळयास पंचक्रोशीतील नागरिकांनी उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# बिद्री कारखान्याच्या सभेत प्रवीणसिंह पाटील यांचा सत्कार



बिद्री : मुरगूड नगरपरिषदेतील यशाबद्दल कारखान्याच्यावतीने प्रवीणसिंह पाटील यांचा सत्कार करताना चेअरमन माजी आम.के.पी.पाटील, मनोज फराकटे व संचालक मंडळ.

बिद्री,ता.१३(प्रतिनिधी)-

**येथील श्री दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखान्याचे जेष्ठ संचालक प्रविणसिंह पाटील यांच्या सुविद्य पत्नी सौ.सुहासिनीदेवी पाटील यांची मुरगूड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल बिद्री साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या सभेत त्यांचे पती व कारखान्याचे ज्येष्ठ संचालक प्रविणसिंह पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कारखान्याचे चेअरमन तथा माजी आमदार के. पी. पाटील यांच्या हस्ते प्रविणसिंह पाटील यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.**

यावेळी बोलताना चेअरमन के. पी. पाटील म्हणाले, प्रविणसिंह पाटील यांनी आपल्या जीवनात अनेक संघर्षांवर मात करत विविध क्षेत्रात यश संपादन केले आहे. समाजकारण, सहकार आणि सार्वजनिक जीवनात त्यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे. त्यांच्या पत्नी सौ.सुहासिनीदेवी पाटील यांची नगराध्यक्षपदी झालेली निवड ही त्यांच्या कुटुंबाच्या सामाजिक कार्याचीच पावती आहे.

याप्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन मनोज फराकटे, संचालक मंडळातील सर्व सदस्य, व्यवस्थापकीय संचालक आर. डी. देसाई, कार्यकारी संचालक एस. एन. घोरपडे तसेच कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## राष्ट्रसेवेचे संस्कार घरापासून सुरू होतात हे जिजाऊंनी शिकविले-नगराध्यक्षा सौ.पाटील

मुरगूड,ता.१३(प्रतिनिधी)-

**राष्ट्र सेवेचे संस्कार हे घरापासून सुरू झाले पाहिजेत, अशी शिकवण राजमाता जिजाऊ मांसाहेबांनी दिली, असे प्रतिपादन मुरगूडच्या नगराध्यक्षा सौ.सुहासिनीदेवी पाटील यांनी काढले.**

मुरगूड नगरपरिषदेसमोरील शिवतीर्थावर राजमाता जिजाऊ मांसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या,जिजाऊ मांसाहेब यांनी शिवरायांना घडविले आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली.

नगराध्यक्षा सौ. सुहासिनीदेवी पाटील व उपनगराध्यक्षा श्रीमती रेखाताई मांगले यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. स्वागत सर्जेराव भाट यांनी केले. प्रास्ताविक रविंद्र शिंदे यांनी केले. आभार धोंडीराम मकानदार यांनी मानले. नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश वाळुंज, नगरसेवक सुहास खराडे, शिवाजीराव चौगुले, राहुल शिंदे , सुनील रणवरे आदींसह प्रतिष्ठित नागरिक व शिवप्रेमी युवक उपस्थित होते.

## संकेश्वर बनगार गल्लीतील सांडपाणी रस्त्यावर

संकेश्वर,ता.१३(वार्ताहर)-

**येथील बनगार गल्ली ते नवी गल्लीला जोडणाऱ्या रस्त्याची दूरवस्था झाली आहे.येथील रस्त्याचे पेव्हर ब्लॉक उखडून गेले असून गटार - शौचालयाचे सांडपाणी रस्त्यावर साचलेले दिसत आहे.**

बनगार गल्ली ते नव्या गल्लीला जोडणारा रस्ता उखडून गेला तरी इकडे पालिकेचे मुख्याधिकारी प्रकाश मठद, अभियंता आर.बी.गडाद यांनी दुर्लक्ष केले आहे. माजी नगरसेवक दिवंगत संजय नष्टी यांच्या निधनानंतर सदर प्रभाग दुर्लक्षित राहिलेला दिसत आहे.बनगार गल्ली ते नव्या गल्ली मार्गे ये-जा करणाऱ्या लोकांना उखडून गेलेल्या पेव्हर ब्लॉक अन् सांडपाण्यातून ये-जा करावे लागत आहे.

## आबिटकर पॉलिटेक्नीकचा ८२ टक्के निकाल

कुर,ता.१३(वार्ताहर)

**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्यावतीने हिवाळी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून श्री आनंदराव आबिटकर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पाल (ता.भुदरगड)पॉलिटेक्निकने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.**

महाविद्यालयाचा एकूण निकाल ८२ टक्के लागला असून प्रथम श्रेणीतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाणही ८२ टक्के इतके आहे. विभागनिहाय गुणवंत विद्यार्थ्यांचा निकाल पुढीलप्रमाणे-प्रथम वर्ष कॉम्प्युटर विभाग:अनुक्रमे हर्षिता कुरळे (९१.०६%), अर्पिता देवडकर (८७.१८%), वेदिका पाटील (८१.७७%), प्रथम वर्ष आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग विभाग: अनुक्रमे विवेक पाटील (८३.६५%), मृगेंद्र खटांगले(८३.४१%), कल्याणी पाटील (८१.२९%), प्रथम वर्ष इलेक्ट्रिकल विभाग; सार्थक पाटील (८३.६०%), आयान नदाफ (७८.३५%), अभिषेक घोरपडे (७५%). या विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष प्रा.अर्जुन आबिटकर, ॲकॅडमिक को-ऑर्डिनेटर धीरज देसाई, संस्था प्रतिनिधी धीरज गुदगे यांचे मार्गदर्शन तसेच पॉलिटेक्निक विभाग प्रमुख प्रा.कविता कुरळे, प्रा.एन.एन.आबिटकर, प्रा.एस.डी.कांबळे, प्रा.एस.आर.मोहळकर, प्रा.एन.एस.कदम,प्रा.ए.एम.देसाई,प्रा.एस.डी.सुतार आदी प्राध्यापकांच्या प्रोत्साहनामुळे हे यश संपादन केले.

## बोरवडेत स्वामी समर्थ महाराजांच्या पादुकांचे स्वागत

बिद्री,ता.१३(प्रतिनिधी)-

**स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा सोहळा निमित्ताने आलेल्या स्वामी समर्थांच्या पालखीचे कागल तालुक्यातील बोरवडे येथे उत्साही स्वागत करण्यात आले. गावातील शेकडो महिला व भाविकांनी पादुकांचे दर्शन घेतले. ग्रामदैवत जोतिर्लिंग मंदिरात मुख्य संयोजक कुमार कुलकर्णी यांच्या हस्ते पालखी पूजन व आरती संपन्न झाली.**

यावेळी मनोज फराकटे, एस. एन. घोरपडे, रघुनाथ कुंभार, दत्तात्रय पाटील, विनोद वारके, आनंदा वरूटे, तानाजी साठे, सातापा वारके, सातापा फराकटे, अनिल मगदूम, दत्तात्रय चव्हाण आदी उपस्थित होते.



पट्टणकोडोली येथील केंद्र शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरणप्रसंगी सुरेखा जगताप, सुनिल भटेजा व इतर मान्यवर.

## पट्टणकोडोली केंद्र शाळेत शैक्षणिक साहित्यांचे वितरण

पट्टणकोडोली,ता.१३(प्रतिनिधी)-

**हातकणंगले तालुक्यातील पट्टणकोडोली केंद्र शाळेत उजळाईवाडी (ता. करवीर) येथील सुरेखा जगताप यांनी पतीच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीच्या तब्बल २०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांबरोबरच अन्नदान करुन आशिर्वाद घेतला.**

या उपक्रमामुळे पट्टणकोडोली परिसरातून समाधान व्यक्त होत आहे.प्रारंभी मुख्याध्यापिका मृणालिनी शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.यावेळी प्रभारी सरपंच नम्रता माळी, ग्रामपंचायत अधिकारी तुकाराम हणमंते, सुनिल भटेजा, निकिता फाळके, शरद पुजारी, धोंडीराम माळी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कामान्ना धनगर, शिक्षणतज्ञ सिद्राम भानसे, मनिषा हुपरे, मिनाज मुजावर, संगीता कोळी, चंद्रभागा देशमुख, प्रकाश कांबळे, विकास माळगे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मारुती फाळके यांनी सूत्रसंचालन केले. देवदत्त कुंभार यांनी आभार मानले.

# बोरपाडळे परिसर पुन्हा थंडीने गारठला

## किमान तापमान १४ अंशांपर्यंत; भाजीपाला,फळबागांवर परिणाम

बोरपाडळे,ता.१३(वार्ताहर)-

**गेल्या तीन ते चार दिवसांपासून बोरपाडळे परिसरातील तापमानात सातत्याने घट होत असल्याने थंडीचा कडाका वाढला आहे. किमान तापमानाची १४ अंशांपर्यंत नोंद झाली आहे. पहाटेच्या वेळी हुडहुडी भरविणारी थंडी जाणवत असून सायंकाळनंतर त्याचा बोचरेपणा वातावरणात कमालीचा गारवा निर्माण करीत आहे .**

थंडी वाढल्याचा परिणाम जनजीवनावरही दिसून येत आहे. पहाटे लवकर घराबाहेर पडणारे कामगार, विद्यार्थी नाईलाजाने बाहेर पडत असून ज्येष्ठ नागरिकांनी मात्र थंडीपासून बचावासाठी मॉर्निंग वॉकला रामराम ठोकला आहे. युवक मात्र मफलरचा वापर करताना दिसत आहेत. ग्रामीण भागात शेतकऱ्यांनी पिकांवर थंडीचा परिणाम होऊ नये म्हणून काळजी घेण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः भाजीपाला आणि फळपिकांवर थंडीचा परिणाम जाणवण्याची शक्यता व्यक्त होत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील चार दिवस जिल्ह्यात वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता असून काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. मात्र, या कालावधीत थंडीची तीव्रता कायम राहण्याची शक्यता आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे तापमानात आणखी घसरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**तब्येतीची काळजी घ्यावी**

थंडीमुळे सर्दी, खोकला, ताप, सांधेदुखी यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढू शकते. त्यामुळे



नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, उबदार कपडे वापरणे, गरम पाणी पिणे आणि लहान मुलांची विशेष काळजी घेण्यात यावी. एकूणच, बोरपाडळे परिसरात थंडीने चांगलाच जोर धरला असून पुढील काही दिवस नागरिकांना हुडहुडी भरविणाऱ्या गारव्याचा सामना करावा लागणार आहे.

**वैद्यकीय अधिकारी डॉ.सोनिया कदम, प्राथमिक आरोग्य केंद्र बोरपाडळे.**

रात्रीच्या वेळेस धुक्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे वाहन चालवताना चालकांना अडथळा येतो. त्यामुळे अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही. यासाठी घाट भागात, तसेच महामार्गावर वाहने चालविताना धुक्यात वाहनाची गती कमी करणे आवश्यक असल्याचे मत वाहतूक पोलिसांनी व्यक्त केले आहे. धुके असताना वाहनाची गती वाढवणे हे अपघाताचे कारण असू शकते. वाहतूक पोलिसांकडून याबाबतही जागृती सुरू असल्याची माहिती वाहतूक पोलिस प्रशासनाने दिली आहे.

## निधन वार्ता

### विजय चोथे

इचलकरंजी,ता.१३-

येथील सुर्वेनगर भागातील प्रतिष्ठित नागरिक विजय चंद्रकांत चोथे (वय ४०)यांचे आकस्मिक निधन झाले.



त्यांच्या पश्चात आई-वडील,पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ असा परिवार आहे.

### श्रीमती रंजना घोडके

चंदूर,ता.१३(वार्ताहर)-

येथील प्रतिष्ठित नागरिक बिरदेव सहकारी दूध संस्थेचे सचिव व श्री गंगा पतसंस्थेचे कॅशियर विजय घोडके यांच्या मातोश्री श्रीमती रंजना भिकाजी घोडके (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**जिजाऊ फॅशन-** आमचेकडे फॅन्सी लेडीज स्वेटर (ब्रा) होलसेल व रिटेल दरात मिळतील. पत्ता- तोरणानगर, शहापूर. फोन- ८७९३१०९२६३

**६४ गुंठे प्लॉटिंगचे** जमीन विकणे. यशवंत कॉलनी, आयकोसमोर, शिवनाकवाडी. ९९२२८१०२०२

**नवीन कोल्हापूर** नाक्याजवळ, कोल्हापूर रोडटच इचलकरंजी येथे ३६१६ स्के. फूट क्षेत्र जागा व त्यावरील आरसीसी बांधकाम असलेली इमारत विकणे आहे. संपर्क-९४०४१०४०६७, ९३७२००४०६७

**२२०० स्के. फूट** तयार शेड विकणे आहे. स्टेशन रोड, थ्यंकटेश कॉलनी, हनुमान मंदिरमागे, जवाहरनगर, इचलकरंजी. ९८५०९४९०८०

**विकणे आहे.** कॉटर-१, कपाट-३, झेरॉक्स मशिन-१, स्टेशनरी मालासहीत विकणे. संपर्क- ९०९४९४४४९३

**त्वरीत विकणे आहे.** श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे मुख्य कमानीजवळ व दत्त हायस्कूलच्या पाठीमागे आरसीसी दुमजली घर त्वरीत विकणे आहे. प्रत्येक मजला ४५० स्के. फूट एरिया, अॅटॅच बाथरूमसहीत संपर्क- ९४२२४१६४२९

**प्लॉट विकणे-** कोरोची येथे कलेक्टर एनए ३२०० स्के. फूटाचा प्लॉट ६० फूटी/३० फूटी रोडटच संपर्क-९८२३४६६६५५

**त्वरीत विकणे आहे.** आवाडे अपार्टमेंटमधील दोन खोल्यांचा सर्व सोयीनियुक्त असलेला 'ब्लॉक' त्वरीत विकणे आहे. संपर्क- ९४२२३३३४३०

**जेवणावळी व गणेशजयंतीसाठी** गाय-म्हैसीचे चांगल्या प्रतीचे कणीदार तूप होलसेल दरात मिळेल. ८७८८२०४५९३

**जुने व नवे पॉवरलूम** घेऊ व देऊ. तसेच फवारा कांडीमशिन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क- ८३१७२९१००८

## आरोग्य विषयक

**नैसर्गिक पध्दतीने** वजन कमी करा अथवा वाढवा. कसे करायचे ते मला विचारा. नरेंद्र पवार- ९३५६८०६१४५

**मानसिक आजार-** व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्क्रिझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्रचळेपणा. इ. मानसिक आजारसाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री. इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क-८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६

## बोअरवेल विषयक

**राज बोअरवेल-** आमचेकडे ४॥। व ६॥ इंची बोअरवेल तसेच आर्थिकची कामे माफक दरात करून मिळेल. ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७

**श्री साई बोअरवेल** आमचेकडे ४॥। व ६॥ इंची बोअर, रिकामा पॉईंट व शेतामध्ये योग्य दरात मारून मिळेल. संपर्क-९८८१३५५८९३, ९९२२७७२०३६

**चौगुले बोअरवेल-** ४३ वर्षाची परंपरा आमचेकडे एक दिवसात ४॥। व ६॥ इंची बोअरवेल मारून सबमर्सिबल पंप बसवून मिळेल. संपर्क-डॉ. संजय चौगुले, जुन्या स्टॅन्डसमोर, स्टेशन रोड, इचलकरंजी. मो. ९३२५१४६८८४

## * नोकरी विषयक *

**सेवा भारती संचलित** डॉ. हेडगेवार रूग्णालय इचलकरंजी येथे महिला वैद्यकीय मदतनीस तथा पंचकर्म थेरपिस्टपदी प्रशिक्षणार्थी गरजू महिला नेमणे आहे. आवश्यक प्रशिक्षण घेण्याची तयारी असावी. शैक्षणिक पात्रता ANM किंवा १२ वी सायन्स पास असावी. ४/१८५, नाट्यगृह चौक, डॉ. हेडगेवार रूग्णालय इचलकरंजी येथे आपले अर्ज जमा करावेत. संपर्कासाठी फोन- (०२३०) २४२२६७७१

**मावशी पाहिजे.** घरकाम करण्यासाठी मावशी हव्या आहेत. (गावभागातल्यांना प्राधान्य) वेळ सकाळी-९ ते १, पत्ता-श्रीपाद नगर, चांदणी चौक, इचलकरंजी. मो. ९०४९०४२३७५

**कोल्हापूर जिल्ह्याकरीता** फूड मार्केटिंगचा ३ वर्षे अनुभव असणारा मुलगा पाहिजे. पत्ता- सांगली रोड, पाटील मळा, इचलकरंजी. ९५११२००३००

**टर्नर, ग्रायडिंग ऑपरेटर** पाहिजेत. प्रत्यक्ष भेटा. केदार प्रिसीजन कंपोनंटस. आंबेडकर पुतळ्याजवळ, इचलकरंजी. फोन-९४२२४२८१९६, ९११२२७३१७१

**सेल्समन पाहिजे.** नमकीन ऑर्डरीसाठी सेल्समन पाहिजे. गाडी असणे आवश्यक. गरजू, अनुभवी, प्रामाणिक संपर्क-९५२७७६६११२, ९५२७७६४४६०

**शाकाहारी जेवण** बनविणेसाठी साफसफाईकरिता व धुणे भांडी करणेसाठी बाई पाहिजे. महासत्ता चौक, इचल. संपर्क- ९६३५०७०३३३, ९५८९५५५७११

**लेथ मशिनवर** फूलटाईम/पार्ट टाईम कामगार पाहिजेत. प्रोडक्शन काम. संपर्क-९८५०६६४४४२

**अर्जंट पाहिजे.** दुकानात काम करण्याकरीता फूलटाईम/पार्ट टाईम जेन्टस/लेडीज पाहिजे आहेत. संपर्क-९८२४४०१०१६, ७८५५११९९०२

**पाहिजे.** गारमेंटचा अनुभव असलेली लेडीज सुपरवायझर पाहिजे. हिरो सुझुकी शोरूमजवळ गारमेंट सांगली रोड. संपर्क-८४९१२०४०८१, ९०११७१६४६४

**मंगळवार पेठ-** येथील प्रेसमध्ये कामासाठी लेडीज कामगार पाहिजे. वेळ- सकाळी-१० ते ६. संपर्क- ८६६९४६९८००

**DTDC** कुरियरमध्ये ऑफिस स्टाफ व ऑफिसबॉय भरणे आहे. संपर्क-९७३०६८६२५३

**टेलिकॉलिंगसाठी** लेडीज हव्या आहेत. वय १८ ते ४० वर्ष शिक्षण- १० वी पुढे, श्री महालक्ष्मी वधु-वर, बादशाह पेट्रोल, सांगली रोड, इचलकरंजी. मो. ८८३०२४०४२६.

**ऑफिस कामासाठी** मुलगा/मुलगी पाहिजे. प्रत्यक्ष भेटा- सिध्दीसिध्दी, जुना स्टेशन रोड, नरसिंह भवन. संपर्क- ७०२७७७१६७२.

**सिमेंट पाईप कंपनीमध्ये** मॅनेजर पाहिजे. इचलकरंजी- ७३८५२४८२९०

**ड्रायव्हर पाहिजे.** ४०७ बोलेरो ट्रक वरती निर्व्यसनी, लायसनधारक ड्रायव्हर पाहिजे, इचलकरंजी. ७३८५२४८२९०

**पार्वती इंडस्ट्रिज,** शहापूर, कोरोची आवाडे पार्ककरिता सिक्युरिटी गार्ड त्वरीत नेमणे आहे. संपर्क- ९८५०९४५२२६, ९५१११७५९६७६

**सेवासदन निरामय प्रा. लि.** इचलकरंजी तातडीने कर्मचारी आवश्यक. MJPAY असिस्टंट-१. MRD Manager (Medical Records)-१, रिसेप्शनिस्ट-१, बायो मेडिकल टेक्निशियन-१, कॅथलॅब टेक्निशियन-१, एक्स-रे टेक्निशियन-१, इलेक्ट्रीशियन-१, लॅब इनचार्ज-१. अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. इच्छुक उमेदवारांनी त्वरीत संपर्क साधावा. संपर्क-८९७५९६६०५५

**बेकरी शॉपीमध्ये** कामासाठी मुले पाहिजेत. संपर्क- बालाजी बेकरी, एएससी कॉलेज, फोन- ९९६०० २८२८९

**२ व्हीलर** मेकॅनिक पाहिजे. अपेक्षेप्रमाणे आकर्षक पगार मिळेल. संपर्क-७७२१९३२२७०, इचलकरंजी.

**अर्जंट सिक्युरीटी** गार्डस व लेडी गार्डस पाहिजेत. इचलकरंजी, पार्वती इंडस्ट्रिज व मुडशिंगिकरिता ड्युटी- ८ व १२ तास, आकर्षक पगार, मो. ९७०२४२४७७२, ९५२९५४५४६८

**ऑफिस कामासाठी** कॉम्प्युटरचे ज्ञान असणारी पदवीधर अनुभवी विवाहीत महिला पाहिजे. संपर्क- ८८८८८५४२२०, इचलकरंजी.

**ड्रायव्हर पाहिजे.** पुण्यामध्ये राहणेसाठी उत्सुक टी परमिट गाडीवर लायसनधारक ड्रायव्हर पाहिजे. संपर्क-८६२३०५६८९०

**ऑफिसबॉय-** ऑफिस कामाकरीता बारावी पास, टू व्हीलर लायसन्स आवश्यक. संपर्क-ओम मोटर्स, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**अकौटींग टॅली प्राईममध्ये** अनुभवी अकौंटंट पाहिजे. विवाहीत लेडीज/जेंटस, २ वर्षे अनुभवी संपर्क- ९८३४५७०१२७

**प्लंबिंग कामासाठी** शिकाऊ किंवा अनुभवी मुले पाहिजेत. इचलकरंजी शहर किंवा परिसरातील चालतील. आकर्षक पगार मिळेल. ९९२२२३०६१९

**जेंटस कामगार पाहिजेत.** वय-३२ पर्यंत. टू व्हिलर आवश्यक. संपर्क- ९६३१३१६०३०

**अकौटींग कामासाठी** टॅली झालेली मुलगी व इंडस्ट्रियल ऑईल मार्केटिंगसाठी मुलगा पाहिजे. पत्ता- जुना बसस्टॅन्ड जवळ, इचलकरंजी. ९३७२१४३३९३

**पाहिजेत.** नामांकित कंपनीत जितो गाडीवर ड्रायव्हर कम हेल्पर पाहिजेत. इएसआयसी+पीएफ सुविधा मिळेल. संपर्क-वेळ-११ ते ५. फोन-७८६६०८८८९५

**१० वी/१२ वी,** आयटीआय, पदवीधर मुलांची डे शिफ्टसाठी जॉब इन्स्पेक्शन व असेंब्लीसाठी व CNC/ VMC साठी शिकाऊ/अनुभवी ऑपरेटरची भरती सुरू, इचलकरंजी. ९९५६१६९६९६, ९१७५९६७७६७

**पारले बिस्किट** एजन्सीमध्ये हेल्पर कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क- ९६०४२६६०२१

**शिकाऊ, अनुभवी** सीएनसी/व्हीएमसी ऑपरेटर पाहिजेत. संपर्क- इंदू सीएनसी शॉप, दाते मळा, हॉटेल थाळी हाऊसमागे, इचलकरंजी. ९३७०१४३०३५

**इचलकरंजी शहरातील** जुन्या नामांकित पतसंस्थेमध्ये पिग्मी एजंट पदासाठी फिक्स पगार सह कमिशन बेसिसवर १० जागा भरायच्या आहेत अनुभवी तसेच बिगर अनुभवी उमेदवारांनी त्वरित संपर्क करावा. ९३५६१६८६७२.

**पाहिजेत.** स्वस्तिक डाईंग अॅन्ड प्रिंटींग मिल येथे महिला मदतनीस (हेल्पर) कामाची वेळ- ९ ते ६, पत्ता-गेट नं.३, स्टेशन रोड, बालाजी ड्रायव्हींग स्कूलच्यासमोर, इचलकरंजी. फोन-७७६८००८६०१

**इचलकरंजी येथे** मध्यवर्ती बसस्टॅन्डजवळ, पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजेत. ड्युटी- दुपारी ३ ते रात्री ११ कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी. फोन- ८३२९०२८१४४

**पीएलसी सायझिंगमध्ये** कामासाठी बॅकसायझर व हेल्पर अर्जंट पाहिजेत. पत्ता- प्राईड इंडियाजवळ, तारदाळ-इचलकरंजी. फोन- ९८२४३८९४९३

**केतन वाईन-** काऊंटर सेल्समन- २, कॉम्प्युटर ऑपरेटर-१, गोडावूनमध्ये-२. केतन वाईनमध्ये जागा भरती करणे आहे. पत्ता-हिरा टॉकीजजवळ, हुपरी. मो. ९६०४८२४१७२, ९८२२०४३२५६

**१० वी, १२ वी शिक्षण** चार चाकी गाडी शिकवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क-श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, आंबेडकर पुतळ्याशेजारी, इचलकरंजी. ९८५०११४६६०

**१२ वी शिक्षण** संगणक ज्ञान असणारी फूल टाईम मुलगी/मुलगा पाहिजेत. संपर्क-श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, आंबेडकर पुतळ्याशेजारी, इचलकरंजी. ९८५०११४६६०

**अनुभवी सीएनसी/**व्हीएमसी ऑपरेटर, सेटींग सुपरवायझर प्रोग्रॅमर पाहिजेत. फौंड्रीमध्ये मोल्डींग, कॉन्ट्रॅक्ट व हेल्पर, कॉन्ट्रॅक्ट देणे आहे. संपर्क- ८०८७७५१७१७१.

**बादशाह बजाज** शोरूमसाठी जनरल मॅनेजर, सेल्स एक्झिक्युटिव्ह व ऑफिस बॉय नेमणे आहे. आकर्षक पगार. संपर्क- ८६०५८८२२००, ९५१९९९००९२. इचलकरंजी, कुरूंदवाड, जयसिंगपूर.

Lord krushna school Academy Khotwadi Urgent Required pre-Primary/ primary Teachers (English/ semi-English medium) Send Application with bio-data (Whats App No. 7558432159, 9096708537

**गॅस एजन्सीमध्ये** सिलेंडर डिलेव्हरी करीता डिलेव्हरी बॉय व गाडी पाहिजे. तसेच मेकॅनिकल पाहिजे. संपर्क - ९९२३४२२४३४, इचलकरंजी.

**पाहिजे -** नामांकित अॅडव्हटायझिंग कंपनीमध्ये फोटोशॉपसाठी अनुभवी लेडीज पाहिजे. मंगलधामसमोर, गणपती मंदिरशेजारी, संपर्क - ८६७७९८१८१९.

**लाईटचे बोर्ड** तयार करणेसाठी प्रिंटिंग सोडणेसाठी, लेझर मशिन चालविण्यासाठी कामगार पाहिजेत. अनुभवींस प्राधान्य. नवशिक्यास जीवनपयोगी कला शिकण्याची संधी. न्युक्लिअस, डी-मार्ट समोर, इचलकरंजी. संपर्क- ९९२३६००६६

**डुडन ट्रॉफी** फॅक्टरीत कामगार पाहिजे. किमान पगार-८ ते १० हजार पर्यंत. संपर्क-९६०७८००८८८

**त्वरीत कामगार पाहिजेत.** ऑपरेटर कामगार-४, क्वॉलिटी इनस्पेक्टर- २. पत्ता- तीन बत्ती चार रस्ता, इचलकरंजी. संपर्क- ८७९३१५५७११

**पाहिजेत.** प्रोडक्शन सुपरवायझर CNC, VMC प्रोग्रॅमिंग येणारा १ जागा, CNC, VMC ऑपरेटर-४ जागा, लाईन इन्स्पेक्टर- १ जागा. संपर्क-टेक्नीमेक कटिंग एज प्रा. लि. पार्वती इंडस्ट्रिज, यड्राव. ९८८१३१६०४३

**माल काढणे** व चेकिंगसाठी लेडीज कामगार पाहिजे व माल वाटणे व गोडाऊनसाठी जेंटस कामगार पाहिजे. संपर्क-सुशिल व्हेंचर लि. डॉ. आंबेडकर पुतळ्याजवळ, इचलकरंजी. मो. ९३५६७८५५०७

## * भाड्याने देणे/घेणे *

**वर्धमान चौक सन्मती** बँकेच्यामागे १ बीएचके सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. संपर्क-९८२३५०७६५४, ७०५८१७२२०१

**शॉपिंग सेंटरजवळ** तारा हॉटेलजवळ गाळा भाड्याने देणे आहे. कॅफे, खानावळ, गोडाऊन. संपर्क-९९३००१०२९९

**गोडाऊन भाड्याने देणे-** १५७० स्के. फूट पोटमाळा, ऑफिस, संडास बाथरूम, पाणी सर्व सोयीनियुक्त, तीनबत्ती चौक, इचलकरंजी. ८६६८५१०९११

**दुकानगाळा भाड्याने देणे-** रोडटच शाहू पुतळा, कोल्हापूर रोड, इचलकरंजी. संपर्क- ८८५५८४६१६२, ९३७२४५८७१७

**सर्व सुखसोयीनी सज्ज** वर्धमान चौकात २ बीएचके घर, बंगला भाड्याने देणे. भेटा- ९९२३०२९०९०, वर्धमान सोसायटी.

**सर्व सोयीनियुक्त** जागा हॉस्पिटल, ऑफिससाठी भाड्याने देणे के.पी. कॉम्प्लेक्स, राणी बागेजवळ, इचलकरंजी. मो. ९४२२०४३६७६.

**साखरपे हॉस्पिटलजवळ,** सातपुते गल्लीमध्ये १०X२० चा गाळा भाड्याने देणे आहे. पिठीसाठी, ऑफिससाठी, गोडावूनसाठी प्राधान्य. ८१४९९१३०८८

**३५० स्के. फूट गाळा** ऑफिससाठी भाड्याने देणे आहे. पत्ता-टायटन शोरूम साखरपे हॉस्पिटलजवळ, संपर्क-८६५७४७२८०४, ९८२१६९११००

**भाड्याने देणे-** १ बीएचके सर्व सोयीनियुक्त डीमार्ट मागे, इचलकरंजी. फोन-९९२३२०८४५१

**राज कॅसल हॉटेलमागे** १ बीएचके सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. संपर्क-८८०५२३३२४३, इचलकरंजी.

**भाड्याने देणे-** १ बीएचके दुकानगाळा १, तोरणानगर, शहापूर. फोन-७६२०३८५८३९

**१ बीएचके** सर्व सोयीनियुक्त गहाणवट देणे आहे. बंडगर माळ परिसर संपर्क-९२७०३८४०९७, इचलकरंजी.

**शाकाहारी कुटुंबासाठी** १ बीएचके सर्व सोयीनियुक्त आरसीसी फ्लॅट भाड्याने देणे आहे. सोन्या मारूती मंदिरमागे, पाटील बिल्डींग, इचलकरंजी. ८९६६६८९१६५

**३०X६० गोडाऊन** ऑफिससह भाड्याने देणे आहे. बिरदेव बँकसमोर, आरपी रोड, इचलकरंजी. फोन-९८४१९६६१६१

**१५०० स्के. फूट** शोरूमसाठी भाड्याने देणे आहे. डॉ. बडबडे समोर, सांगली रोड, इचलकरंजी. फोन-९४२२०४०२१९

**घर भाड्याने देणे-** राधाकृष्ण टॉकीज चौकात मयुर हायस्कूलजवळ, सर्व सोयीनियुक्त (शाकाहारी) घर भाड्याने देणे. संपर्क-९७३०४८९०८

**३ बीएचके फ्लॅट** सर्व सोयीनियुक्त मध्यवस्तीत, दुसरा मजल्यावर भाड्याने देणे. महासत्ता चौक, स्वामी समर्थ केंद्राजवळ, इचलकरंजी. ९४२३२८६०९३, ९८५०२८६०९३

**व्हीएमसी/सीएनसी** मशिन शॉप चालू स्थितीत भाड्याने देणे आहे. संपर्क- ९४२११०७९०१, मौजे माणगाव.

**१ बीएचके सर्व** सोयीनियुक्त त्वरीत गहाणवट देणे आहे. शहापूर तारदाळ नाका, तारदाळ रोड, तारदाळ. संपर्क- ९५६६०५५९३२.

**१ बीएचके सुसज्ज** नवीन फ्लॅट भाड्याने देणे आहे. २४ तास पाण्याची सोय पत्ता- गणेशनगर, गल्ली नं. ४, खंजिरे इस्टेट रोड. संपर्क- ७८४९८४१९८६

**शहराच्या** मध्यवर्ती मोहन आर्केडमध्ये ऑफिस, गोडाऊन स्टार्टपसाठी गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क-९९२३४६००६६

**भाड्याने पाहिजे.** डि-मार्ट च्याजवळ, पुढे किंवा मागे १५०० ते ३००० गोडाऊन पाहिजे. संपर्क- ९२२६८३६४४३

## कर्ज विषयक

**पैशाची गरज?** ताबडतोब मालमत्ता तारण कर्जाची हमी, लगेचच फोन करा. संपर्क-९६५७१६३९८१

**जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत** उत्पादन व सेवा उद्योगा अनुदानीत कर्ज प्रकरणी योग्य मार्गदर्शन. कल्पना टॉकीजसमोर, इचल. ९६६५४००८२८

**फक्त असिसमेंट** उतारा व घरफाळा पावतीवर ७ लाखापर्यंत कर्ज मिळेल. सिबील ६५०+ पाहिजे. संपर्क- ९१४५७५३८१०.

## यात्रासहल

**१९ जानेवारी-** गिरनार, सोमनाथ, द्वारका-१० दिवस, काशी, अयोध्या, प्रयागराज-१० दिवस, दत्त परिक्रमा ८ फेब्रुवारी-पिठापूर, कुरवपूर-९ दिवस. संपर्क- कोजागिरी टूर्व्हल्स-९४०३९५३४१२, ९४२०५९२५२४

## हॉटेल विषयक

परमिट रूम बारसाठी हेल्पर व वेटर पाहिजेत. संपर्क- ७५८८६२०५०५, ९८५०३१०५०५, इचलकरंजी.

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहिरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

# शेवटच्या दिवशी स्थानिक नेत्यांची, उमेदवारांची धावपळ घर टू घर जात मतदारसंघ पिंजून काढला

**सांगली, ता. १३(प्रतिनिधी)- सांगली मिरज कुपवाड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या जाहीर प्रचाराच्या तोफा अखेर मंगळवारी सायंकाळी थंड झाल्या. स्थानिक नेत्यांनी, उमेदवारांनी धावत्या प्रचार फेऱ्यांनी मतदारसंघ पुन्हा एकदा पिंजून काढला तर कार्यकर्त्यांनी प्रत्येक घराचा दरवाजा वाजवून पुन्हा एकदा मतदार राजाला हात जोडून आमच्याच पक्षाला विजयी करण्याचे आवाहन करण्यासाठी पायाला भिंगरी लावली होती. दिवसभर उमेदवार, कार्यकर्त्यांची येणे जाणे सुरूच असल्याने मतदार राजाला दिवसभर दरवाजा उघडून आमचे मत तुम्हालाच आहे, असे सांगण्याशिवाय पर्याय उरला नव्हता.**

सांगली मिरज कुपवाड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी उद्या गुरुवारी मतदान होत आहे. निवडणुका जाहीर झाल्यापासून सर्वत्र निवडणुकीचे वातावरण हळूहळू तयार व्हायला सुरुवात झाली होती. उमेदवारी अर्जाच्या माघारी नंतर ७८ जागांसाठी एकूण ३८१ उमेदवार रिंगणात उतरल्याचे स्पष्ट झाले. यापैकी सुमारे २६५ उमेदवार हे कोणत्या ना कोणत्या पक्षाचे अधिकृत उमेदवार असल्यामुळे त्यांच्या प्रचाराला तात्काळ सुरुवात झाली. इतर बंडखोर आणि अपक्ष उमेदवारांना निवडणूक चिन्ह मिळाल्यानंतर त्यांना प्रचार यंत्रणेची तयारी करावी लागली. दि. ३ जानेवारीला खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगलीत जाहीर प्रचार सभा घेऊन भाजपच्या प्रचार शुभारंभ दणक्यात केला होता. त्यामुळे इतरही बडे नेते सांगलीकडे वाट वाकडी करतील असे वाटले होते, पण प्रत्यक्षात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मिरजेतील जाहीर सभा आणि सांगलीत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांची छोटेखानी सभा वगळता इतर कोणत्या बड्या नेत्याने सभा झोडली नाही. काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या वतीने माजी मंत्री, आमदार जयंत पाटील, माजी मंत्री, डॉ. आमदार विश्वजीत कदम आणि खासदार विशाल पाटील यांनी प्रचारा सातत्य ठेवले होते. त्याचबरोबर भाजपचे आमदार सुधीर गाडगीळ आणि सुरेश खाडे यांच्यासह दुसऱ्या फळीतील दिग्गज नेत्यांची मोठी टीम प्रचारात सक्रिय होती. शिवसेनेच्या शिंदे गटाच्या वतीने पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी व्यापक बैठक घेऊन प्रचाराचे नियोजन लावले होते. पुन्हा त्यांनी मिरज परिसरात रॅली लावून पदयात्रा काढल्या. आमदार सुहास बाबर, बजरंग पाटील, संजय विभुते, मोहन वानखडे यांनी शिंदे सेनेच्या प्रचाराची खिंड लढवली.

अजित दादांच्या राष्ट्रवादीच्या प्रचाराची धुरा आमदार इद्रीस नायकवडी, मीनाक्षी खास. संजय काका पाटील, पद्माकर जगदाळे यांनी जोरदारपणे सांभाळली. ठाकरेंच्या शिवसेनेच्या वतीने प्रा. नितीन बानगुडे पाटील यांनी प्रचाराचा अखेरच्या दिवशी सांगलीतील खणभागात सभा घेतली. सर्वच उमेदवारांनी प्रचाराच्या अखेरच्या दिवशी प्रचारात स्वतःला झोकून दिलेली होती.

# सिध्देश्वर विद्या मंदिरात विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**शिराळा/प्रतिनिधी -: श्री सिद्धेश्वर शिक्षण संस्था शिराळा यांच्या माध्यमातून करमाळे (ता. शिराळा) येथे माजी मंत्री शिवाजीराव नाईक यांच्या प्रयत्नातून १९६७ साली शैक्षणिक क्षेत्रामधील सिद्धेश्वर विद्यामंदिर या नावाने लावलेल्या रोपट्याचा आज महावृक्ष झालेला आहे. असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रणधीर नाईक यांनी केले.**

श्री सिद्धेश्वर शिक्षण संस्था शिराळा यांच्या अंतर्गत असलेल्या श्री सिद्धेश्वर विद्यामंदिर करमाळे ता. शिराळा येथे शालेय विज्ञान प्रदर्शन, वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभा वेळी रणधीर नाईक बोलत होते. तर प्रमुख पाहुणे प्रमोद पाटील व सिद्धेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मार्गदर्शक जे बी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



सिद्धेश्वर विद्यामंदिर करमाळे (ता. शिराळा) येथे शालेय विज्ञान प्रदर्शन, वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभा रणधीर नाईक, जे बी पाटील, मुख्याध्यापक रामचंद्र सिद, आदी मान्यवर.

यावेळी सरपंच सचिन उर्फ पिनू पाटील, उपसरपंच सुमिताताई मदने, जे बी पाटील, टी आर पाटील, अर्जुन कुरणे, बाबासो पाटील, प्रमोद पाटील, महेश पाटील, नितीन पाटील, राजाराम पाटील, राजाराम साठे, सुनील यादव, जालिंदर पाटील, रघुनाथ यादव, दीपक पाटील, मनीषा यादव, विष्णू पाटील भाऊ, मुख्याध्यापक रामचंद्र शिद, संतोष सोनवणे, सर्जेराव शेखर प्रभाकर यादव, मनीषा लोहार अनुराधा काकडे, गजानन कुरेवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

# कै. डी.डी शिंदे सरकार यांचा स्मृतिदिन साजरा

**कोल्हापूर, ता. १३ (प्रतिनिधी) येथील विद्यापीठ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कै. डी.डी शिंदे सरकार यांचा स्मृतिदिन विद्यापीठ हायस्कूलमध्ये विविध उपक्रमांनी विद्यापीठ शिक्षण संस्थेचे चेअरमन अॅड.धनंजय पठाडे यांच्या हस्ते संपन्न झाला.**



बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे दारे खुले करण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांच्या कृपाशीर्वादाने कै.दीक्षित गुरुजी व तोफखाने मास्तर यांनी सुरू केलेली चळवळ आजही आम्ही कायमपणे अमलात आणत आहोत असे मनोगत संस्थेचे चेअरमन अॅड.धनंजय पठाडे यांनी व्यक्त केले.

# नांदगाव जंगलात शिकाऱ्यांचा डाव उधळला

## तीन संशयित आरोपी ताब्यात, देशी बनावटीची बंदूक व साहित्य जप्त

**बाजारभोगाव, ता.१३(प्रतिनिधी) नांदगाव (ता. शाहूवाडी) परिसरातील घुंगूर पिशवी रस्त्यालगतच्या जंगलात शिकारीच्या उद्देशाने फिरणाऱ्या तिघांना पेंडाखळे वनविभागाच्या सतर्क पथकाने रंगेहाथ पकडले. सोमवारी रात्री गस्तीदरम्यान अंधारात बॅटरीच्या प्रकाशामुळे संशय बळावल्याने वनपथकाने जंगलात मागोवा घेत धडक कारवाई केली.**



या कारवाईत सर्वजीत विष्णू खोत, संजय बाळू खोत आणि विठ्ठल श्रीपती खोत (सर्व रा. खोतवाडी, ता. शाहूवाडी) यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून देशी बनावटीची विनापरवाना बंदूक तसेच शिकारीसाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे. वेळेत कारवाई झाली नसती, तर एखादे निरपराध वन्यजीव बळी पडले असते, अशी माहिती वनविभागाकडून देण्यात आली. या प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. आरोपींना प्रथम वर्ग न्यायालय, कळेखेडीवडे येथे हजर केले असता न्यायालयाने त्यांना दि १७ पर्यंत वनकोठडी सुनावली आहे.

# विनयभंगप्रकरणी एकावर गुन्हा

सांगली, ता. १३(प्रतिनिधी)- शिंदेसेनेचे उपजिल्हाप्रमुख हरिदास लेंगरे यांच्याविरूद्ध महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी संजयनगर पोलिसात मंगळवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीत म्हटले आहे, पिडित महिला ही संशयित लेंगरे यांच्या ओळखीची आहे. जानेवारीत पहिल्या आठवड्यात फिर्यादी यांच्या सासऱ्या ऑफिसमध्ये लेंगरे आले होते. त्यावेळी त्यांनी फिर्यादीकडे पाहून अश्लिल हावभाव केले. त्यावेळी फिर्यादी पिडित महिलेने सदरचा प्रकार लाजेखातर घरातील लोकांना सांगितली नाही. परंतु त्यानंतर लेंगरे यांनी पिडित महिला व त्यांच्या सासऱ्याला तुमची निवडणूक लढवण्याची लायकी नाही, असे म्हणून अश्लिल शिवीगाळ केली.

# संक्रांतीच्या वाणात पर्यावरणपूरक वस्तूंचा ट्रेंड

## महिलांकडून खरेदीसाठी लगबग

**कोगनोळी, ता.१३ (प्रतिनिधी) आज महिलांचा आवडीचा आणि नवीन वर्षातील पहिलाच मकर संक्रांती सण साजरा होत आहे. त्यामुळे हळदी-कुंकू वाण देण्याच्या वस्तूंसाठी येथील बाजारात महिलांची वर्दळ दिसत आहे. केवळ हळदी-कुंकू आणि तीळगुळ देण्यापेक्षा यंदा परवडणाऱ्या उपयोगी आणि पर्यावरणपूरक वस्तू खरेदीकडे महिलांचा विशेष कल दिसून येत आहे.**



बाजारात कमी खर्चात विविध पर्याय उपलब्ध आहेत. कापडी रुमाल, सुई-धाग्याचे कीट, व्हेजिटेबल पाऊच, डबे, नाणी ठेवण्यासाठी कापडी किंवा गनी पर्स यासारख्या वस्तूंची बाजारात चलती आहे. प्लास्टिक वस्तूंऐवजी निसर्गपूरक वस्तू वाण देण्यावर अधिक भर दिसत आहे.

तुळशीची छोटी रोपेही वाण म्हणून देण्याचा अलीकडे ट्रेंड आहे. बिया, माती, नारळाच्या काथ्यापासून बनवलेली छोटी भांडी असलेले स्प्राऊट किटही भेटवस्तू म्हणून देऊ शकता. सध्या बाजारपेठांमध्ये मकर संक्रांतीच्या सणासाठी आवश्यक वस्तू खरेदीसाठी महिला वर्गाची लगबग वाढली आहे.

बांगड्या, कंगवे, टिकल्या, हळदी-कुंकवाचे बॉक्स आदी वाण म्हणून देण्याची प्रथा आहे. अनेक गृहिणी आता रिसायकल होणाऱ्या भेटवस्तू खरेदी करीत आहेत. फॅब्रिकपासून बनवलेले डोअर हॅंगर्स, पुठ्ठ्यापासून बनविलेले हळदी-कुंकू बॉक्स, कामाला जाणाऱ्या महिला डबे ठेवण्यासाठी गनी बॅग अशा वस्तूंची मागणी महिला करीत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.



मुख्य रस्त्यावर साचलेले गटारीचे सांडपाणी.

## रूईमध्ये गटार तुंबल्याने सांडपाणी रस्त्यावर

### ग्रामपंचायतचे दुर्लक्ष; ग्रामस्थांतून संताप

रुई,ता.१३ (वार्ताहर)–

**येथील मुख्य रस्त्यालगत असलेल्या गटारी मधील कचरा वेळोवेळी न काढल्यामुळे गटारी तुंबून सांडपाणी मुख्य रस्त्यावर साचत आहे. रस्त्यावरील दुर्गंधीयुक्त पाण्यातून जाताना ग्रामस्थांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

कचरा न काढल्याने रुई ते रुई फाटा या मुख्य रस्त्यालगत असणाऱ्या गावभाग परिसरातील गटारी तुंबून राहिल्या आहेत परिणामी सांडपाणी वारंवार रस्त्यावर साचून राहण्याच्या घटना घडत आहेत. कचरा गटारीच्या कडेला काढून ठेवला जातो. पण गटारीमधून काढलेला कचरा वेळेत न उचलल्यामुळे पुन्हा तो कचरा साचलेल्या पाण्यामुळे गटारीत जातो.परिणामी गटारी कचऱ्यानी परत भरतात. वाहनधारकांबरोबरच परिसरातील ग्रामस्थांना देखील या दुर्गंधीयुक्त सांडपाण्यातून मार्गक्रमन करताना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे.

खासदार यांच्या पाठपुराव्यातून रुई फाटा ते रुई या मार्गावर दोन्ही बाजूला आर.सी.सी गटर्ससाठी दोन कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर असून त्या कामास काही महिन्यांपूर्वी सुरुवात देखील झाली पण अद्यापपर्यंत गटारीचे काम पूर्ण झालेले नसून ते गावाजवळ येऊन अर्ध्यातच थांबले आहे. हे काम का थांबले ? किंवा अजून का पूर्ण झाले नाही ? याबाबत ग्रामस्थांतून उलट सुलट चर्चा सुरु आहे.

## अकोळला सौंदत्ती यात्रेस जाण्याचा कार्यक्रम जाहीर

अकोळ,ता.१३(वार्ताहर)–

येथील श्री रेणुका यात्रा विकास भक्त मंडळाच्या वतीने सौंदत्ती रेणुका देवीच्या यात्रेस जाण्याचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. देवमामा महादेव पुणेकर यांच्या यल्लमादेवीच्या मंदिरात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

२६ रोजी सकाळी बैलगाडी सवारी बांधणे,२७ रोजी सकाळी देव बाहेर काढणे, २८ रोजी सकाळी बैलगाडी बाहेर काढणे,२ फेब्रुवारी रोजी एसटी बस व खाजगी वाहनाने भक्तगण एकत्र जाणे, ३ रोजी श्री रेणुका देवी डोंगरावर लिंब नेसणे व नैवेद्य दाखवून आरती झाल्यानंतर सायंकाळी सवाद्यांच्या गजरात जग मिरवणूक काढली जाणार आहे.रात्री भाविक गावी परतणार असून ८ रोजी सोनार मळा येथे घटप्रभू होणार आहे.आंबील कार्यक्रमानंतर नैवेद्य आरती करून यात्रेची सांगता होणार आहे.

# सुरुपली व हसूरमधील चोरीचा छडा

## १ लाख ३३ हजाराचा मुद्देमाल हस्तगत;एकास अटक

मुरगूड, ता.१३ (प्रतिनिधी) –

**सुरुपली (ता.कागल) येथे पंधरा दिवसापूर्वी झालेल्या चोरीचा छडा लावण्यात मुरगूड पोलिसांना यश आले आहे.चोरट्याच्या बोटांच्या ठशावरून एका रेकोर्ड वरील चोरट्यास अटक केली आहे.राहुल प्रकाश माने (वय ३७ बेघर वसाहत घरकुल जयगड अपार्टमेंट इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली) असे त्याचे नाव आहे. त्याने कागल तालुक्यातील हसूर बुद्रुक येथे झालेल्या गुन्ह्याची कबुली दिली असून या दोन चोरीतील त्याच्याकडून १ लाख ३३ हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केला गेला आहे.**



घरफोडी प्रकरणातील संशयित आरोपी समवेत स.पो.नि.करे, स.पो.नि भाटले,हवालदार पाटील,घस्ती, देसाई, भांदिगरे आदी

याबाबत माहिती अशी की, मुरगूड– निपाणी मार्गावरील सुरुपली येथे २९ डिसेंबर २०२५ रोजी भरदिवसा घरफोडी झाली होती.त्यावेळी पोलिसांनी घटनास्थळाचे ठसे घेतले होते.हे ठसे रेकोर्डवरील राहुल माने याच्या ठशाशी जुळल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेवून अधिक चौकशी केली असता त्याने या गुन्ह्याची कबुली दिली आहे त्याने हसूर बुद्रुक येथे झालेल्या चोरीचीही कबुली दिली आहे.

या चोरट्याकडून सुरुपलीतील चोरीतील सोन्याची कानातील फुले,मंगळसुत्रातील दोन सोन्याची शिंपले व ४ डिस्को मनी,सोन्याचे बदाम लॉकेट,लहान सोन्याच्या अंगठ्या असा सुमारे ४५ हजाराचा तसेच हसूर बुद्रुक येथील चोरीतील एक मोबाईल, ४ ग्रम वजनाचे सोन्याचे कानातील वेल,२.८ ग्रमचे दोन शिप्ले,४ डिस्को मनी,सोन्याचे बदाम, लहान सोन्याच्या अंगठ्या, एक मोटारसायकल व ६ वारी ८ साड्या असा सुमारे ८८ हजार ५०० रुपयांचा तर सुरुपली येथील ४५ हजार ५०० रुपयाचा असा एकूण १ लाख ३३ हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

ही कामगिरी मुरगूड पोलीस ठाण्याचे स.पो.नि.शिवाजी करे, स.पो.नि उल्हास भाटले,हवालदार राजाराम पाटील,संतोष घस्ती,सुनील देसाई,संतोष भांदिगरे ,अरविंद सोलापुरे,रुपेश पाटील आदीच्या पथकाने केली.



## कागल उपनगराध्यक्ष जयवंत रावण यांचा कार्यालयीन प्रवेश

कागल,ता.१३(प्रतिनिधी)–

**शाहू आघाडीचे नेते समरजीतसिंह घाटगे यांच्या साक्षीने कागलचे नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष जयवंत रावण यांनी कार्यालयीन प्रवेश करीत आसन ग्रहण केले .त्याचबरोबर पक्षप्रतोद दीपक मगर यांनीही कार्यालयीन प्रवेश व पदग्रहण केले.**

उपनगराध्यक्ष जयवंत रावण यांचा मंगळवारी पदग्रहण कार्यक्रम थाटात झाला. वाद्याच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करुन मिरवणुकीस सुरूवात झाली. समरजीतसिंह घाटगे मिरवणुकीत अग्रभागी होते. घाटगे यांच्या हस्ते फीत कापून पालिकेत प्रवेश केला. नेत्यांच्या साक्षीने पदाच्या खुर्चीवर उपनगराध्यक्ष रावण व पक्षप्रतोद मगर हे आसनस्थ झाले.भैया माने ,नगराध्यक्षा सविता माने ,प्रकाश गाडेकर, चंद्रकांत गवळी ,सर्व नगरसेवक, एम पी पाटील ,प्रकाश पाटील, आसिफ मुल्ला,संजय चितारी, शिवगोंडा पाटील,गजानन माने, प्रमोद कदम,पप्पू कुंभार यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## राजर्षि शाहू व्याख्यानमाला १७ जानेवारीपासून

कागल,ता.१३(प्रतिनिधी)–

**कागल नगरपरिषदेच्यावतीने राजर्षि शाहू व्याख्यानमाला शनिवारी १७ ते बुधवारी २१ जानेवारी २०२६ या कालावधीत होणार आहे. कागल शहरातील नागरिकांसाठी ही व्याख्यानमाला म्हणजे विचारांची व ज्ञानाची पर्वणी ठरणार आहे.**

व्याख्यानमालेचे उद्घाटन शाहू ग्रुपचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे, यांच्या हस्ते होणार असून, समारोप वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

१७ रोजी डॉ. मनिषा भोजकर यांचे आनंदी आणि तणावमुक्त जीवन या विषयावर १८ रोजी पोलिस उपायुक्त कृष्णात पिंगळे यांचे स्पर्धा परीक्षा व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर १९ रोजी प्रख्यात लेखक संजय आवटे यांचे चला उभारू नवी पिढी या विषयावर, २० रोजी रणजीत आशा अंबाजी यांचे जगण्यासाठी हसा आणि हसण्यासाठी जगा या विषयावर,२१ रोजी प्राचार्य यशवंत पाटणे यांचे विवेकदीप उजळूया या विषयावर व्याख्यान होणार आहे. व्याख्यानमाला हिंदुराव घाटगे शाळा पटांगणावर होणार आहे,असे नगराध्यक्षा सविता माने, उपनगराध्यक्ष जयवंत रावण, मुख्यधिकारी अजय पाटणकर यांनी सांगितले.यावेळी प्रताप माने, चंद्रकांत गवळी, प्रकाश गाडेकर, प्रवीण काळबर, एम. पी. पाटील, शिवगोंडा पाटील, कृष्णात पाटील उपस्थित होते.

# तपासणीत अथणी शुगर्सचे वजन काटे अचूक

गारगोटी ता. १३(प्रतिनिधी)–

**जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या आदेशाने निरीक्षक वैद्यमापन शास्त्र व इतर अधिकारी यांच्या भरारी पथकाने तांबाळे (ता. भुदरगड) येथील अथणी शुगर्स भुदरगड युनिट येथे दोन्ही ऊस वजन काट्याची तपासणी करण्यासाठी अचानक भेट दिली व दोन्ही वजन काट्याची संपूर्ण पडताळणी केली. तपासणी कामी ट्रक व ट्रॅक्टर अशा पूर्वी वजन केलेल्या व नवीन वाहनांची वजने घेतली तसेच दहा टनाची वजने प्रत्यक्षात ठेवून तपासणी केली.त्यामध्ये कोणतीही तफावत आढळून आली नाही, वजन काटे अचूक असल्याचे निदर्शनास आले.**



तांबाळे येथील अथणी शुगर्समध्ये वजन काटे तपासणी करताना अधिकारी.

अथणी शुगर्स भुदरगड युनिट या साखर कारखान्याचे ऊस, साखर व उपपदार्थ वजन करणारे सर्वकाटे बिनचूक व निर्दोष असल्याचे स्पष्ट झाले, काटे बिनचूक असल्याचा अहवाल भरारी पथकाच्या अधिकाऱ्यांनी कारखान्यास सादर केला. अथनी शुगर्स भुदरगड तालुक्याच्या ग्रामीण भागातील एकमेव कारखाना आहे. या कारखान्याच्या वजन काट्याबाबत ऊस पुरवठादार शेतकऱ्यांमध्ये नेहमीच विश्वासार्हता आहे.या तपासणीमुळे ती विश्वासार्हता पुन्हा सिध्द झाली आहे.भरारी पथकाचे अधिकारी एस.पी.पोवार, मंडल अधिकारी एस. एम. खाडे (निरीक्षक वैद्यमापन शास्त्र), बी. एन. खाडे (लेखा परीक्षक श्रेणी १), एम. जी. पोवार, विलास शामराव पाटील व रंगराव लहू पाटील यांनी कारखाना चीफ इंजिनिअर नामदेव भोसले व केनयार्ड सुपरवायझर प्रकाश देसाई यांचे समक्ष काट्याची तपासणी केली.यावेळी कारखान्यातील अधिकारी, ऊस पुरवठादार शेतकरी, केनयार्डचे कर्मचारी, वाहन मालक, चालक उपस्थित होते. तसेच १६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर पर्यंतचे ऊस बिले सदर ऊस उत्पादकांच्या नावावर बँकेत लवकरच जमा केले जातील.


### जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर ३२७ पैकी क्षेत्र १००० – ०० चौरस फुटची खुली जागा यासी चतु:सिमा पुर्वेस–मंजु रमेश जाजु यांची मिळकत, पश्चिमेस – मंजु रमेश जाजु यांची मिळकत, दक्षिणेस–मिरजे यांची मिळकत,उत्तरेस – रस्ता. सदरची मिळकत ही अरूणा अशोक गेजगे रा तारदाळ यांचे कब्जेमालकीची असुन त्यांनी सदर मिळकतीचा खरेदीपूर्व करारपत्र बाळासो महादेव नुले रा जयसिंगपुर यांना करून दिलेला आहे. त्यांनी आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकार पावती करून दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा हक्क, दावा, पोटगी, बोजा कोर्ट केस इजमेंट इत्त्यादी वगैरे असलेस सदर नोटिस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी म्हणुन दिली नोटीस सही ता. १३/०१/२०२६

**ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे**

३/१५३, देवमोरे वाडा, टाकवडे वेस, राणाप्रताप चौक, इचलकरंजी.
मो. ९८८१०१४७२५.

### जाहीर नोटीस

मौजे कबनूर येथील गट नंबर ६९६ पैकी क्षेत्र हे ०.१०.०० आर ची शेतजमिन मिळकत यासी चतुः सिमा पुर्वेस – वंदना चव्हाण यांची मिळकत पश्चिमेस – दिपक व रामराव कृष्णा फरांडे यांची मिळकत दक्षिणेस– २० फुट सरकारी रस्ता, उत्तरेस – संजय क्षितिजा वगैरे यांची मिळकत . सदरची मिळकत ही यशवंत भाऊ फरांडे रा. कबनुर यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्वीकारून त्यांना सदर मिळकतीचा करार करून दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा हक्क, दावा, पोटगी, बोजा कोर्ट केस इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटिस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. १३/०१/२०२६

**ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे**

३/१५३, देवमोरे वाडा, टाकवडे वेस, राणाप्रताप चौक, इचलकरंजी.
मो. ९८८१०१४७२५.

### जाहीर नोटीस

शहर इचलकरंजी येथील सि. स. नंबर १८१२५/अ/२० चे क्षेत्र २८०.५० चौरस मीटर ची मिळकत. यासी चतु:सिमा–पुर्वेस– रस्ता पश्चिमेस– श्री. श्रीरंग जाधव यांची मिळकत, दक्षिणेस–श्री. तोष्णिवाल यांची मिळकत उत्तरेस– रस्ता सदरची मिळकत ही सौ. ज्योती चंद्रकांत गांधी रा. इचलकरंजी यांच्या मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे तोंडीकरार आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्वीकारून करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता.१३/०१/२०२६.

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर, बस स्टॉपजवळ सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन :– जिल्हा व तुकडी कोल्हापूर, तालूका हातकणंगले, मा. दुय्यम निबंधकसो वर्ग २ इचलकरंजी यांचे अधीकारकक्षेतील मौजे आळते येथील गट नं. १७१६ पैकी लिहून देणार यांचे हिस्सेचे क्षेत्र हे . १.६.८० आर, आकार रू. १.५० पैसे पैकी पूर्वेकडील क्षेत्र हे. ०.२० आर ची शेतजमीन मिळकत यांसी चतु:सिमा पुढीलप्रमाणे :– पुर्वेस :– याच गट नंबर पैकी सुभाष श्रीपती गुरव यांची मिळकत, पश्चिमेस :– याच गट नंबरपैकी लिहून देणार यांची मिळकत, दक्षिणेस :–श्री वसंत तुकाराम रोहीले वगैरे यांची मिळकत, उत्तरेस:– सरकारी रस्ता. येणेप्रमाणे चतुः सिमेतील शेतजमीनची 'मिळकत' होय.

२) वरील पॅरा नं १ मधील मिळकत १. आण्णासो श्रीपती गुरव २ . बाळासो श्रीपती गुरव ३ . शितल मनोहर गुरव ४ . संदिप बापू गुरव व ५. सचिन बापू गुरव यांचे मालकीची असून सदरील मिळकतीच्या सातबारा पत्रकी मालक म्हणून त्यांचे नावाची नोंद झालेली आहे. सदरील मिळकतीसंदर्भात त्यांचे आमचे अशिलांशी तोंडी करार करून सदरील मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांस दिलेला आहे.

३) सबब, सदरील मिळकतीवर कोणाचाही, कोणताही हक्क, करार, बोजा, प्रिएम्शन, कुळ हक्क वगैरे हक्कसंबंध असतील तर तो त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावरती लेखी कळवावे मुदतीत तक्रार न आलेस सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही म्हणुन प्रसिध्द केली जाहीर नोटीस सही ता. १३/०१/२०२६.

**ॲड. नितीनकुमार कल्याणमल लड्डा**

ऑ–जी–५, जैनको टॉवर आर.पी. रोड, इचलकरंजी.
मो. ९८९०१४१३०१.

### जाहीर इशारा

आमचे अशिल सुशिला राजाराम गोलंगडे वगैरे, रा. इचलकरंजी यांनी दिलेल्या माहितीद्वारे व दाखविले कागदपत्राआधारे तमाम लोकांना कळविणेत येते की,

**मिळकतीचे वर्णन :–** जिल्हा कोल्हापूर, ता. हातकणंगले पैकी शहर इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

अ) क.ग.नं.५३८/१ याचे एकूण क्षेत्र ० हे. २४ आर, आकार २ रु.५४ पै. यापैकी प्रतिवादी यांचे नावे असलेली ० हे. ०८ आर, आकार ० रु. ८५ पै. ची शेतजमीन मिळकत.

ब) क.ग.नं.५०७/१ क्षेत्र १ हे. १९ आर पो.ख. ० हे. ०१ आर एकूण क्षेत्र १ हे. २० आर, आकार १३ रु. ०७ पै. यापैकी क्षेत्र ० हे. ३९.६६ आर, आकार ४ रु. ३६ पै. ची संपुर्ण शेतजमीन मिळकत.

क) सि.स.नं.४७३३ एकूण क्षेत्र ५१–८० चौ. मी. यापैकी प्रतिवादी यांचे नावे असलेले १७–२६ चौ.मी. ची खुली व पडसर असलेली बांधीव मिळकत.

ड) सि.स.नं.४७४२ याचे एकूण क्षेत्र ३८–५० चौ.मी. यापैकी प्रतिवादी यांचे नावे असलेले १२– ८३ चौ.मी. ची खुली व पडसर असलेली बांधीव मिळकत.

इ) सि.स.नं.४७४३ याचे एकूण क्षेत्र ४६–८० चौ.मी. १५–६ चौ. मी. ची खुली व पडसर असलेली बांधीव मिळकत...

ई) सि.स.नं.४७४४ याचे एकूण क्षेत्र १०–० चौ.मी. यापैकी प्रतिवादी यांचे नावे असलेले ३–३३ चौ.मी. ची खुली व पडसर असलेली बांधीव मिळकत.

येणेप्रमाणे वर नमूद 'अ' ते 'ई' या मिळकती मधील असणारा कायदेशीर हक्क व हिस्सा.

येणेप्रमाणे वर नमुद मिळकतीबाबत आमचे अशिलांनी अंजना राजाराम जाधव, श्री. आशुतोष राजाराम जाधव, सुशिला मारुती जाधव रा. मिरज व मनोहर गोविंद नलवडे, बाळासाहेब गोविंद नलवडे, उत्तम गोविंद नलवडे रा. इचलकरंजी यांचेविरुध्द मे.सिव्हील जज्ज, ज्युनिअर डिव्हीजन, इचलकरंजी यांचे न्यायालयात रे. दि.क.नं. १९९/२०२५ हा वाटपाचा, हक्कज्ञापनाचा व कब्जाचा व कायम मनाई ताकिदीचा दावा दाखल केला आहे. सदर दावेकामी सर्व प्रतिवादींना समन्स लागू होवून प्रतिवादी हे मे. न्यायालयात हजर झाले आहेत. वर नमुद मिळकतीबाबत प्रतिवादी अगर प्रतिवादीमार्फत हक्क सांगणाऱ्या कोणाही व्यक्तीने वर नमुद मालमत्तेचे स्वरुप बदलेल असे विक्री, हस्तांतर किंवा कोणत्याही तृतीय पक्षाचा हक्क निर्माण करु नये याबाबत स्टेटस्कोचा आदेश पारित केलेला आहे. तरी वर नमूद मिळकतीबाबत वर नमुद इसमांशी (जाधव व नलवडे) कोणताही व कसलाही व्यवहार करु नये, केलेस त्यांची फसगत होणार असून त्यांना कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. म्हणून प्रसिध्द केला जाहीर इशारा. ता. १२/१/२०२६.

**ॲड. धीरज पृथ्वीराज पारख**

१०/५, पवन रेडिमेड, तारा हॉटेल जवळ, इचलकरंजी
मो. ९९२२०९९५६७

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन – जि. कोल्हापूर, ता. शिरोळ पैकी मौजे यड्राव ग्रामपंचायत हद्दीतील क.ग.नं.५१७ एकूण क्षेत्र हे. आर. ३–७५ आकारणी रु. पै. ६.९४ यापैकी क्षेत्र हे. आर. ०–३१ आकारणी रु.पै.०.५७ ची शेतजमीन सर्व यांसी चतुःसीमा : पूर्वेस – क.ग.नं. १५ ची मिळकत, पश्चिमेस – सार्वजनिक रस्ता, दक्षिणेस – सदर गट नंबर पैकी श्री. अशोक आप्पा निर्मळ यांची मिळकत, उत्तरेस – सदर गट नंबर पैकी श्री. बाबासो आप्पा निर्मळ यांची मिळकत.

२) वर कलम १ मध्ये विस्ताराने वर्णन केलेली मिळकत ही सौ. राजुदेवी अमराराम चौधरी रा. इचलकरंजी यांचे मालकी व वहिवाटीची मिळकत असून त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलांना खरेदी देण्याबाबत लेखी करार केलेला आहे. त्याचवेळी वरील मिळकत पूर्णतः निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळाही त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे.

३) सबब, सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचेही कसल्याही स्वरूपाचे करार, तारणगहाण, कूळहक्क, लायसेंसी अधिकार, वारसा हक्क, बक्षिसपत्र, वहीवाट, ॲटेचमेंट, पोटगी किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अथवा चालू दावा, अपील तसेच तक्रार वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर अस्सल कागदपत्रानीशी समक्ष लेखी तक्रार करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही तक्रार न आलेस कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून आमचे अशील वरील खरेदी व्यवहार पुरा करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशीलांचे खरेदी हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक असणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस स. ता. १३/०१/२०२६.

**ॲड. अक्षय बाळकृष्ण खांडेकर**

२/४३, रामजानकी हॉल मागे, गावभाग, इचलकरंजी.

### जाहीर नोटीस

मौजे खोतवाडी येथील गट नं ६९ पैकी प्लॉट नं २९ चे क्षेत्र १६६ चौरस मीटर ची खुली जागा मिळकत यासी चतुः सिमा– पुर्वेस – प्लॉट नं ३०, पश्चिमेस – प्लॉट नं २८, दक्षिणेस– २० फुट रस्ता, उत्तरेस – सदर गट नंबर पैकी मिळकत सदर मिळकत ही श्री भुपाल आबा दावाडे रा. यड्राव यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना तोंडी करार करून दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. १२/०१/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर, बस स्टॉपजवळ सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

### जाहीर नोटीस

मौजे खोतवाडी येथील गट नंबर ८९ / ११ पैकी समजुतीच्या नकाशाप्रमाणे प्लॉट नंबर ८ बी चे क्षेत्र ८२१ चौ. फुट ची जागा व यावरील घर मिळकत यासी चतु:सिमा– पुर्वेस – २० फुट रस्ता. पश्चिमेस – प्लॉट नंबर ८ ए ची मिळकत, दक्षिणेस – २० फुट रस्ता, उत्तरेस – प्लॉट नंबर ८ सी ची मिळकत. सदर मिळकत श्री. वैभव संजय कुंभार व श्री आकाश आनंदा पाटील. रा. दोघे इचलकरंजी यांचे कब्जे वहीवाटीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे संचकारपत्र आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क,दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. १२/०१/२०२६.

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर, बस स्टॉपजवळ सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

### जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील गट नं. ४४८ पैकी प्लॉट नं. १०अ चे क्षेत्र – ७९–० चौ. मी . खुली जागा मिळकत संपुर्ण . यासी चतु:सिमा पुर्वेस – हिरामण पाटील यांची मिळकत, पश्चिमेस –खटावकर यांची मिळकत, दक्षिणेस– गुरव यांची मिळकत, उत्तरेस–२० फुट रस्ता. येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही सलीम करिम मिरशिकारी व इसाक अब्दुल्ला पटेल यांचेकडून दत्ता महादेव पाटील यांनी कराराने घेतलेली व त्यांचेकडून राजु मनोहर लाटकर रा. कोरोची यांनी करारपत्राने घेतली असुन त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दी पासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस. सही

ता . १३/०१/२०२६

**ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने**

पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफिस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,
मो. ७८२०९०९७०५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की,

मौजे तारदाळ येथील गट नं. ६३५ पैकी भुखंड क्र. ५८ क्षेत्र चौ.मी. ११२.० ची गुंठेवारी बिगरशेती खुली जागा सर्व. यासी चतु:सिमा– पुर्वेस – याच गट नंबरपैकी मिळकत, पश्चिमेस– २० फुट रुंदिचा रस्ता, दक्षिणेस – सुरेखा रमेश सावे यांची मिळकत, उत्तरेस – याच गट नंबरपैकी मिळकत. याप्रमाणे चतु:सिमेतील बिगरशेती खुली जागा मिळकत तदंगभुत वस्तूसह सर्व.

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली बिगरशेती खुली जागा सुरेखा रमेश सावे रा. इचलकरंजी यांचे मालकीची आहे. सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा देउन आमचे मित्राला खरेदीपत्र पुरे करून देणेचे अटीवर तोंडी संचकार रक्कम स्विकारलेली आहे. सबब वरील मिळकती संदर्भात कोणाचा, कसलाही हक्कसंबंध,करार,तारण, गहाण, तसेच वित्तीय संस्था कर्ज बोजा, दावा, पोटगी, बक्षिस, कुळहक्क वगैरे असलेस नोटीस प्रसिद्धी पासून पंधरा (१५) दिवसाचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह खात्री पटवुन द्यावी. तसे मुदतीत झाले नाही तर ठरलेप्रमाणे आमचे मित्र खरेदीपत्र पुरे करुन घेतील. नंतर तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस असे सही ता. १३/०१/२०२६ इसवी

**श्री. एम.आय. मुल्ला**

मुद्रांक विक्रेता

रा. शांतीनगर, इचलकरंजी.
मो. ९९२२२४२१२३.

# लेखकांनी मराठी भाषेला सातासमुद्रापार नेले

### अशोक दास

इचलकरंजी,ता.१३-

**मराठी भाषा आपली मायबोली असून संत ज्ञानेश्वरांच्यापासून ते आजच्या नवजात मराठी लेखकांनी मराठी भाषेला सातासमुद्रापार नेले आहे हा माय मराठीचा गौरव आहे, असे प्रतिपादन मराठी भाषेचे अभ्यासक व गोविंदराव हायस्कूलचे माजी अध्यापक अशोक दास यांनी केले.**

ते रोटरी सेंट्रल एक्झिक्युटिव्ह प्रोबस क्लबच्यावतीने नाकोडा नगर येथे आयोजित साहित्यिकांच्या सहवासात या विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी सुनील कोष्टी हे होते.



प्रोबस क्लब तर्फे अशोक दास यांचा सत्कार करताना रामचंद्र निमणकर, प्रकाश सातपुते ,सुनील कोष्टी आदी मान्यवर.

ते पुढे म्हणाले,इचलकरंजी ही वस्त्रनगरी असूनही साहित्यामध्ये ज्या ज्या गोष्टी चालू केल्या,त्या आजपर्यंत चालू असून आपटे वाचन मंदिर व बालकृष्ण बुवा सांस्कृतिक केंद्र हे साहित्य आणि संस्कृतीचे प्रमुख केंद्र आहे.इचलकरंजीच्या भूमीमध्ये मराठी साहित्य परिषद झाली होती हा इचलकरंजीचा गौरव आहे.प्रारंभी स्वागत रामचंद्र निमणकर यांनी केले.प्रास्ताविक किरण कटके यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय जयप्रकाश शाळगावकर यांनी करून दिला.यावेळी प्रकाश सातपुते यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी शिवबसु खोत, काशिनाथ जगदाळे,डी.एम.बिरादार, डॉ.कुबेर मगदूम,जुगलकिशोर तिवारी,ॲड. विश्वासराव चुडमुंगे, अशोक पाटील, जगन्नाथ पोटे, वैभव डोंगरे, प्रमोद लाटणे, श्रीकांत कंगळे, विजय पोवार,अनिल ज्वारे, आनंदा मेटे, रमेशभाई पंड्या, रामदास कोळी, बापूसाहेब घुले, मल्लिकार्जुन तेग्गी, लक्ष्मण घंटा,काशिनाथ टकले, अरूण केटकाळे, विजय बनसोडे, ज्ञानदेव मेटे,बालमोहन कित्तुर, राजेश पिष्टे,जयश्री चौगुले,दिपाली कोळी, नीता दोड्डणावर, माधवी कुलकर्णी, एषीबेन पंड्या, मंजुळा कांबळे,मनिषा कोष्टी, माया होगाडे,गीता लाटणे, मंगल डोंगरे, उज्वला आगरे, राजश्री वाटेगावे, प्राजक्ता होगाडे,आनंदी हजारे, लिलावती बिरादार,डेझी कुरणे, आशालता पाटील आदी सभासद उपस्थित होते.आभार सह-सेक्रेटरी सौ.संगीता लडगे यांनी मानले.

# ग्रामरत्न पुरस्काराच्या निमित्ताने माझे हात सोन्याचे झाले

## अभिनेत्री निशिगंधा वाड; तारदाळात ग्रामरत्न पुरस्काराचे वितरण

तारदाळ,ता.१३(वार्ताहर)-

**आयुष्याच्या विद्यापीठात किती माणसे वाचली हे महत्वाचे असून किती पदव्या आहेत हे महत्वाचे नाही. खूप मोठमोठी स्वप्ने पहावीत. तसेच परिश्रमही खूप मोठे करावेत.आपल्यातील नेमके गुण हेरून त्याचा गुणाकार करणे गरजेचे आहे म्हणजे जगणे सुलभ होईल.**

ज्ञान गंगेमध्ये ज्ञानार्जन करण्यासाठी चाललेला हा नंदादीप गेली २० वर्ष तारदाळ येथील साहित्य प्रेमी युवा मंच जपत आहे, असा श्रोता वर्ग वर्षानुवर्ष जपला जातो आहे. या ग्रामरत्न पुरस्कार देण्याच्या निमित्ताने माझे हात सोन्याचे झाले, असे मला वाटते. या कार्यक्रमाचे संचित घेवून मी जात आहे. याचे मला मनस्वी आनंद आहे, असे वक्तव्य तारदाळ येथील कार्यक्रमात प्रसिद्ध अभिनेत्री डॉ.निशिगंधा वाड यांनी केले.



तारदाळ येथे ग्रामरत्न पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी बोलताना प्रसिद्ध अभिनेत्री निशिगंधा वाड शेजारी प्रमुख मान्यवर.

यावेळी शिवचरित्र व्याख्याते राहूल नलावडे म्हणाले की,पुरस्काराने प्रेरणा मिळते. शिवचरित्रातही ऐतिहासिक काळात मावळ्यांनी केलेल्या कर्तबगार कामगिरी बद्दल महाराजांनी त्यांना सोन्याचा कडा देवून त्यांचा मान सन्मान केला. त्यामुळे त्याकाळातही मावळ्यांना प्रेरणा देवून स्वराज्यासाठी असंख्य मावळे तयार केले, असे मत त्यांनी मांडले.तारदाळ येथे ग्रामरत्न पुरस्कार वितरणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सीए चंद्रकांत चौगुले, प्रसाद खोबरे, सरपंच पल्लवी पोवार, विशाल कुंभार,दिलीप शेंडे, प्रसाद कुलकर्णी, श्रीकृष्ण दरेकर, अंजना शिंदे, यशवंत वाणी, यासीन मुजावर, राणी शिंदे, के.जी.पाटील, प्रकाश खोबरे, प्रविण पाटील, संजय चोपडे, गजानन नलगे, चंद्रकांत तांबवे, भाऊसो चौगुले, विमल पोवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.प्रास्ताविक गजानन खोत यांनी केले. यावेळी डी.पी. भगत यांनी २० वर्षाचा प्रवास विशद केला. सुत्रसंचालन विश्वनाथ मांजरे व विशाल देसाई यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन दिलीप खोत गजानन खोत व सर्व सदस्यांनी केले.



शासकीय चित्रकला ग्रेड परिक्षेतील यशस्वी मारवल स्कूलच्या यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत मार्गदर्शक शिक्षक वृंद.

## शासकीय चित्रकला ग्रेड परिक्षेत मारवल इंग्लिश स्कूलचे यश

इचलकरंजी,ता.१३-

**येथील मारवल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी शासकीय चित्रकला ग्रेड परिक्षेत यश संपादन केले. वर्ष २०२५-२६ करीता घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या 'इलेमेंटरी व इंटरमेडियट' ड्रॉईंग ग्रेड परिक्षेमध्ये प्रशालेचा निकाल यंदाही १०० टक्के लागला.**

यामध्ये सदफ कुरणे व फैजान बागवान या विद्यार्थ्यांनी 'अ' श्रेणी प्राप्त केली.तसेच ३ विद्यार्थ्यांनी 'ब' श्रेणी तर ४ विद्यार्थ्यांनी 'क' श्रेणी प्राप्त केली. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन प्रा.नंदराज पवार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सर्व विद्यार्थ्यांना प्रा.शुभांगी पवार तसेच कलाशिक्षिका सादिया मोमीन यांचे मार्गदर्शन लाभले.

# राधानगरी तालुक्यावर पावसाचे सावट

शिरगाव,ता.१३(प्रतिनिधी)-

**राधानगरी तालुक्यात गेले दोन दिवस ढगाळ वातावरण निर्माण झाले असून काही भागात पावसाच्या हलक्या सरीचा शिडकावा झाला. ढगाळ वातावरणामुळे हवामानात चढउतार होत आहे. त्यामुळे थंडी काही अंशी कमी झाली आहे.**

तालुक्यात गेल्या काही दिवसापासून थंडीच्या प्रमाणात मोठी वाढ झाली होती.कडाक्याच्या थंडीने जनजीवन गारठून गेले होते. थंडीमुळे सर्दी, ताप, खोकला आदी रोगाने डोके वर काढल्याने दवाखान्यात उपचारासाठी रुग्णांची गर्दी दिसून येत होती. दरम्यान रविवार सकाळपासून तालुक्यात ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. या दिवशी रात्री पावसाच्या हलक्या सरी पडल्या. सोमवारी ही ढगाळ वातावरण कायम होते.

ढगाळ वातावरण व निर्माण झालेल्या पावसाच्या शक्यतेमुळे नागरिकांची गवत गंजी, पिंजाराच्या व्हळ्या, जळाऊ लाकडे, शेण व अन्य साहित्य झाकून ठेवण्यासाठी धांदल उडाली आहे. यावर्षी आता पर्यंतच्या अनुकूल वातावरणामुळे आंब्यांच्या झाडांना चांगला मोहर आला आहे. त्यामुळे आंबा पिकातून शेतकऱ्यांना चांगल्या उत्पन्नाची अपेक्षा होती. मात्र सध्याच्या वातावरणामुळे आंब्यांच्या मोहोरावर परिणाम होऊ शकतो. तसेच वरणा व अन्य पिकावर रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. पुन्हा पाऊस झाल्यास शेती कामात व्यत्यय निर्माण होणार असल्याने बळीराजाच्या चिंतेत वाढ झाली आहे.

# व्हॉलीबॉल स्पर्धेचा टीम पारीक प्रोसेसर्स मानकरी

इचलकरंजी,ता.१३-

**राजस्थानी युवक मंडळाच्या वतीने कापड मार्केट येथे आयोजित सहा दिवसीय व्हॉलीबॉल स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या.**

या आयोजनात टिम पारीक प्रोसेसर्स विजेता ठरली आणि टिम श्री वीर तेजा स्पोर्टस् उपविजेता ठरली तसेच बेस्ट प्लेयरचा मान नरेन्द्र चौधरी, बेस्ट नेटरचा मान अनिश खोखर यांना मिळाला. त्याचप्रमाणे इमर्जिंग प्लेअरचा मान कृष्णा जाजू व नारायण डागा यांना मिळाला आणि उत्कृष्ट खेळ प्रदर्शनासाठी सत्यनारायणजी मुन्दडा यांना २०२६ चा जीवन गौरव पुरस्कार



दिला गेला. सदर स्पर्धेचा उपस्थित प्रेक्षकांनी भरपूर आनंद घेतला.या स्पर्धेत प्रमुख पाहुणे म्हणुन राजेंद्र घोडावत, सुनिल जैन, श्रीनिवास बोहरा, ओमप्रकाश खण्डेलवाल, कृष्णगोपाल जोशी, कमलकिशोर खण्डेलवाल, पंकज त्रिपाठी, विनोद नावंधर, सर्वेश्वर भांगडीया, टोडरमल बांगड तसेच नंदकिशोर भराडिया, रामस्वरुप पुरोहीत, ओमप्रकाश चाण्डक, श्रीपाल पारीक, टिम मालक प्रेमप्रकाश मंत्री, बीरमाराम चौधरी, राजेंद्र व्यास,धनराज पारीक, शिवरतन राठी, नरेंद्र हेडा व सर्व कार्यकारणी,मंडळाचे सदस्य व मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेसाठी प्रो.चेअरमन गोपीकिशन काबरा, व्हा.प्रो.चेअरमन गिरीषकुमार सेवदा आणि प्रो.कमिटी म्हणून कृष्णगोपाल जोशी, मोहनलाल चोयल,जगदिश तिवाडी,आनंद पारीक,दिनेश मणियार, राजू दोसी, कपील दरक, उम्मेदसिंह राठौड,शिवप्रसाद राठी,अजित चितलांगिया,विमल मालपाणी, दीपक खाबाणी, शंकर जुनावा, ओमप्रकाश चोयल यांनी मेहनत घेतली. सदर स्पर्धेमध्ये स्कोरर म्हणून लक्ष्मीनारायण मणियार यांनी काम केले.राजु उपाध्याय यांनी स्वागत केले. शैलेश गंगवाल यांनी आभार मानले.



## दत्तवाडात आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

दत्तवाड,ता.१३(वार्ताहर)-

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज्य अभियान योजना अंतर्गत दत्तवाड ग्रामपंचायत व अथायु युरो केअर यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात शंभर पेक्षा जास्त रुग्णांची तपासणी करण्यात आली.**

येथील देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार सभागृह दत्तवाड ग्रामपंचायत व डॉ.राहुल पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या आरोग्य शिबिरा मध्ये विविध प्रकारच्या रुग्णांची तपासणी करण्यात आली व त्यांना औषधोपचार व मार्गदर्शन करण्यात आले.१०० पेक्षा जास्त रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. यावेळी सरपंच अनिता कडाके, ग्रामविकास अधिकारी संतोष चव्हाण यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी ग्रामस्थ, रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साक्षी पाटीलची प्रजासत्ताक दिन परेडसाठी निवड

सै.टाकळी,ता.१३(प्रतिनिधी)

**सहकारभूषण एस के. पाटील कॉलेज कुरुंदवाड येथील इयत्ता १२ वी कॉमर्स मध्ये शिकणारी विद्यार्थिनी साक्षी हणमंत पाटील हिची मुंबई येथे होणाऱ्या पथसंचलन करण्यासाठी ता.२६ जानेवारी रोजी होणाऱ्या प्रजासत्ताक दिनी परेड साठी निवड झाली आहे.**



तिला संस्थचे अध्यक्ष विजय पाटील, प्रा.डॉ. एस.व्ही कोठावळे, प्रा.संदीप सावगावे, प्रा.राऊत डी.एन,सहा, प्रकल्पधिकारी प्रा.सौ.ए.के.पाटील, प्रा.ए.ए.जाधव, प्रा.पी. एम.इंगळे व सर्व प्राध्यापक यांचे सहकार्य लाभले.

# नाईट कॉलेजमध्ये एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

इचलकरंजी,ता.१३-

**शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत, नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, इचलकरंजी येथे 'ग्रंथालय सेवांवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.**

सदर कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ.सचिनकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी 'ग्रंथालय आणि कृत्रिम बुद्धिमत्ता: एक नवीन दृष्टीकोन' या विषयावर मार्गदर्शन केले.अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. व्ही. आर. खानाज हे होते. त्यांनी कृत्रिम



नाईट कॉलेजमध्ये आयोजित एकदिवसीय कार्यशाळेप्रसंगी बोलताना सचिनकुमार पाटील व्यासपीठावर इतर मान्यवर.

बुद्धिमत्ता आणि उपजत बुद्धी यांच्यातील फरकावर भाष्य केले. प्रा.डॉ.एस.ए.पौडमल यांनी प्रास्ताविक तर पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.जी.बी.खांडेकर यांनी करून दिला.

दुपारच्या सत्रात तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी वारणानगर येथील प्रा.डॉ.कांतीलाल ताम्हाणे यांनी 'ग्रंथालयामध्ये चॅट जीपीटी आणि ए.आय.साधनांचा वापर' या विषयावर तंत्रस्नेही मार्गदर्शन केले.

शेवटच्या सत्रात सहभागी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले आणि त्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा.एस.आर.पाटणकर यांनी केले.आभार प्रा.एफ.एन. पटेल, प्रा.पी.एम.काळे,प्रा.डॉ.एस. ए.सय्यद आणि प्रा.डॉ.एस.एस. चव्हाण यांनी मानले.

या कार्यशाळेला विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.कार्यशाळेचे नियोजन ग्रंथालय विभागातर्फे प्रा.डॉ.जी. बी.खांडेकर यांनी केले.


आम्ही रसिक आयोजित... (सहकार्य-अ.भा.मराठी नाट्य परिषद इचलकरंजी शाखा)
उद्या गुरु. १५ जाने. रात्री ठीक ९.३० वा. घोरपडे नाट्य. इचल.
माणूस आणि तांत्रिकपणा यातला फरक... आजच्या कळीच्या विषयावरील, अत्याधुनिक संदर्भानी युक्त असणारं झकास विनोदी तसेच आशयपूर्ण नाटक...




तिकीट दर - ५००, ४००, ३००/- | तिकीट विक्री १२ जानेवारीपासून नाट्यगृहावर.
ऑनलाईन बुकींग bookmyshow | फोन बुकींग 9579573855 | काही जागा राखीव

श्रीहरी
शुक्रवार, ता.०९/०१/२०२६ पासून दुपारी १ व ४ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
हवस
प्रौढांसाठी
सायं. ७ वा.
ऑफिस गर्ल
A A

श्रीदत्त
शुक्रवार, ता. ९ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
द लास्ट मुज
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 शुक्रवार ता. ९ पासून
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज ४ खेळ *१२*३*६*९ वा.




५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
भाग्यरेखा DOLBY DIGITAL
शुक्रवार ता. ९ पासून रोज ४ खेळ
नवीन डॉल्बी डिजिटल साऊंड सिस्टीम
रोज ४ खेळ *१२*३*६*९ वा.




कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत शुक्रवार ता. ९ पा
१२, ३, ६, ९ वा




गुरु शुक्रवार ता.९ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२.१५ * ३.३० * ६.३० व ९.३० वा.
प्रभासचा फुल्ल फॅमिली एंटरटेनमेंट




RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow




"रप्पाटा" (मराठी) 10:15 AM, 01:15 PM 04:00 PM, 06:30 PM 09:30 PM
"द राजा साब" (हिंदी) 11:30 AM, 03:30 PM 07:00 PM, 10:30 PM
"धुरंधर" (हिंदी) 11:45 AM, 06:30 PM, 10:15 PM
"क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यम" (मराठी) 03:30 PM
आता मूवी सोबत वेन्स्डे फूड कॉम्बोचा लाभ घ्या
आता कोणताही शो पहा फक्त 80/-* मध्ये

फोर्च्युन सिनेफ्लेक्स इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11




क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम (MAR) (U/A) 01.15, 04.45, 07.45, 10.00pm
रप्पाटा (MAR) (U/A) 11.00am, 02.30, 07.30, 10.30pm
दि राजा साब (HIN) (U/A) 11.00am, 06.15pm
धुरंधर (HIN) (A) 02.30, 04.00, 10.00pm
बुधवार धमाका कोणताही शो पहा फक्त 80 रु
बुधवार धमाका ऑफर निमित्त मोठ्या टब पॉपकॉर्न वर मिळावा 1 रिफील फ्री.

# सर्वसाधारण आरक्षणामुळे बावची गटात चुरस

## राष्ट्रवादी विरुद्ध महायुतीत लक्षवेधी लढत होणार

आष्टा,ता.१३(डॉ.तानाजी टकले)-

**जिल्हा परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत बावची जिल्हा परिषद गट आरक्षणात सर्वसाधारण खुला निघाल्याने राजकीय संघर्षाने खचाखच्च भरलेल्या या गटात मोठी चुरस निर्माण होणार आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट विरुद्ध महायुतीतील शिवसेना शिंदे-भाजपा व रयत क्रांती गट अशी लढत होण्याची चिन्हे आहेत. बावची गट जयंत पाटील यांचा गड आहे. या गडावर महायुतीचा झेंडा फडकवण्यासाठी विरोधकांचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत.**

बावची जिल्हा परिषद गट सर्वसाधारण खुला आहे.तर बावची व गोटखिंडी पंचायत समिती गण सर्वसाधारण महिलांसाठी राखीव आहे. बावची गणात बावची, पोखर्णी, नागाव व ढवळी ही लोकसंख्येच्या आणि मतदार संख्येच्या दृष्टीने मोठी असणारी गावे आहेत. तर गोटखिंडी गणात गोटखिंडी, येडेनिपाणी व मालेवाडी ही गावे आहेत. यातील बहुतांश गावात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची सत्ता आहे.मागील निवडणुकीत येथे अनुसूचित जाती महिला आरक्षण होते. राष्ट्रवादीच्या राजश्री एटम या जिल्हा परिषद सदस्य म्हणून तर काँग्रेसचे आनंदराव पाटील व हुतात्मा गटाचे आशिष काळे पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून आले होते. आतापर्यंत या जिल्हा परिषद गटात आमदार जयंत पाटील यांचे वर्चस्व आहे. राष्ट्रवादीचे स्वर्गीय वसंतराव रकटे दोन वेळा व गोटखिंडीच्या राजश्री एटम यांनी या गटाचे प्रतिनिधित्व केले आहे. बावची, गोटखिंडी व अन्य गावात हुतात्मा गटाची ताकद दखल पात्र आहे.



काकासाहेब कोकाटे वैभव रकटे

भाजपाचे नेते सम्राट महाडिक, राहुल महाडिक, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे निशिकांत पाटील, माजी मंत्री शिवाजीराव नाईक,रयत क्रांतीचे आमदार सदाभाऊ खोत यांचे कार्यकर्ते देखील गावोगावी सक्रिय आहेत. राष्ट्रवादीच्या या बालेकिल्ल्याला शह देण्यासाठी महायुतीचे सर्व घटक पक्ष एकत्र येऊन प्रयत्नशील राहतील. जिल्हा परिषद गटाचा सदस्य पदाचा उमेदवार गोटखिंडी किंवा बावचीतून असेल.तर पंचायत समिती गणाची उमेदवारी नागाव किंवा ढवळी व गोटखिंडी किंवा येडेनिपाणी गावांना मिळेल असा अंदाज आहे.

जिल्हा परिषदसाठी राष्ट्रवादी शरद पवार पक्षातून बावची येथून राजारामबापू कारखाना संचालक व माजी सरपंच वैभव रकटे, लक्ष्मी पार्वती उद्योग समूहाचे अध्यक्ष काकासाहेब कोकाटे, गोटखिंडीतून, माजी सरपंच धैर्यशील थोरात,के.डी.पाटील, येडेनिपाणीतून माजी पंचायत समिती सदस्य आनंदराव पाटील, माजी सरपंच डॉ. सचिन पाटील, मकरंद पाटील यांची नावे चर्चेत आहेत. तर महायुतीतून शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा समन्वयक गौरव नायकवडी, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे चंद्रकांत पाटील, रयत क्रांतीचे सागर खोत, येडेनिपाणीतून माजी पंचायत समिती सदस्य नंदकुमार पाटील, सी.एच. पाटील,डॉ.सचिन पाटील ही नावे चर्चेत आहेत.दोन्ही पंचायत समिती गण सर्वसाधारण महिलांसाठी राखीव असल्याने दोन्ही पक्षांतून प्रमुख कार्यकर्त्यांच्या सौभाग्यवतींना निवडणुकीत उतरावे लागणार आहे. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला गावोगावच्या गटांना एकसंध ठेवण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. तर महायुतीला सर्व पक्ष एकत्र करून राष्ट्रवादीच्या नाराज गटांवर लक्ष केंद्रित करावे लागणार आहे.गटातील समर्थकांच्या आग्रहाखातर शिवसेना शिंदे गटाचे नेते गौरव नायकवडी निवडणूक लढवण्याच्या तयारीत असल्याने राष्ट्रवादी शरद पवार गटाला तगडा उमेदवार देण्याचे आव्हान असणार आहे.

बावची गटात राष्ट्रवादी शरद पवार पक्षाची ताकद मोठी आहे.बहुतांश गावातील ग्रामपंचायतीसह प्रमुख सहकारी संस्था ताब्यात आहे. तालुका पातळीवरील संस्थांत प्रत्येक गावातील प्रमुख पदाधिकारी आहेत. मात्र गावोगावी गटबाजी आहे. आमदार जयंत पाटील यांना प्रत्येक निवडणुकीत हजाराने असलेले मताधिक्य मागील विधानसभेत घटले आहे. राष्ट्रवादी पुढे सर्व गट एकत्र करण्याचे तर महायुतीला सर्व पक्ष एकत्र करण्याचे आव्हान असणार आहे.

# ढेबेवाडीत गव्यांच्या वाढत्या संचारामुळे शेतकरी हैराण

ढेबेवाडी,ता.१३(प्रतिनिधी)-

**गव्यांच्या वाढत्या संचारामुळे शेतकरी सध्या मोठ्या संकटात सापडले आहेत. ही समस्या केवळ पिकांच्या नुकसानीपुरती मर्यादित नसून, आता ती मानवी सुरक्षिततेचाही प्रश्न बनली आहे. सध्या ढेबेवाडी (ता.पाटण) या परिसरामध्ये गव्यांचे कळप कधी रात्री तर कधी दिवसा रस्त्यावर दिसत आहेत.त्यामुळे विभागातील डोंगर पट्ट्यासह इतर गावातील शेतकऱ्यांची झोपच उडाली आहे.**

दरम्यान, वाल्मिक खोऱ्याचा परिसर व पठाराखालील गावातही गव्यांचा मोर्चा वळल्यामुळे शेतीचे नुकसान होत असून वनविभागाने वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी या परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. वाल्मिक खोऱ्याचा परिसर घनदाट जंगलाने वेढलेला असून पूर्वीपासूनच तेथे बिबट्या,गवे, रानडुक्करे आदी वन्य प्राण्यांचा उपद्रव कायम असल्याने शेती आणि तिच्यावरच उपजीविका असलेली कुटूंबे पूर्णतः अडचणीत सापडली आहेत. पेरणीपासून पीक काढणीपर्यंत गव्यांचे व डुक्करांचे कळप पाठ सोडत नसल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आहे. गव्यांचे लोंढेच्या लोंढे जंगलाबाहेर पडल्याने शेतकरी रडकुंडीला आले आहेत. गाव परिसरातील शिवारात रात्रदिवस चरणारे त्यांचे कळप छातीत धडकी भरवत आहे.



काळगाव-येळेवाडी येथे रस्ता ओलांडताना गव्यांचा कळप.

**वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी**

वन्यप्राण्यांचा वाढता उपद्रव शेतीला मोठ्या प्रमाणात हानीकारक ठरत असून शेतीमध्ये घातलेल्या बियाणांचे सुध्दा उत्पन्न शेतकऱ्यांना मिळत नाही.त्यामुळे शेतकरी हैराण झाला आहे. वनविभागाकडून पंचनामे होतात मात्र त्याची भरपाई तुटपुंजी मिळते.त्यामुळे वनविभागाने वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा.

**- नितीन पाटील,मंद्रुळकोळे.**



प्राथमिक आरोग्य केंद्र कुंडल येथे आरोग्य शिबिराचे उद्घाटन करताना प्रमुख पाहुणे व अन्य मान्यवर.

## कुंडल येथे मोफत सर्वरोग निदान शिबिराचा शुभारंभ

कुंडल,ता.१३(वार्ताहर)-

**प्राथमिक आरोग्य केंद्र कुंडल येथे भारती हॉस्पिटल सांगली यांच्यावतीने स्व. डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त व आ. डॉ.विश्वजीत कदम यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मोफत सर्वरोग निदान शिबिराचा शुभारंभ,रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष महेंद्र लाड यांच्या हस्ते करण्यात आला.**

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी सदस्य उत्तम पवार, सत्यविजय बँक चेअरमन प्रशांत पवार, बाळासो लाड, प्रताप लाड,डॉ.सुशिल गोतपागर, अविनाश काळेबाग, सुहास पवार,राजू खारगे,पोपट थोरबोले, दिलीप लाड,धनाजी लाड,विक्रम लाड,ग्रामपंचायत सदस्या रेशमा टेके, ग्रामपंचायत सदस्या शुभांगी माळी, ग्रामपंचायत सदस्या सोनाली थोरबोले, रेखा शिंदे, माया जाधव, शुभांगी भिसे,पलूस तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अनिल सुर्यवंशी, डॉ.आरती शेळके, डॉ.प्राजक्ता शेटे, डॉ.सोहन रणदिवे, विक्रम कणसे,भारती हॉस्पिटल सांगलीची सर्व टीम व गावातील सर्व काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

## डी.पी.भोसले कॉलेजमध्ये रक्तदान शिबीर संपन्न

कोरेगाव,ता.१३(वार्ताहर)-

**रयत शिक्षण संस्थेच्या डी. पी. भोसले कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, जिमखाना विभाग आणि रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमानाने झालेल्या रक्तदान शिबिरात ४० जणांनी स्वेच्छेने रक्तदान केले.**

यावेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ.एल.डी.कदम, महाविद्यालयातील कला व वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य डॉ.अनिल दडस, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य एस.आर.डांगे, आयक्यूएसी कोऑर्डिनेटर डॉ.विनोद कुमार कोष्टी, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक के.एस.शिंदे, प्रा.डी.आर.पाटील, प्राचार्य बाळकृष्ण भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.विद्यार्थी आणि स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी केला.

## वेणूताई चव्हाण कॉलेजमध्ये आज ट्रेड फेअरचे आयोजन

कराड,ता.१३(प्रतिनिधी)-

**स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्यांचा विकास व्हावा, विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक व व्यावहारिक कौशल्यांचा विकास घडवून आणण्याबरोबरच त्यांच्या अंगिभूत कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड येथे आज (दि.१४) रोजी ट्रेड फेअरचे आयोजन केले आहे.**

या ट्रेड फेअरचे ब्रीद वाक्य नव संकल्पना, नव उद्योग, नवे भविष्य ठेवण्यात आले आहे. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध वस्तुंचे प्रदर्शन तसेच खरेदी-विक्री होणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन अल्ताफहुसेन मुल्ला यांच्या हस्ते होणार आहे.

# प्रभाग तीनमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदयात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद

मिरज,ता.१३(प्रतिनिधी)-

**महापालिकेच्या प्रभाग क्रमांक ३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचाराला चांगलाच प्रतिसाद मिळाला आहे.माजी खासदार व राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते संजयकाका पाटील यांच्या नेतृत्वाखाली मिरज शहरात भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. गांधी चौक येथून सुरू झालेली ही पदयात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौक, कमानवेस, मंगळवार पेठ मार्गे पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे समारोप केले होते.**

या पदयात्रे दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सौ. शैला दुर्वे, दिगंबर जाधव तसेच शिवसेना (एकनाथ शिंदे गट) चे उमेदवार सागर वनखंडे व रेश्मा चौधरी यांच्या प्रचारार्थ नागरिकांशी थेट संवाद साधण्यात आला. पदयात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



प्रचार पदयात्रेदरम्यान उपस्थित माजी खास.संजयकाका पाटील, पद्माकर जगदाळे,मोहन वनखंडे,सागर वनखंडे, शिवाजी दुर्वे व इतर.

यावेळी संजयकाका पाटील यांनी मतदारांशी संवाद साधताना सांगितले की, शहराच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस हा सक्षम आणि विश्वासार्ह पर्याय आहे. प्रभागातील मूलभूत सुविधा,पायाभूत विकासकामे, स्वच्छता,पाणीपुरवठा आणि नागरिकांच्या दैनंदिन समस्यांवर प्राधान्याने काम करण्यासाठी अनुभवी नेतृत्वाची आवश्यकता असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

दरम्यान, सौ. शैला दुर्वे व त्यांचे पती शिवाजी दुर्वे यांनी सहकाऱ्यांसह प्रभागातील विविध भागांत घरोघरी भेटी देत प्रचार केला. या घरगुती भेटीदरम्यान नागरिकांच्या अडचणी, अपेक्षा आणि सूचना जाणून घेतल्या. सौ. शैला दुर्वे यांना नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद व सकारात्मक पाठिंबा मिळत असल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

नागरिकांशी संवाद साधताना सौ. शैला दुर्वे यांनी निवडून आल्यानंतर प्रभागाच्या विकासासाठी ठोस आराखडा राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या विकासकामांना गती देऊन प्रभागाचा सर्वांगीण विकास निश्चितपणे साध्य करण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी नागरिकांना दिला.

# कुंडल बसस्थानकासमोर पार्किंगमुळे वाहतुकीची कोंडी

कुंडल,ता.१३(वार्ताहर)-

**येथील आठवडा बाजारदिवशी दुचाकी व चारचाकी गाड्या एस. टी. बसस्थानकसमोर पार्किंग करत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. कुंडल गावचा आठवडा बाजार रविवारी असतो. यादिवशी सुट्टीचा दिवस असल्याने या बाजारात गावातील व परिसरातील अनेक विक्रेते तसेच ग्राहक मोठ्या संख्येने येत असतात.**

बाजारात येणारे नागरिक आपली दुचाकी व चारचाकी गाड्या एस. टी. बसस्थानकसमोर पार्किंग करीत असल्याने एसटी वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.परिणामी मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या उद्भवत आहे.अवैध पार्किंगमुळे एस टी चालकाना गाडी कसरत करून बाहेर काढावी लागत आहे. सायंकाळी आठवडा बाजार दिवशी काही चालक एस.टी.बस कुंडल गावात न आणता प्रवाशांना फाट्यावरच उतरतात.



कुंडल बसस्थानकासमोर अस्ताव्यस्त केलेले दुचाकी पार्किंग.

त्यामुळे प्रवाशी वर्गाला फाट्यावरून गावापर्यंत येताना बरोबर असणारे साहित्य घेऊन चालत यावे लागत असल्याने प्रवासी वर्गातून नाराजीचा सुर उमटत आहे तरी ग्रामपंचायतीने व पोलीस प्रशासन एसटी बसस्थानकासमोरील अवैधरित्या पार्क केलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करावी जेणेकरून वाहतूक कोंडीची समस्या सुटेल,अशी मागणी नागरिकांच्यातून होत आहे.

# वेणूताई चव्हाण कॉलेजच्या श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

कराड,ता.१३(प्रतिनिधी)-

**श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ, कराडचे वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (वरिष्ठ विभाग) अंतर्गत मौजे अंतवडी (ता.कराड) येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप समारंभ उत्साहात पार पडला.**

समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून सह्याद्री सहकारी साखर कारखाना लि.,यशवंतनगरचे संचालक राजेंद्र चव्हाण हे होते. ते स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, श्रमसंस्कार शिबिरामुळे विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवनाची खरी ओळख होते. तसेच सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ होते. अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ, कराडचे जनरल सेक्रेटरी अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला हे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी रा. से.यो. च्या कार्याचे कौतुक करून स्वयंसेवकांनी समाजहितासाठी सदैव तत्पर राहावे, असे आवाहन केले.



अंतवडी : येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलताना राजेंद्र चव्हाण, समवेत उपस्थित प्रमुख मान्यवर.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून अरुण पाटील, प्राचार्य डॉ.आर.आर जाधव, विशेष उपस्थिती म्हणून अंतवडी ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. उज्ज्वला हणमंत साळुंखे, मनोज माने, जिजाबा शिंदे, श्रीमती सीमा चव्हाण, सौ.मनीषा शिंदे, हणमंत साळुंखे आदी ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

जिमखाना उपाध्यक्ष प्रा.(डॉ.) एस.आर.सरोदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. त्यानंतर कार्यक्रम अधिकारी डॉ.एन.ए.पाटील यांनी शिबिरात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा सविस्तर अहवाल वाचनाद्वारे आढावा घेतला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा.पी.एस.कराडे यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. श्रीमती एस.एम.चव्हाण यांनी केले तर आभार कार्यक्रम अधिकारी प्रा. एस.एस.बोंगाळे यांनी मानले.

# वन्यजीव-मानव सहजीवन काळाची गरज-नाईक

## सागाव येथे वन्यजीव जनजागृती उपक्रमाची सुरुवात

शिराळा,ता.१३(प्रतिनिधी)-

**शिराळा तालुक्यातील वन्यजीव व मानव यांच्यात संघर्ष सुरू आहे.वन्यजीवांकडून मानवावर हल्ले होत आहेत. शेतीचे प्रचंड नुकसानही होत आहे.वन्यजीवांचा बंदोबस्त करताना वन विभागावर मर्यादा येत आहेत.त्यामुळे दोन्ही घटकांमध्ये सहजीवन होणे काळाची गरज असल्याचे मत विराज नाईक यांनी व्यक्त केले.**

शिराळा तालुक्यातील सागाव येथील समाज विकास विद्यालयामध्ये मानसिंगभाऊ लोककल्याण अभियान व शिराळा वनविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.अभियानाचे मुख्य प्रवर्तक व विराज उद्योग समूहाचे अध्यक्ष विराज नाईक प्रमुख उपस्थिती होते.श्री. नाईक म्हणाले, शिराळा तालुक्यामध्ये बिबटे, गवा, रानडुकरे तसेच वानरांपासून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. बिबट्यांच्या हल्ल्यात प्रचंड वाढ झाली आहे. बिबट्या हा प्राणी आता बालके, विद्यार्थी, माणसावरही हल्ले करत आहे. पाळीव प्राण्यांवर अनेक हल्ले होत आहेत. या हल्यात अनेक प्राणी मृत्युमुखी पडल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे लोकांमध्ये जनजागृती व्हावी व वन्यजीव आणि मानवामध्ये सहजीवन निर्माण व्हावे, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीचा उपक्रम हाती घेतला आहे.प्रारंभी मुख्याध्यापक आर.पी.पाटील यांनी श्री. विराज नाईक यांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. हाय्यर एज्युकेशन संस्थेचे सदस्य आनंदराव चव्हाण यांनी श्री. नाईक यांचा पुष्पगुच्छ व शाल देवून सत्कार केला.



सागाव येथील समाज विकास विद्यालयात बिबट्यासह वन्य हिंस्र प्राण्यांपासून कसा बचाव करावा या अभिनव उपक्रमात बोलताना विराज नाईक. समोर विद्यार्थी.

कार्यक्रमात वन्यजीव व मानव यासंदर्भात जनजागृती पर चित्रफीत विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. कार्यक्रमास व्ही.व्ही.मदने,आय. एम.झांजी, सौ.सी.एम.पाटील, एम. एच.जाधव, इतर शिक्षक व विद्यालयातील आठशे विद्यार्थी उपस्थित होते. उपमुख्याध्यापक पी. बी. मोहिरे यांनी आभार मानले.

# वनहक्क दाव्यातील प्रलंबित प्रकरणे मार्गी लावावीत

महाबळेश्वर,ता.१३(वार्ताहर)-

**महाबळेश्वर शहरात गेल्या अनेक दशकांपासून वास्तव्यास असलेल्या १७ कुटुंबांचे वैयक्तिक वनहक्क दावे प्रशासकीय पातळीवर रखडले आहेत. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी कायदा २००६ अंतर्गत दाखल या दाव्यांना ७५ वर्षांच्या कठोर पुराव्यांची अट आड येत आहे. या पार्श्वभूमीवर, अर्जदार किरण काळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महाबळेश्वर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सुनील शिंदे यांची भेट घेऊन प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्याची मागणी केली.**

निवेदनातील माहितीनुसार, संबंधित १७ कुटुंबे ही सन १९५० पूर्वीपासून महाबळेश्वरच्या संबंधित भागात वास्तव्यास आहेत. त्यांच्या वास्तव्याबाबतचे सर्व उपलब्ध पुरावे महाबळेश्वर नगरपालिकेमार्फत वाई येथील प्रांत अधिकारी कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आले आहेत. मात्र, अद्यापही यावर कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. यामुळे या कुटुंबांच्या हक्काच्या घरांचे नियमितीकरण रखडलेले असून त्यांच्यावर अन्यायाची टांगती तलवार आहे. राज्यात वनहक्क दाव्यांसाठी ७५ वर्षांपूर्वीचा रहिवासी दाखला किंवा तत्सम अत्यंत जुने पुरावे मागितले जात आहेत. यामुळे पात्र असूनही अनेक अर्ज फेटाळले जात आहेत. नगरपालिकेच्या नोंदी, महसूल कागदपत्रे आणि वास्तव्यातील सातत्य लक्षात घेऊन हे दावे निकाली काढणे अपेक्षित असताना, पुराव्यांच्या नावाखाली होणारी अडवणूक वनहक्क कायद्याच्या मूळ उद्देशाला हरताळ फासणारी आहे, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

**महाबळेश्वरच्या नगराध्यक्षांना निवेदन**



महाबळेश्वर:नगराध्यक्ष सुनील शिंदे यांच्याकडे निवेदन देताना किरण काळे व शिष्टमंडळ.

महाबळेश्वर शहरातील प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये कृष्णा काळे, नारायण काळे,रविंद्र ढाणक, बबन होगाडे, भांबू डावले, उमाकांत ढेबे, भिकन ढेबे, विष्णू काळे, बाबुराव ढेबे, गणेश शिंदे, मनोज काळे, बबन हिरवे, रामचंद्र आखाडे, गणेश ढेबे, सौ.सुशिला ढेबे, दत्तात्रय चोरगे व श्रीमती हिराबाई ढेबे या १७ जणांचा समावेश आहे. निवेदन देतेवेळी किरण काळे यांच्यासह सुनील ढेबे, चंद्रकांत आखाडे,राजू हिरवे,दिलीप ढेबे, उमाकांत ढेबे, अनिल डावले, दत्तात्रय ढेबे आदी उपस्थित होते.

दैनिक महासत्ता
पान नं. १०
बुधवार, ता.१४ जानेवारी २०२६

# इचलकरंजी महानगरपालिका निवडणूक २०२६

| प्रभाग | महायुती उमेदवार | मतदान | शिव–शाहू आघाडी | मतदान | उमेदवार | मतदान | उमेदवार | मतदान | उमेदवार | मतदान | विजयी उमेदवार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ अ)अ.जा.महिला<br>ब) ना.मा.व.<br>क)सर्वसाधारण महिला<br>ड)सर्वसाधारण | सौ. दिपाली सचिन कांबळे<br>रणजीत भीमराव अनुसे<br>सौ.मेघा दादासो भाटले<br>किसन परशराम शिंदे | | स्वाती राजेंद्र लोखंडे<br>सचिन लालासो राणे<br>सौ.रूपाली नितीन कोकणे<br>उदयसिंग मारूती पाटील | | पुष्पा गेजगे<br>भारती तराळ | | ऐश्वर्या जाधव | | | | |
| २ अ)ना.मा.व.महिला<br>ब)सर्वसाधारण महिला<br>क)सर्वसाधारण<br>ड)सर्वसाधारण | सौ. शुभांगी प्रधान माळी<br>मंगल बंडोपंत कोदले<br>राजु गोरख कबाडे<br>सुहास अशोक जांभळे | | यास्मिन मुसा तासगावे<br>पद्मा गणेश सावरतकर<br>रणजीत गंगाराम जाधव<br>परवेज लतीफ गैबान | | अनिसा हिपरगी<br>सदाशिव बंडीगणी<br>तौफिक कोठीवाले | | दिपक कामते<br>लहू कांबळे | | शितल देवमोरे | | |
| ३ अ)अ.जा.महिला<br>ब)ना.मा.व.<br>क)सर्वसाधारण महिला<br>ड)अ.जा.महिला | सौ. डॉ. प्रियांका इंगवले<br>योगेश चांगदेव पाटील<br>सौ. सरिता भाऊसो आवळे<br>राजु शंकर चव्हाण | | निर्मला गजानन शिरगावे<br>अविनाश बाजीराव वासुदेव<br>सुफिया सद्दाम शेख<br>साजन विठ्ठल बेंद्रे | | वर्षा कांबळे<br>अभिजीत लोले<br>संगीता पाटील<br>अशोकराव जांभळे | | मनाली नंदूरकर<br>शिवाजी शिंदे<br>प्रियदर्शनी बेडगे<br>अमोल भाटले | | सुनिता पाटील<br>रूपराज घवाळे | | |
| ४ अ)ना.मा.व<br>ब)सर्वसाधारण महिला<br>क)सर्वसाधारण महिला<br>ड)सर्वसाधारण | दिलीप गेनबा झोळ<br>सौ.मोनाली दत्तात्रय मांजरे<br>सौ.मनिषा संतोष कूपटे<br>मनोज भीमाशंकर हिंगमिरे | | सयाजी मारूती चव्हाण<br>दिपाली संदीप अथणे<br>सुलोचना वसंत पाटील<br>सागर देवाप्पा कुंभार | | मल्लिकार्जुन कोरे<br>सुरेखा पारखे<br>कपिल शिकलगार | | सचिन मांगलेकर<br>संचिता बिर्जे | | | | |
| ५ अ)ना.मा.व<br>ब)सर्वसाधारण महिला<br>क)सर्वसाधारण महिला<br>ड)सर्वसाधारण | सतीश वसंत मुळीक<br>सौ.वैशाली सुनिल पोवार<br>सौ. जुलेखा जहांगीर पटेकरी<br>सुनिल सातगोंडा पाटील | | सतीश मारूती लाटणे<br>मीना धोंडीराम बेडगे<br>अनुराधा महेश भोसले<br>अमोल प्रकाश सूर्यवंशी | | सुमित भरते<br>प्रतिक्षा भरते<br>शिवाजी पाटील<br>सचिन भरते | | सचिन कोरवी<br>आकाश भिलुगडे | | रोहन धारवट<br>सचिन मासाळ | | |
| ६ अ)अ.जा.<br>ब)ना.मा.व.महिला<br>क)सर्वसाधारण महिला<br>ड)सर्वसाधारण | सौ.अलका अशोक स्वामी<br>सौ.किरण श्रीरंग खवरे<br>सौ. विजया सुनिल महाजन<br>विठ्ठल पुंडलिक चोपडे | | बापू दादू गेजगे<br>प्रियांका सचिन बेलेकर<br>सुजाता अरूण पोवार<br>अभयकुमार शांतीलाल बाबेल | | अनिल झाडबुके<br>सृष्टी कुंभार<br>साहिल कलावंत | | चेतन शिंदे<br>यशवंत भंडारे | | उमेश खांडेकर<br>दिपक खरात<br>इर्शाद गडकर | | |
| ७ अ)अ.जा.महिला<br>ब)ना.मा.व.महिला<br>क)सर्वसाधारण<br>ड)सर्वसाधारण | सौ.रेखा महादेव कांबळे<br>सौ.प्रमिला रविंद्र जावळे<br>कल्याण विठ्ठल सुरवसे<br>संजय मसाजी केंगार | | क्रांती अब्राहम आवळे<br>अमृता योगेश चौगुले<br>नंदकुमार आनंदराव पाटील<br>मदन सिताराम कारंडे | | मनिषा घोटणे<br>सविता स्वामी<br>रावसो निर्मळे<br>अशोक कांबळे<br>किरण कांबळे | | प्रकाश कांबळे<br>सलाउद्दीन म्हैशाळे | | अविनाश देसाई<br>जोहेब हलगले<br>कुमार साळुंखे | | |
| ८ अ)ना.मा.व. महिला<br>ब)सर्वसाधारण महिला<br>क)सर्वसाधारण<br>ड)सर्वसाधारण | सौ.रूपा उदय बुगड<br>सौ. श्वेता मोहन मालवणकर<br>परिसनाथ मल्लू घाट<br>रविंद्र वसंतराव माने | | रजनी रमेश शिरगुरे<br>संगीता राजू आलासे<br>संजय शंकरराव तेलनाडे<br>संजय भूपाल बेडक्याळे | | स्नेहल मस्के<br>मुमताज बैरगदार<br>भरत घाट<br>अशोक चनविरे | | माधुरी चव्हाण<br>सुनिल बारवाडे | | कुबेरसिंग रजपूत | | |
| ९ अ)अ.जा.<br>ब)ना.मा.व. महिला<br>क)सर्वसाधारण महिला<br>ड)सर्वसाधारण | रूबन सखाराम आवळे<br>सौ. ध्रुवती सदानंद दळवाई<br>सौ. मनिषा प्रशांत नवनाळे<br>उदय आनंदा धातुंडे | | अब्राहम किसान आवळे<br>संतोषी संजय कांबळे<br>रोहिणी प्रकाश बरकाळे<br>राहुल प्रकाश खंजिरे | | अनुश उर्फ विवेक आवळे<br>तनुजा माने<br>वसंत कोरवी | | सुहास कांबळे<br>उमर फारुख शेख | | रवि पाटोळे<br>जितेंद्र ठोंबरे | | |
| १० अ)अ.जा.<br>ब)ना.मा.व. महिला<br>क)सर्वसाधारण महिला<br>ड)सर्वसाधारण | रवी साहेब रजपुते<br>सौ. विद्या मनोज साळुंखे<br>सौ.नुतन दिलीप मुथा<br>तानाजी बाळु पोवार | | अजय अशोक भोरे<br>शबाना रियाज अहमद जमादार<br>अनिता अशोक कांबळे<br>सदाशिव आणाप्पा मलाबादे | | दगडू कांबळे<br>रजनी बोंद्रे<br>संपदा चव्हाण<br>संगीता भोरे | | सलोनी शिंत्रे | | | | |
| ११ अ)ना.मा.व<br>ब)सर्वसाधारण महिला<br>क)सर्वसाधारण महिला<br>ड)सर्वसाधारण | प्रदीप नामदेव धुत्रे<br>सौ.वैशाली शशिकांत मोहिते<br>सौ. सारिका सुकुमार पाटील<br>राजु संभाजी बोंद्रे | | सरफराज जहांगीर खलिफा<br>सरूबाई वसंत कांबळे<br>चंद्रभागा विलास तळकर<br>नजीर इसाक फकीर | | इस्माईल समडोळे<br>बेगम नदाफ<br>लक्ष्मी बडे<br>रजाक शिरगुर | | शबाना समडोळे<br>सहिरा पाथरवट<br>शशिकांत देसाई | | पूनम बोराडे<br>शेखर पिसे | | |
| १२ अ)ना.मा.व<br>ब)सर्वसाधारण महिला<br>क)सर्वसाधारण महिला<br>ड)सर्वसाधारण | नितेश किरण पोवार<br>सौ.सुरेखा अजित जाधव<br>सौ.स्नेहल दिपक रावळ<br>अनिल देवकरण डाळ्या | | संजय महादेव कांबळे<br>रूपाली शितल दत्तवाडे<br>राधा अमित बियाणी<br>प्रकाश मारूती मोरबाळे | | | | | | | | |
| १३ अ)ना.मा.व महिला<br>ब)सर्वसाधारण महिला<br>क)सर्वसाधारण<br>ड)सर्वसाधारण | सौ. रूपाली अनंत सातपुते<br>सौ.शशिकला म्हाळसाकांत कवडे<br>चंद्रकांत विष्णू शेळके<br>रणजीत दिलीप लायकर | | मुस्कान अखिल खानापुरे<br>अश्विनी अरूण गोंदकर<br>नागेश सुभाष शेजाळे<br>अमरजित राजाराम जाधव | | सायली लायकर<br>निता पाटील<br>निशिकांत पाटील | | | | | | |
| १४ अ)ना.मा.व महिला<br>ब)सर्वसाधारण महिला<br>क)सर्वसाधारण<br>ड)सर्वसाधारण | सौ. सपना प्रमोद भिसे<br>सौ.मेघा शहाजी भोसले<br>अभिषेक रमाकांत वाळवेकर<br>ओमकार रामचंद्र सुर्वे | | कल्पना गणपती धुमाळ<br>रागिणी उत्तम मोरबाळे<br>नितीन कृष्णा भुते<br>अभिषेक संतोषकुमार सारडा | | अरूणा लोखंडे<br>सुषमा डोंगळे<br>प्रकाश सुतार | | अर्पणा सावेकर | | | | |
| १५ अ)ना.मा.व<br>ब)सर्वसाधारण महिला<br>क)सर्वसाधारण महिला<br>ड)सर्वसाधारण | राजु आप्पासो पुजारी<br>सौ.ज्योती नागेश पाटील<br>सौ.तेजश्री अमृत भोसले<br>संतोष बाबुराव शेळके | | सनी महादेव खारगे<br>हिमानी सागर चाळके<br>मंजुळा प्रतापगोंडा पाटील<br>राजवर्धन संभाजी नाईक | | रवींद्र लोहार<br>गंगाधर माळी<br>मनिषा पाटील<br>निखिल जमाले<br>संजय तिप्पे | | गणेश गुळगी<br>उमेश माळी<br>शोभा पाटील<br>प्रकाश पाटील<br>चंद्रकांत बिरंजे | | मोहन कुंभार | | |
| १६ अ )ना.मा.व.महिला<br>ब) ना.मा.व<br>क)सर्वसाधारण महिला<br>ड)सर्वसाधारण महिला<br>इ)सर्वसाधारण | पूनम सचिन माळी<br>सुशांत बाळासाहेब कलागते<br>सौ. शुभांगी किशोर पाटील<br>सौ.अरूणा प्रमोद बचाटे<br>अनिकेत बाबासो पाटील | | मंजुश्री अमरजित जाधव<br>स्वाती अनुप सिदनाळे<br>स्मिता संजय तेलनाडे<br>संतोष महावीर जैन<br>सुनील शंकरराव तेलनाडे | | मनिषा पाटील<br>दिनेश माने | | रिजवाना मोमीन<br>अम्रू लवटे | | | | |

## कामगारांना मतदानासाठी गुरुवारी सुट्टी

कोल्हापूर, ता.१३ (प्रतिनिधी)–

..............................

**राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे १५ जानेवारी रोजी राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये सार्वत्रिक निवडणूक घेतली जाणार आहे.**

त्यानुसार लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५१ मधील कलम १३५ (ब) तरतुदीच्या आदेशानुसार सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स मध्ये काम करणाऱ्या कामगार मतदारांना व निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी देण्यात यावी. अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात संबंधित अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादींना पुर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेवून मतदानाच्या दिवशी संबंधितांना भरपगारी सुट्टी द्यावी, असे आवाहन सहाय्यक कामगार आयुक्त विशाल घोडके यांनी केले आहे.

## पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघ

कोल्हापूर, ता.१३ (प्रतिनिधी)–

..............................

**पुणे पदवीधर व शिक्षक मतदार संघाची अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध झाल्या असून या यादीत कोल्हापूर जिल्हातून पदवीधर मतदार संघासाठी ९१ हजार ४०० तर शिक्षक मतदार संघासाठी १० हजार २१५ मतदारांची नोंदणी झाली आहे.**

विभागीय आयुक्त तथा मतदार संघाचे

## कोल्हापूर जिल्हयातील १ लाखावर मतदारांची नोंदणी

मतदार नोंदणी अधिकारी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते सोमवारी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या.या यादीनुसार पुणे विभागात ३ लाख १० हजार ९६४ पदवीधर तर ५१ हजार ९७९ शिक्षक मतदार आहेत. अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाली असली तरी मतदार नोंदणी निरंतर सुरू राहणार असल्याने पात्र पदवीधर व शिक्षकांनी मतदार नोंदणी करावी,असे आवाहनही डॉ. पुलकुंडवार यांनी केले.

मतदार यादी तयार करण्याच्या २०२५ च्या कार्यक्रमांतर्गत अंतिम मतदार यादीत पदवीधर मतदार संघासाठी पुणे जिल्ह्यात ६१ हजार ११३ मतदार, सोलापूर– ३८ हजार २२, सातारा– ४२ हजार ६३, सांगली– ७८ हजार ३६६, कोल्हापूर– ९१ हजार ४०० अशी एकूण ३ लाख १० हजार ९६४ इतकी नोंदणी झाली आहे. तर शिक्षक मतदार संघासाठी पुणे–१२ हजार १८७, सोलापूर– १३ हजार १५८, सातारा– ९ हजार ९७, सांगली– ७ हजार ३२२, कोल्हापूर– १० हजार २१५ अशी एकूण ५१ हजार ९७९ इतकी नोंदणी झाली आहे.



बार असो.चे लिपीक प्रविण फगरे यांचा सत्कार करताना जिल्हा व सत्र न्यायाधिश जे.एल. गांधी व जिल्हा व सत्र न्यायाधिश मिलींद भोसले ,बार असो.चे अध्यक्ष ॲड. राजगोपाल तोष्णीवाल

# न्यायाधिश व वकिलांचे क्रिकेट स्पर्धा उत्साहात

इचलकरंजी,ता.१३-

**दि इचलकरंजी बार असोसिएशन आयोजित न्यायाधिश व वकिलांचे क्रिकेट स्पर्धा जिल्हा व सत्र न्यायाधिश जे.एल. गांधी व जिल्हा व सत्र न्यायाधिश मिलींद भोसले व सर्व न्यायाधिशांचे अध्यक्षतेखाली तसेच दि इचलकरंजी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजगोपाल रामानंद तोष्णीवाल व क्रिडा समितीचे अध्यक्ष ॲड. धीरज पारख यांचे प्रमुख उपस्थित पार पडला.**

यावेळी बार असोसिएशनमध्ये सुमारे २५ वर्षाहून अधिक काळ कार्यरत बारचे लिपीक प्रविण फगरे यांचा दि इचलकरंजी बार असोसिएशनतर्फे सत्कार संपन्न झाला.सर्व वकिलांचे सुख-दुःखात धाऊन येणारे व बार असोसिएशनचे सर्व सभासदांना आपले कुटूंबिय मानणारे प्रविणभाऊ फगरे यांचे कौतुक करीत ॲड. बाबासाहेब सुर्यवंशी यांनी प्रविणभाऊ फगरे यांचे कार्याची माहिती दिली. क्रिकेट मैदानात उपस्थितीत सर्व वकिल, खेळाडू व त्यांचे कुटूंबियांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात त्यांना शुभेच्छा दिल्या.सदर कार्यक्रमाचे नियोजनास दि इचलकरंजी बार असोसिएशनचे सर्व सदस्य व खेळाडू मोठ्या संख्येने हजर होते.

# पिडितग्रस्तास १२ लाखांची भरपाई मंजूर

शाहूवाडी,ता.१३-

**कारच्या धडकेत मोटारसायकलस्वार जखमी झाला होता.याबाबत पिडीत कुटुंबियांच्या नातेवाईकांनी न्यायालयात दावा दाखल केला होता. त्याचा निकाल नुकताच लागला असून न्यायालयाने पिडीतग्रस्त कुटुंबियांना १२ लाखाची नुकसान भरपाई देण्याचा आदेश दिला आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की,बांबवडे (ता.शाहुवाडी )सुशांत पंडित पाटील (वय-३० धंदा-फार्मासिस्ट )हे मोटार सायकल(नं. एम. एच- ०९ - जी. क्यु५११८ )ने कोल्हापूरकडे येताना कार (नं. एम. एच. ०९-डी. एक्स-६२१२ )धडकलेने जखमी झाले होते.याबाबत न्यायालयात दावा सुरू होता.याप्रकरणी न्यायालयाने जखमी कुटुंबियांना १२ लाखाची नुकसान भरपाई देण्याचा आदेश दिला आहे.नुकसान भरपाई मंजूर करणेचे काम ॲड.सी.बी. कोरे (रेंदाळकर) यांनी पाहिले.



हुपरी : जवाहर कारखान्यावर रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत ऊस वाहतूकदारांना मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक एन.आर.चौखंडे. यावेळी उपस्थित मान्यवर

# जवाहर कारखान्यात सुरक्षित ऊस वाहतूक अभियान संपन्न

हुपरी, ता १३(वार्ताहर)-

**येथील कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर साखर कारखाना, कोल्हापूर प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि हुपरी पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने कारखाना स्थळावर 'सुरक्षित ऊस वाहतूक अभियान' नुकतेच संपन्न झाले. यावेळी अपघातांचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी वाहतुकीचे नियम पाळण्याचे व वाहनांना रिफ्लेक्टर लावण्याचे आवाहन करण्यात आले.**

या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना आरटीओ अजिंक्य डुबल म्हणाले की, ऊस वाहतूक करणाऱ्या बैलगाडी, ट्रॅक्टर व ट्रक अशा सर्व वाहनांच्या पुढील बाजूस पांढऱ्या व मागील बाजूस लाल रंगाची रिफ्लेक्टर पट्टी लावणे बंधनकारक आहे. अशा सूचना त्यांनी दिल्या. कारखान्यामार्फत यावेळी रिफ्लेक्टर्सचे वाटप करण्यात आले.

हुपरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एन.आर.चौखंडे यांनी यावेळी वाहतूक मार्गाबाबत महत्त्वाच्या सूचना दिल्या. प्रास्ताविक जनरल मॅनेजरकिरण कांबळे यांनी केले. यावेळी हुपरीच्या पो.उप नि.माया वायकर,आण्णासाहेब गोटखिंडे, विकास कवडे, भास्कर पट्टणकुडे, जयपाल गिरीबुवा, भूषण कोले,अनिल वलशेट्टी, सुदेश मंच, संजय वासमकर, कैवल्य शास्त्री तसेच ऊस वाहन मालक व चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष गोटखिंडे यांनी केले तर आभार सुदर्शन जंगले यांनी मानले.



# लायन्स क्लब आयोजित बॅडमिंटन स्पर्धा उत्साहात

इचलकरंजी,ता.१३-

**लायन्स क्लबच्यावतीने येथील नरेंद्र हौसिंग सोसायटी बॅडमींटन कोर्ट येथे बॅडमिंटन स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत सहा संघ व ६० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.**

या स्पर्धेचे नियोजन महेश देसाई, ब्रिजेश मंत्री यांनी केले होते. त्यांना नरेश काबरा, तेजस तोष्णीवाल, आंनद जाजू, पवन लोकरे, अमीत बंग, महेश बाहेती यांचे सहकार्य लाभले. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पवन लोकरे यांचा संघ नरेंद्र डॅझल्स हा विजेता ठरला .तर सेनर्झी ॲकरस संघ उपविजेता ठरला. यास्पर्धेचे बक्षीस वितरण संमारंभ विजय राठी, संदीप सुतार, सचिन यलना, अमीत पोतदार यांच्या हस्ते पार पडला.यावेळी महेश मर्दा, समीत काबरा, अरूण पाटील, नविन जैन, सौ.स्वामी राठी, प्रिती पौददार, आरती कंदोई,रेखा मंत्री आदि उपस्थित होते.

# आश्रमशाळेत मुख्याध्यापकानेच विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)-

**आश्रमशाळेतील मुख्याध्यापकाने आपल्या पदाचा गैरवापर करून, कागल तालुक्यातील अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी जुना राजवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून कृष्णा ज्ञानू दाभोळे (वय ५५,रा.मुरगुड,ता.कागल) याला मगळवारी अटक करण्यात आली. न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.**

जुना राजवाडा पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दाभोळे हा कागल तालुक्यातील एका आश्रमशाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होता. दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर शाळेतून बाहेर पडलेल्या १६ वर्षीय विद्यार्थिनीशी त्याने जवळीक साधली. ऑगस्ट व ऑक्टोबर २०२५ या कालावधीत त्याने तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केल्याचा आरोप आहे. या घटनेची वाच्यता कुणालाही केल्यास ठार मारण्याची धमकी दिल्याने पीडित मुलगी भीतीमुळे गप्प राहिली होती.

काही दिवसांनंतर मुलीने हा प्रकार आपल्या आईकडे उघड केला. त्यानंतर माय-लेकींनी थेट पोलिस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांच्याकडे तक्रार अर्ज सादर केला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षकांनी तातडीने महिला सहाय्य कक्षामार्फत पीडितेचा जबाब नोंदवून घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार जुना राजवाडा पोलिस ठाण्यात आरोपी मुख्याध्यापकाविरुद्ध बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी मंगळवारी दाभोळे याला तात्काळ अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.

# हातकणंगले नगरपंचायत उपनगराध्यक्षपदी रोहिणी खोत

## तर स्विकृत नगरसेविका पदी आश्लेषा पाटील यांची निवड

हातकणंगले, ता.१३ (प्रतिनिधी)-

**हातकणंगले नगरपंचायतीच्या पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये मंगळवारी उपनगराध्यक्षपदी रोहिणी गुरुदास खोत यांची बिनविरोध निवड करण्यात आली .तसेच शिवसेना शिंदे गटाकडून स्विकृत नगरसेवक पदी आश्लेषा रणजित पाटील यांची निवड करण्यात आली. तर काँग्रेस पक्षाकडून कागदपत्राची पूर्तता नसल्याने स्विकृत नगरसेवक पदासाठी त्यांनी मुदतवाढ मागितली आहे .**

पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये एकच स्विकृत नगरसेवकाची निवड करण्यात आली तर एक पद रिक्त राहिले आहे . मुख्याधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी विशाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी लोक नियुक्त नगराध्यक्ष अजित सिंह पाटील होते .

हातकणंगले नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्ष पदासाठी अनेक दिवसापासून उलट सुलट चर्चा सुरू होत्या अनेकांनी या पदावर आपली दावेदारी



उपनगराध्यक्षा रोहिणी खोत



स्विकृत नगरसेविका आश्लेषा पाटील

असल्याचे ठोसपणे सांगण्यात आले होते. मात्र, दुसऱ्यांदा अपक्ष निवडून येऊन रोहिणी गुरुदास खोत यांनी शिवसेना शिंदे गटाला पाठिंबा दिल्याने शिवसेनेने त्यांना उपनगराध्यक्ष पदाचा बहुमान दिला. तसेच शिवसेना शिंदे गटाकडून पहिल्यांदाच महिला उमेदवाराला स्विकृत नगरसेविका म्हणून आश्लेषा रणजीत पाटील यांना बहुमान मिळाला तर काँग्रेस पक्षाकडून स्विकृत नगरसेवक पदासाठी कागदपत्राची पूर्तता नसल्याचे कारण दाखवत प्रशासनाकडे मुदत वाढ मागितली. त्या अनुषंगाने त्यांना पुढील सर्वसाधारण सभेमध्ये उमेदवार निश्चित करण्यासाठी मुदत वाढ मिळाली आहे.

हातकणंगले नगरपंचायतीमध्ये १७ जागांसाठी झालेल्या निवडणुकीमध्ये शिवसेना शिंदे गटाकडून लोकनियुक्त नगराध्यक्ष अजितसिंह पाटील व सहा नगरसेवक निवडून आले आहेत .तर काँग्रेस पक्षाकडून पाच नगरसेवक निवडून आले आहेत. तसेच भारतीय जनता पार्टीचे दोन व उबाठा गटाचा एक व तीन अपक्ष उमेदवार यावेळी विजयी झाले आहेत .त्यामुळे बहुमतासाठी अपक्ष उमेदवाराचा पाठिंबा आवश्यक असताना रोहिणी गुरुदास खोत यांनी शिवसेनेला पाठिंबा दिल्याने शिवसेना शिंदे गटाला आपली सत्ता स्थापन करण्यात यश आले आहे .त्या अनुषंगाने शिवसेनेने रोहिणी गुरुदास खोत यांना उपनगराध्यक्ष पदाचा बहुमान दिल्याचेही सांगण्यात येते .प्रभागातील सर्व मतदारांनी माझ्या कार्यावर विश्वास ठेऊन दोन वेळा निवडून दिले . खासदार धैर्यशिल माने, जिल्हाध्यक्ष रविंद्र माने , नगराध्यक्ष अजितसिंह पाटील यांच्या सहकार्याने मला उपनगराध्यक्ष पदाचा मान मिळाला हातकणंगले शहराच्या सर्वांगिण विकासासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन नूतन उपनगराध्यक्षा रोहिणी खोत यांनी केले.

# निपाणी परिसरात पाऊस : तंबाखू उत्पादक संकटात

निपाणी,ता.१३(प्रतिनिधी)-

**निपाणी परिसरात मंगळवारी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास दमदार पावसाने हजेरी लावली. ऐन तंबाखू कापणीच्या हंगामातच पाऊस झाल्यामुळे तंबाखू उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. तर सायंकाळी पावसाने अचानक सुरूवात केल्याने कामावरून घरी जाणाऱ्या नागरीकांचे तसेच शालेय विद्यार्थ्यांची धावपळ उडाली.**

रविवारी झालेल्या तुरळक पावसानंतर आज मंगळवारी सकाळपासून हवामानात अचानक बदल झाला होता.दिवसभर ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. हवेत मोठ्या प्रमाणात उष्मा निर्माण होऊन सायंकाळी दमदार पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसाने शेतकऱ्यांची तारांबळ



निपाणी: शहरात सुरू असणारा पाऊस.

उडाली. पावसाने रस्त्यावरून सर्वत्र पाणीच पाणी वाहू लागले होते.

निपाणी परिसरात ३ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये तंबाखूचे पिक असून सध्या तंबाखू कापणीच्या कामांना वेग आला आहे शेतकऱ्यांनी जवळपास ५० टक्के तंबाखू कापणी केली आहे. पोषक वातावरणामुळे यावर्षी परिसरात तंबाखूचे पीक चांगले असून चांगले आर्थिक उत्पन्न मिळेल अशा प्रतीक्षेत शेतकरी आहेत. मंगळवारी अचानक आलेल्या पावसाने कापलेला तंबाखू सुरक्षित ठेवण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू होती. तर शहरात नागरीक कामावरून घरी जाताना, मुले टूशन आणि शाळेतून जाताना भिजत जाताना दिसत होती. दुचाकीस्वारांना अचानक आलेल्या पावसाने भिजावे लागत होते.तसेच बसस्थानक परिसरातील जासूद कॉप्लेक्स परिसरात गटारी तुंबून पाणी रस्त्यावरून वाहू लागले होते.

# शेतकऱ्यांना दिवसा लाईट मिळणार

## आ. सुहास बाबर यांची माहिती

विटा, ता.१३(प्रतिनिधी)-

**खानापूर मतदारसंघातील शेतकऱ्यांचे अनेक वर्षांचे स्वप्न आता प्रत्यक्षात साकार होत आहे. शेतीसाठी लागणारी वीज आता रात्रीऐवजी दिवसा मिळणार असून, यामुळे शेतकऱ्यांचे जीवन अधिक सुरक्षित, सुलभ आणि उत्पादनक्षम होणार आहे, अशी माहिती आमदार सुहास अनिलभाऊ बाबर यांनी रेणावी येथील सब स्टेशन उद्घाटन प्रसंगी दिली. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे महत्त्वाकांक्षी प्रकल्प आज अंतिम टप्प्यात पोहोचले आहेत.**



आमदार बाबर यांनी सांगितले की, खानापूर मतदारसंघातील शेतीसाठी साधारणत: १५० मेगावॅट वीजेची गरज आहे. ही संपूर्ण गरज सोलर ऊर्जेच्या माध्यमातून पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असून त्या दिशेने वेगाने काम सुरू आहे. त्यापैकी६६ मेगावॅटचे काम पूर्ण झाले आहे. याअंतर्गत करगणी, लिंगीवरे, पुजारवाडी, माडगुळे, लेंगरे, गार्डी, रेणावी, हातनूर व वायफळे येथील सबस्टेशनची कामे पूर्ण झाली असून, या भागातील शेतकऱ्यांना सध्या दिवसा वीजपुरवठा सुरू झाला आहे. तसेच खानापूर, पारे, बोरगाव व मांजर्डे येथील ३२ मेगावॅट सबस्टेशनचे कामही सध्या प्रगतीपथावर असून ते येत्या एका महिन्यात पूर्ण होणार आहे.उर्वरित खरसुंडी, आळसंद, कार्वे, विटा, भाळवणी, झरे व नागेवाडी येथील ४७ मेगावॅट क्षमतेसाठी लवकरच टेंडर प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. अशी माहिती आमदार बाबर यांनी दिली.

आतापर्यंत शेतकऱ्यांना रात्री उशिरा किंवा पहाटे शेतात जावे लागत असल्याने अपघाताचा धोका, साप-विंचू व वन्यप्राण्यांची भीती, आरोग्याच्या समस्या तसेच कौटुंबिक जीवनावर होणारा ताण सहन करावा लागत होता. दिवसा वीज मिळाल्यामुळे शेतीची सर्व कामे आता अधिक सुरक्षित, नियोजनबद्ध आणि कमी खर्चात करता येणार आहेत.

# शिरढोण ग्रा.पं.आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी सुरू

## ग्रामसेवक शेवरे धारेवर

शिरढोण,ता.१३ (प्रतिनिधी)-

**शिरढोण (ता. शिरोळ) येथील ग्रामपंचायतीतील आर्थिक गैरव्यवहाराची तपासणी करण्यासाठी सहाय्यक गटविकास अधिकारी मुकेश सजगाणे यांच्या अध्यक्षतेखाली सात अधिकाऱ्यांचे पथक मंगळवारी दिवसभर कागदपत्रांची तपासणी करत होते. या चौकशीला गेल्या चार वर्षांतील ग्रामसेवक उपस्थित होते.**

अपूर्ण प्रोसिडिंग पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असताना ग्रामसेवक विनायक शेवरे यांना ग्रामस्थांनी धारेवर धरत जाब विचारून प्रोसिडिंग लिहण्यास मज्जाव केला. यावेळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.पथकाच्या या चौकशीमुळे ग्रामसेवकांसह सरपंच, सदस्यांचे धाबे दणाणले असून पथकाच्या चौकशी अहवालाकडे ग्रामस्थांचे लक्ष लागून राहिले आहे.

दरम्यान तत्कालीन ग्रामसेवक विनायक शेवरे यांनी २०२४-२५ या कार्यकाळातील



शिरढोण ग्रामपंचायतीत अपूर्ण प्रोसिडीग ग्रामसेवक विनायक शेवरे यांनी लिहीत असताना तक्रारदारांनी जाब विचारत विरोध केला. यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

अपूर्ण असलेले प्रोसिडिंग ग्रामपंचायत कार्यालयात बसून पूर्ण करत असताना तक्रारदार अविनाश पाटील, विश्वास बालीघाटे, सुरेश सासणे, अशोक मगदूम यांनी आक्षेप घेत जाब विचारला. यावेळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. हा प्रकार चौकशी समितीच्या लक्षात आणून दिल्याने समितीने प्रोसिडींग काढून घेत त्यांना कार्यालयाबाहेर काढले. येथील ग्रामपंचायत कारभारात गेल्या चार वर्षांत विविध विभागात बोगस खर्च दाखवून आर्थिक गैरव्यवहार केल्याची तक्रार अविनाश पाटील, सुरेश सासणे, विश्वास बालीघाटे, पोपट पुजारी,अशोक मगदूम यानी जिल्हा परिषदचे मुख्यकार्यकारी अधिकारी एस कार्तिकेयन यांच्याकडे केली होती. त्यामुळे शिरोळ पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विजयकुमार परीट यांनी सहाय्यक गटविकास अधिकारी मुकेश सजगाणे यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती नेमली होती.

मंगळवारी समिती दिवसभर कार्यालयात बसून विभागनिहाय तपासणी करत होते. तर बांधकाम, शिक्षण,आरोग्य व महीला बालविकास विभागावरील खर्चाची तपासणी अधिकारी स्थळपाहणी करुन केली. यामध्ये अनेक नाना प्रकार चौकशी समितीच्या निदर्शनास आले असून तपासणी अहवाल गटविकास अधिकारी परीट यांच्याकडे सादर करणार आहेत. अहवालानंतरच गैरव्यवहाराची वस्तुस्थिती समोर येणार असल्याने तक्रारदारासह ग्रामस्थांचे या अहवालाकडे लक्ष लागून राहिले आहे.

# जातीवाचक शिवीगाळ चौघाविरूध्द गुन्हा दाखल

सांगली, ता. १३(प्रतिनिधी)-

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे शहरप्रमुख सचिन कांबळे यांना विनाकारण मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी संशयित नितीन कुरळपकर (रा. पोद्दार स्कूलजवळ), सुशांत ऊर्फ बॉबी चंदनशिवे, विशाल दरगावकर व अनोळखी अशा चौघांवर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

फिर्यादी सचिन कांबळे व मित्र जयदीप पाटील हे दोघेजण सोमवारी सायंकाळी साडेसहा वाजता बालाजीनगर येथे थांबले होते. तेव्हा संशयित कुरळपकर व साथीदार तेथे आले. तेव्हा काही कारण नसताना सुशांत ऊर्फ बॉबी, विशाल दरगावकर व अनोळखी युवकाने सचिन यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू केली. तर कुरळपकर याने जातीवाचक शिवीगाळ करून दमदाटी केल्याची फिर्याद कांबळे यांनी दिली आहे. त्यानुसार कुरळपकर, सुशांत ऊर्फ बॉबी, विशाल दरगावकर व अनोळखी अशा चौघांविरूद्ध संजयनगर पोलिसांनी ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला आहे. संशयित नितीन कुरळपकर, विशाल दरगावकर हे पोलिस रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. संजयनगर पोलिस तपास करत आहेत.

# लायन्स क्लबचे कार्य कौतुकास्पद डॉ. चिखले

इचलकरंजी,ता.१३-

**लायन्स क्लब ऑफ इचलकरंजी समाजातील गरजू आणि गरीब लोकांच्यासाठी करीत असलेले काम हे अतिशय कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्‌गार लायन्स चे प्रांतपाल डॉ. विरेंद्र चिखले यांनी काढले. लायन्स क्लब ऑफ इचलकरंजीच्या वर्धापन दिनाच्या सोहळ्यात ते बोलत होते.**

लायन्स क्लबच्या वर्धापन दिनानिमित्य क्लब तर्फे भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी शालेय विद्यार्थ्यांची भव्य समाज प्रबोधन यात्रा काढण्यात आली होती. त्यानंतर अध्यात्म आणि विज्ञान परस्पर विरोधी की पूरक या विषयावर लघु नाटिका स्पर्धा आयोजित केल्या होत्या. अन्नदान महादान या उपक्रमा अंतर्गत प्रांतपालांचे हस्ते गांधी चौक येथे गरीब लोकांना जेवण वाटप करण्यात आले. त्यानंतर शहरातील अपंग




मुलांना आवश्यक ते किट देण्यात आले. सुलतानपूरे विद्यालयातील मुलांना स्वेटर व खाऊ वाटप करण्यात आले. शहरातील वृत्तपत्र वाटप करणाऱ्या ८९ व्यक्तींचा अपघाती विमा क्लब मार्फत उतरण्यात आला. असे अनेक सामाजिक उपक्रम वर्धापन दिनानिमित्त साजरे करण्यात आले. संध्याकाळी क्लबच्या वर्धापन दिनाचा भव्य सोहळा साजरा करण्यात आला.

यावेळी क्लबचे अध्यक्ष संदीप सुतार यांनी प्रास्ताविक केले. सचिव सचिन येलाजा यांनी क्लबच्या सेवाकार्याची माहिती सादर केली. यावेळी माजी प्रांतपाल विजयकुमार राठी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ.सुनील चव्हाण, महेंद्र बालर, वासुदेव कलघटगी, सुनील सुतार, अनुप दरेकर, अमित पोद्दार, लिंगराज कित्तुरे, मंगेश दोशी, राहुल दोशी, विजय जमदग्नी, रविकिरण गायकवाड, तसेच अनेक लायन सदस्य उपस्थित होते.

सुषमा दातार आणि संगीता सारडा यांनी सूत्रसंचालन केले. गजानन होगाडे यांनी आभार मानले.

# स्वामी समर्थ भक्तांना दोन दिवस पादुका दर्शनाचा लाभ : प्रतिक शाह

निपाणी,ता.१३(वार्ताहर)-

**अक्कलकोट स्वामी समर्थ पादुकांचे येत्या दि. १६ व १७ रोजी निपाणीत आगमन होत आहे. यावेळी स्वामी भक्तांना दर्शनाचा लाभ व्हावा. जास्तीत जास्त वेळ पादुकांचे सानिध्य निपाणीकरांना मिळावे यासाठी राजमणी ग्रुप आणि निपाणी फुटबॉल अकॅडमी यांच्यावतीने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सचिन फुटाणकर, प्रतिक शहा यांनी दिली. राणी कित्तूर चन्नम्मा चौक येथे राजमणी ग्रुप येथील कार्यालयात आयोजित पत्रकार ते बोलत होते.**

यावेळी माहिती देताना प्रतिक शाह म्हणाले. दि. १६ रोजी प्रत्येकवर्षी पादुकांचे आगमन कार्यक्रमाला दिला जाणारा वेळ अपुरा मिळत असल्याने अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले महाराज व अभयकुमार खोबरे आदी पदाधिकारी यांना विनंती करुन पाठपुरावा केला आहे. त्यामुळे समितीने निपाणीतील पादुका परिक्रमाचा कालावधी वाढवून तो दोन दिवसांपर्यंत वाढवून दिला आहे. या संधीचा लाभ सर्व स्वामी भक्तांना पुरेपूर लाभ मिळावा या दृष्टीने योग्य नियोजन करण्यात आले आहे.

## ई-निविदा सुचना क्र. ६३ / २०२५-२०२६ ( संक्षिप्त निविदा सुचना )

कार्यकारी अभियंता, कोल्हापूर विद्युत विभाग, कोल्हापूर हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभाग) खात्याकडून शासन निर्णयानुसार आवश्यक त्या वर्गातील नोंदणीकृत व तत्सम कामाचा अनुभव असलेले कंत्राटदार यांचेकडून ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणाली व्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करणेत यावी. तसेच निविदा स्विकारणेचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कोल्हापूर विद्युत विभाग, सा. बां. खाते, कोल्हापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

कामाचे नाव :- कोल्हापूर जिल्हयातील विद्युतीकरणाचे एकूण ०३ काम

ई- निविदा उपलब्ध कालावधी :- दि. **१४.०१.२०२६ ते दि. १९.०१.२०२६**

ई-निविदा उघडणे :- **दि. २१.०१.२०२६** https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास संकेतस्थळावरती कळविण्यात येईल.

सही/-
(संजीवनी ध. कट्टी)
कोल्हापूर विद्युत विभाग (सा.बां.)
कोल्हापूर

विमाका/कोल्हापूर/२५५/२०२५-२०२६



# नोवाक जोकोविचने रचला इतिहास

## एटीपी टॉप ४० मध्ये सलग १,००० आठवडे मिळवले स्थान

नवी दिल्ली,ता.१३–

**नोवाक जोकोविचने टेनिस जगात पुन्हा एकदा अशी कामगिरी केली आहे जी आधुनिक खेळांमध्ये बरोबरी करणे कठीण आहे. २०२६ पर्यंत त्याला हा विक्रम साध्य करण्यासाठी एकही सामना खेळावा लागला नाही. जोकोविचने सलग १००० आठवडे एटीपी टॉप ४० मध्ये राहून इतिहास रचला आहे.**

हा टप्पा एप्रिल २००६ मध्ये सुरू झाला, जेव्हा १९ वर्षीय जोकोविचने पहिल्यांदा एटीपी टॉप ४० मध्ये प्रवेश केला. रोलँड गॅरोस येथे त्याच्या पहिल्या ग्रँडस्लॅम क्वार्टरफायनलमध्ये पोहोचल्यानंतर लगेचच त्याचे रँकिंग वाढले आणि तेव्हापासून, जवळजवळ १९ वर्षांत, त्याने त्याबाहेर एकही आठवडा घालवलेला नाही.

२०२६ च्या सुरुवातीला,जोकोविचने ऍडलेड इंटरनॅशनलमधून माघार घेण्याचा निर्णय घेतला आणि एटीपी टूरवरील सुरुवातीच्या स्पर्धा वगळल्या. तरीही, त्याचा प्रभाव कमी झालेला नाही. डॅनिल मेदवेदेवने ब्रिस्बेनमध्ये आणि अलेक्झांडर बुब्लिकने हाँगकाँगमध्ये जेतेपद जिंकले असले तरी, ३८ वर्षीय जोकोविच एटीपी रँकिंगमध्ये चौथ्या स्थानावर आहे. तो सध्या कार्लोस अल्काराझ, यानिक सिनर आणि अलेक्झांडर झ्वेरेव्ह यांच्यापेक्षा पुढे आहे.२०२५ मध्ये चारही ग्रँड स्लॅममध्ये उपांत्य फेरी गाठल्यानंतर, जोकोविच आता २०२६ च्या ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये आणखी एका उदात्त ध्येयासह प्रवेश करेल. तो त्याच्या २५ व्या प्रमुख जेतेपदाचे लक्ष्य ठेवेल. ऍडलेड सोडून थेट मेलबर्नवर लक्ष केंद्रित करणे हा या दृष्टिकोनाचा एक भाग आहे.

# भारतात वर्ल्डकप न खेळण्याचा बांगलादेशचा हट्ट!

## सामने दुसऱ्या ठिकाणी खेळवण्याची विनंती आयसीसीने फेटाळली

नवी दिल्ली,ता.१३–

**येत्या ७ फेब्रुवारीपासून टी–२० विश्वचषक २०२६ स्पर्धेला सुरूवात होत असतानाच बांगलादेश क्रिकेट बोर्ड टी–२० विश्वचषक स्पर्धेचे सामने भारतात न खेळण्यावर ठाम आहे.आयसीसीबरोबरच्या बैठकीत बांगलादेशने पुन्हा एकदा भारतात खेळण्यास नकार दिला आहे. बोर्डाने म्हटले आहे की, ते कोणत्याही परिस्थितीत त्यांचे विश्वचषकाचे सामने भारतात खेळणार नाहीत.**

आयसीसीने या स्पर्धेसाठी वेळापत्रक जाहीर केले आहे. पण भारत आणि बांगलादेश यांच्यातील तणावात्मक संबंधांममुळे बांगलादेशने भारतात टी–२० विश्वचषक खेळण्यास नकार दिला आहे.

सुरक्षेच्या कारणास्तव बीसीबीने भारतात खेळण्यास नकार दिला आहे. त्यांनी पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला त्यांचे सामने दुसऱ्या ठिकाणी खेळवण्याची विनंती केली आहे. पण आयसीसीचे म्हणणे आहे की,स्पर्धेचे संपूर्ण वेळापत्रक फायनल झाले आहे, म्हणून बीसीबीने आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करावा. मात्र, यावरही



आपल्याच भूमिकेवर ठाम राहिला. संभाव्य पर्यायांचा शोध घेण्यासाठी चर्चा सुरू ठेवण्यावर दोन्ही पक्षांमध्ये सहमती झाली आहे.

खेळाडू, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यावर बीसीबीचा जोर असून, या मुद्द्यावर तोडगा काढण्यासाठी आयसीसीसोबत सकारात्मक पद्धतीने संवाद सुरू ठेवू, असेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याआधी बीसीबी आणि आयसीसी यांच्यात या मुद्द्यावर पत्रव्यवहार झाला असून, आयसीसीकडून बांगलादेशला एक सुरक्षा मूल्यांकन अहवाल देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या अहवालानुसार, भारतात बांगलादेशच्या क्रिकेट संघाला कोणताही ठोस किंवा वाढीव सुरक्षेचा धोका नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

**टी–२० विश्वचषकात बांगलादेश संघाचा समावेश क गटात आहे. वेळापत्रकानुसार, बांगलादेश आपले पहिले तीन सामने कोलकात्यात खेळणार होता, ७ फेब्रुवारीला वेस्ट इंडिजविरुद्ध, ९ फेब्रुवारीला इटलीविरुद्ध आणि १४ फेब्रुवारीला इंग्लंडविरुद्ध सामने होणार होते. त्यानंतर १७ फेब्रुवारीला नेपाळविरुद्धचा शेवटचा गट सामना खेळण्यासाठी बांगलादेश संघ मुंबईला जाणार होता.**





इचलकरंजी महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी गुरुवार ता. १५ रोजी मतदान होत आहे. या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रावर बंदोबस्त नेमण्यात आला. तर प्रत्येक केंद्रावर ईव्हीएम मशिन पोहचविण्यासाठी येथील राजीव गांधी सांस्कृतिक भवन येथे जय्यत तयारी करण्यात आली आहे. (छाया : मयूर चिंदे)



# आरसीबीचे होमग्राऊंड बदलणार

## नवी मुंबईत ५ तर रायपूरमध्ये २ सामने होणार

नवी दिल्ली,ता.१३ –

**आयपीएल २०२६ पूर्वी गतविजेता संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाबाबत माहिती समोर येत आहे.संघाचे होमग्राऊंड बदलणार आहे. आयपीएल २०२५ पर्यंत आरसीबीचे होम ग्राऊंड हे बंगळुरूमधील चिन्नास्वामी स्टेडियम होते. पण आरसीबी संघ विजेता ठरल्यानंतर चिन्नास्वामी स्टेडियममध्ये झालेल्या प्रकरणानंतर या मैदानावर सामने खेळण्यावर बंदी घातली आहे. रिपोर्टमध्ये नवी मुंबई आणि रायपूर हे आरसीबीची नवीन होम ग्राउंड असू शकतात.**

रजत पाटीदारच्या नेतृत्त्वाखाली रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने १८ वर्षांत पहिल्यांदाच आयपीएलचे जेतेपद पटकावले होते. आरसीबीने पंजाब किंग्स संघाला अंतिम सामन्यात पराभूत केले होते. गेली १८ वर्षे एकाच संघाकडून खेळणाऱ्या विराट कोहलीसाठी हा क्षण फार भावुक करणारा होता. यानंतर विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी संघ चिन्नास्वामी स्टेडियममध्ये पोहोचला, पण यादरम्यान प्रचंड गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी झाली होती.

चिन्नास्वामी स्टेडियमवरील बंदीनंतर,आरसीबीचे होमग्राउंड बदलण्याबाबत बरीच चर्चा सुरू आहे आणि ते घडत असल्याचे दिसून येत आहे. अलिकडच्या अहवालांमध्ये दोन नवीन होमग्राउंड्सचा समावेश असल्याचे सूचित केले आहे. पण याबाबत अद्याप अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. आरसीबी त्यांचे ५ सामने नवी मुंबईत तर २ सामने रायपूरमध्ये होणार आहेत.आरसीबीच्या होमग्राऊंडबरोबरच आरसीबीला नवे मालकदेखील मिळणार आहेत. आता आरसीबीचे नवे मालक कोण असणार, यावर सर्वांच्या नजरा आहेत.

# एलिसा हिलीची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा

मेलबर्न,ता.१३–

**यंदा पुरूषांच्या टी–२० विश्वचषकासह महिलांचा विश्वचषकदेखील होणार आहे. महिलांचा टी–२० विश्वचषक जून–जुलैमध्ये खेळवला जाणार आहे.**



**इंग्लंडच्या यजमानपदाखाली होणाऱ्या या विश्वचषकापूर्वी ऑस्ट्रेलिया संघाला मोठा धक्का बसला आहे. ऑस्ट्रेलिया महिला संघाची कर्णधार व आठ वेळची वर्ल्डकप विजेती खेळाडू एलिसा हिलीने अचानक निवृत्तीची घोषणा करत सर्वांनाच धक्का दिला आहे.**

फेब्रुवारी–मार्च २०२६ मध्ये भारताविरुद्ध होणाऱ्या मल्टी–फॉरमॅट मालिकेनंतर एलिसा हिली क्रिकेटमधून निवृत्त होणार आहे. २०२३ च्या अखेरीस मेग लॅनिंगच्या जागी हिलीला पूर्णवेळ कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले. यावर्षी होणाऱ्या टी–२० विश्वचषकाची तयारी ऑस्ट्रेलियाला सुरू करता यावी म्हणून ती भारताविरुद्धच्या टी–२० मालिकेत खेळणार नाही. पण ती एकदिवसीय सामने खेळेल आणि नंतर तिच्या कारकिर्दीचा शेवट ११ व्या कसोटी सामन्याने करेल, जो ६ ते ९ मार्च दरम्यान वाका येथे एक डे–नाईट सामना असेल.

कर्णधार हिलीने पोडकास्टमध्ये तिच्या निवृत्तीची घोषणा करताना म्हटले की, हा निर्णय मी पॉडकास्टसाठीच राखून ठेवला होता, कारण अलीकडच्या काळात मला सर्वाधिक आनंद देणारे हे काम ठरले आहे. भारताविरूद्ध मालिकेनंतर मी क्रिकेटमधून निवृत्ती घेणार आहे. हा निर्णय सोपा नव्हता, पण कधीतरी तो घ्यावाच लागतो, असे हिलीने सांगितले. भारताचा ऑस्ट्रेलिया दौरा १५ फेब्रुवारीपासून तीन टी–२० सामन्यांच्या मालिकेसह सुरू होणार आहे, त्यानंतर पर्थमधील वाका येथे तीन एकदिवसीय सामने आणि एक कसोटी सामना खेळवला जाईल, जो हिलीच्या शानदार कारकिर्दीतील शेवटचा सामना असेल. हिलीने १२३ एकदिवसीय सामने खेळले आहेत, ज्यामध्ये सात शतकांसह ३,५६३ धावा केल्या आहेत आणि १६२ टी–२० सामने खेळले आहेत, ज्यामध्ये एका शतकासह ३,०५४ धावा केल्या आहेत. तिने १० कसोटी सामने देखील खेळले आहेत. २०२० च्या टी–२० विश्वचषक अंतिम सामन्यात ती सामनावीर ठरली होती.

# आमचाच उमेदवार निवडून येणार..लागल्या पैजा!

## मतमोजणीनंतर होणार चित्र स्पष्ट

इचलकरंजी ता.१३–

**इचलकरंजी महानगरपालिकेच्या पहिल्याच होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा मंगळवारी थंडावल्या. प्रत्येक प्रभागात चुरशीने आणि इर्षेने प्रचार करण्यात आला. त्यामुळे आमचाच उमेदवार निवडून येणार ? यावर आता पैजा लागू लागल्या आहेत. गुरुवार, ता. १५ रोजी मतदान होणार आहे. तर शुक्रवार, ता. १६ रोजी मतमोजणी होणार आहे. त्याच दिवशी कोण जिंकणार ?आणि कोण हरणार ? हे स्पष्ट होणार आहे.**

इचलकरंजी नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर पहिल्यांदाच निवडणूक होत आहे. पहिल्या निवडणुकीमध्ये महायुती विरुद्ध शिव–शाहू विकास आघाडीमध्ये लढत होण्याची चर्चा होती. मात्र, शिवसेना उबाटा गट, राष्ट्रवादी अजित पवार गट, आप, वंचित आघाडी तसेच अपक्ष यांनीही निवडणूक रिंगणात उडी घेतल्याने निवडणुकीला चांगलीच रंगत आली. ६५ जागांसाठी तब्बल २३० उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. प्रचारादरम्यान प्रत्येक उमेदवार पायाला भिंगरी बांधून रात्रीचा दिवस करून प्रचार करताना दिसून येत होता. प्रत्येक उमेदवाराने शेवटच्या मतदारापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे गेल्या आठ–दहा दिवसांपासून प्रचाराचा धुरळा उडाला होता. थंडीच्या दिवसात राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. आरोप–प्रत्यारोपामुळे अनेक कॉर्नर सभा चांगल्याच गाजल्या. आठ –दहा दिवसांच्या प्रचारा नंतर मंगळवार ता. १३ रोजी सायंकाळी प्रचाराच्या तोफा थंडावल्या. मतदानासाठी अद्यापही दोन दिवस बाकी आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने शेवटच्या टप्प्यात मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी अनेक युक्त्या लढवल्या जाणार आहेत.



इचलकरंजी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक

**अनेक प्रभागात चुरशीच्या लढती**

एकूण १६ प्रभागात ६५ जागेसाठी निवडणूक होत आहे.६५ जागेपैकी १८ जागेवर दुरंगी,तर २० जागांवर तिरंगी लढती होत आहे.त्यामुळे या प्रभागात चुरशीने मतदान होण्याची शक्यता आहे.त्यामध्ये कोण बाजी मारणार?याकडे आता शहरवाशीयांचे लक्ष लागून राहिले आहे.

प्रचाराच्या रणधुमाळीत अनेक ठिकाणी चुरशीच्या लढती होणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामध्ये आमचा उमेदवार निवडून येणार असे भाकीत वर्तवले जात आहे.

कार्यकर्त्यांसह मतदारांच्यात पैजा लागू लागल्या आहेत. शेकडो रुपयापासून लाखो रुपये पर्यंत पैजा लावत असल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये सुरू आहे. एकंदरीत निवडणुकीचे वातावरण पाहता निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर कोण बाजी मारणार? याकडे मतदारांसह कार्यकर्त्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

# वार्ड क्र. २९ निपाणीतील मालक चषक २०२६ चा विजेता

निपाणी,ता.१३ (प्रतिनिधी)–

**येथील रोहन साळवे फाउंडेशनतर्फे म्युनिसीपल हायस्कूच्या पटागणांवर आयोजित मालक चषक २०२६ या दिवस रात्र वार्डनिहाय क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामन्यात वार्ड २९ ने प्रथम फलंदाजी करताना ६ षटकांत ७७ धावा जमविल्या. तर लक्ष्याचा पाठलाग करताना वार्ड क्रमांक ३० संघाला केवळ ५७ धावांपर्यंत मजल मारता आली. त्यामुळे वार्ड क्रमांक २९ निपाणीतील पहिल्या डे–नाईट वार्डनिहाय मालक चषक २०२६ चा विजेता ठरला.**

विजेत्यांना चिकोडी जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष लक्ष्मणराव चिंगळे, रोहण साळवे यांच्या हस्ते रोख ५१ हजार व मालक चषक देवून गौरविण्यात आले. उपविजेत्या वार्ड क्रमांक ३० संघाला ३१ हजार रूपये व चषक देवून गौरविण्यात आले.तृतीय आणि चतुर्थ संघाला रोख ११ हजार व चषक देण्यात आला.





**मालक चषक २०२६स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक वार्ड २९ संघाला देताना लक्ष्मणराव चिंगळे, रोहण साळवे व इतर.**

या स्पर्धेत बंटी कांबळेला सामनावीरचा बहूमान मिळाला. उत्कृष्ट गोलंदाज सोनू लोहार, उत्कृष्ट फलंदाज सद्दाम बडेघर, मालिकावीर अभिजीत सांडूगडे, उदयोन्मुख खेळाडू शुभम अस्वले यांना बक्षिसे देण्यात आली.संपूर्ण शहरातील ३१ वार्डाचा समावेश असल्याने स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

रोहन साळवे यांनी, येथून पुढेसुद्धा मोठ्या प्रमाणात स्पर्धा भरवून निपाणीतील खेळाडूंना देश पातळीपर्यंत खेळविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.यावेळी सुजय पाटील, अशोककुमार असोदे,प्रतिक शाह, किरण पाटोळे, अस्लम शिकलगार, दिपक सावंत, अनिल भोसले, सुनिल हिरेगुडे, बबलू मांगोरे, चेतन पांगीरे, संतोष कांबळे, राजू नाईक, दिलीप घाटगे, संदिप माने उपस्थित होते.



**आ. डॉ . विश्वजीत कदम यांच्या वाढदिवसा निमित्त सर्व रोग निदान शिबिराप्रसंगी घेतलेले छायाचित्र.**

# आ. डॉ. विश्वजीत कदम यांच्या वाढदिनी महाआरोग्य शिबिर

भिलवडी,ता.१३(वार्ताहर)–

**भिलवडी येथे भारती विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय सांगली यांच्यावतीने मोफत सर्वरोग निदान शिबिर झाले.**

सरपंच स्वप्नाली कुरणे, माजी उपसरपंच चंद्रकांत पाटील, शहाजी गुरव, उत्तर भाग सोसायटी चेअरमन रमेश पाटील, बाळासो मोरे,कुमार पाटील, जावेद तांबोळी , मुसा शेख, मारुती हराळे यांच्यासह गावातील नेते मंडळी यांच्या हस्ते हनुमान मंदीरात शिबिरास प्रारंभ झाला.या शिबिरात सुमारे शेकडो रुग्णांची तपासणी करण्यात आली.

स्व. डॉ. पतंगराव कदम यांची जयंती व आमदार डॉ. विश्वजीत कदम यांच्या वाढदिवसानिमित्त महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. सर्व प्रकारच्या रोगांची तपासणी करण्यात आली. यासाठी वैद्यकशास्त्र, त्वचारोग, अस्थिरोग, शस्त्रक्रिया, स्त्रीरोग, बालरोग, कान–नाक–घसा नेत्रचिकित्सा यावरील तज्ज्ञ डॉक्टरांची टीम आली होती. रुग्णांना पुढील उपचारासाठी किंवा शस्त्रक्रिया करायची असेल तर भारती हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात येणार आहे. येथे सवलतीच्या दरात उपचार करण्यात येणार आहेत,अशी माहिती हॉस्पिटलचे पीआरओ मनोज पाटील यांनी दिली.

# सोलापूरचा पंचाक्षरी लोणार यशवंत श्री २०२६ चा मानकरी

भिलवडी,ता.१३(वार्ताहर)–

**महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशन व बॉडी बिल्डर्स असोसिएशन ऑफ सांगली यांच्या मान्यतेने अंकलखोप येथे यशवंत श्री २०२६ या पश्चिम महाराष्ट्र मर्यादित भव्य शरीरसौष्ठव स्पर्धेत सोलापूरच्या पंचाक्षरी लोणारने विजेतेपद पटकावत मानाचा किताब आपल्या नावे केला.**

अत्यंत अटीतटीच्या स्पर्धेत पंचाक्षरी लोणार याने यशवंत श्री २०२६ किताब पटकावला. त्याला मानाचा पट्टा, ट्रॉफी, प्रशस्तीपत्रक व रोख बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. सांगलीचा मयूर जल्ली प्रथम उपविजेता, तर कोल्हापूरचा प्रतीक मगदूम द्वितीय उपविजेता ठरला.





**पंचाक्षरी लोणार याला यशवंत श्री २०२६ चे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देताना प्रदीप कदम शेजारी प्रताप पाटील,केदार पाटील, संजय कोळी, निवास सावंत आदी.**

स्व. यशवंतराव चव्हाण स्मृती गौरव समितीचे अध्यक्ष प्रदीप कदम यांनी प्रास्ताविकात, अंकलखोप गावाने दोन आमदार दिले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूळ अस्थी गावात आणणाऱ्या चार महान व्यक्तींमुळे या भूमीचे पावित्र्य मोठे झाले आहे. पुढील वर्षी राज्यस्तरीय यशवंत श्री २०२७ स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल,अशी ग्वाही दिली.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अजित पवार गट) सरचिटणीस प्रताप पाटील,केदार पाटील, संजय कोळी, निवास सावंत, महेश हजारे, तुषार सूर्यवंशी, सचिन कुराडे, कृषिभूषण रवी पाटील, प्रशांत पाटील, राहुल पाटील, अमीर पठाण, अनिल पाटील, अभिजीत सावंत, अभिजीत कौलगे, संजय शिंदे उपस्थित होते. श्रीकांत माने यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. रवी पाटील यांनी आभार मानले.